स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

लेखक
काशिनाथ नरसिंह केळकर, ॲडव्होकेट
कुमारी बाळुबाई खरे, बी. ए.

(द्वितीयावृत्ति)

१९३१

किंमत चार आणे

स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

लेखक

काशिनाथ नरसिंह केळकर, ॲडव्होकेट

कुमारी बाळुबाई खरे, पी. ए.

(द्वितीयावृत्ति)

१९३१

किंमत चार आणे

प्रकाशकः—
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
५१३ शनवार पेठ पुणें २.

मुद्रकः—
श्रीपाद रघुनाथ राजगुरु
'राजगुरु आणि कंपनीज् प्रेस'
५१३ शनवार पेठ, पुणें २.

लेखकांचे दोन शब्द

" स्त्रियांच्या हक्काची सुधारणा " या पुस्तकाची पहिली आवृत्ती गत-वर्षीं डिसेंबरांत प्रथम निघाली ती केवळ दोनच आठवड्यांत संपली.

या पुस्तकाचा वाचकवर्गाकडून आदर झाला व स्त्रियांच्या हक्कांच्या सुधारणेच्या प्रश्नास एकप्रकारें चालना मिळण्यास थोडी फार मदत झाली याबद्दल समाधान वाटतें.

या पुस्तकाबद्दल वेळोवेळीं जे अनेक अभिप्राय आमच्याकडे आले त्यांतून सांगण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, संस्थान औंध व बडोदें यांतील अधिकाऱ्यांनीं नेमलेल्या हिंदुधर्मशास्त्र–सुधारणा कमिटींत या पुस्तकांतील सूचना विचारात घेण्याचें आश्वासन दिलें; व दुसरी म्हणजे प्रसिद्ध कायदेपंडित बॅ. जयकर, व वे. शा. सं. श्री. सदाशिवशास्त्री भिडे या उभयतांनाहि या पुस्तकांतील सिद्धांत, व विचारसरणी पसंत पडली असून त्याला त्यांची मान्यता मिळाली ही होय. अशा वादग्रस्त बाबतींत एका बाजूनें एका धर्मशास्त्रज्ञ व दुसऱ्या बाजूनें एका प्रख्यात कायदेपंडिताचा पाठिंबा असल्यामुळें लेखकांनां आपल्या मतांबद्दल एक प्रकारचा सुरक्षितपणा वाटतो.

प्रस्तुत पुस्तकाच्या परिशिष्टांत " दत्तकाच्या कायद्याची सुधारणा " व " विद्याधनाच्या कायद्याची सुधारणा " असे दोन लेख नवीन घातले आहेत.

या छोट्या पुस्तकांत स्थळाभावामुळें हिंदु–कायदा अगर त्याची सुधारणा यांचे सांगोपांग विवेचन करितां आलें नाहीं. तथापि अशा त्रोटक विवेचनापेक्षां, अधिक विस्तृत माहिती देणारा असा हिंदु–कायद्यावर स्वतंत्र ग्रंथच असावा अशा हेतूनें हिंदुकायद्याबद्दल एक स्वतंत्र पुस्तकच लिहिण्याचें काम सध्यां आम्ही अंगावर घेतलें आहे. व तें येत्या जूनमध्यें प्रसिद्ध होईल. तथापि या विषयासंबंधानें स्त्रियांच्या चालू चळवळीला थोडा हातभार लावण्याकरितां प्रस्तुत पुस्तकाची सुधारून वाढविलेली द्वितीयावृत्ति प्रकाशित केली आहे. या पुस्तकाबद्दल ज्यांनीं आपले अभिप्राय आमच्याकडे पाठविले त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहो.

का. न. केळकर
बाळुबाई खरे

अलंकार-मंजूषा

लेखिका

कुमारी बाळूबाई खरे, बी. ए.

(पृष्ठसंख्या सुमारें ३०० डेमी)

Mr. N. C. Kelkar writes :—

"I have great pleasure in stating my view, that the work does to the writer immense credit for industry, intelligence and acumen. The thesis exhaustively deals with the important department of Alankars or figures of speech, and must have cost the writer an amount of patient labour over at least two years, and what is more, the true method of research seems to have been well understood by the researcher."

श्री. चिंतामणराव वैद्य लिहितातः— "मीं हें पुस्तक समग्र वाचून पाहिलें. या प्रबंधांत लेखिकेचें प्राविण्य फारच प्रशंसनीय दृष्टोत्पत्तीस येतें. अलंकारशास्त्राचा फार खोल अभ्यास त्यांनीं केला असून अलंकारांच्या लक्षणांची फारच सूक्ष्म विवेचना या निबंधांत त्यांनीं केली आहे. मला वाटतें, अनेक पुरुष विद्वानांसहि असा निबंध लिहिणें कठीण पडेल."

नव्या स्मृतीची आवश्यकता

लेखक–का. न. केळकर, ॲडव्होकेट

निवडक अभिप्राय

डॉ. बा. शि. मुंजे—" चालू परिस्थितीला योग्य असें धर्मपरिवर्तन घडवून आणण्याला जुन्या शास्त्रवचनांचेच हवे तितके आधार सांपडतात. हिंदु समाज फार प्राचीन व त्यानें समाजाचीं इतकीं स्थित्यंतरें पाहिलीं आहेत कीं, आजच्या परिस्थितीला जुना दाखला व जुनें शास्त्रवचन सांपडणार नाहीं असें बहुधा होणारच नाहीं. व " नवी स्मृति " करावयाची म्हणजे नव्या परिस्थित्यनुसार जुन्या वचनांचा संग्रह करून नवी ग्रंथरचना करावयाची हाच श्री. केळकर यांचा अर्थ आहे. "

श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील सातारा—" स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा " " रामायणावरील कांहीं विचार " व प्रस्तुतचें " नव्या स्मृतीची आवश्यकता " हीं पुस्तकें लिहून रा. केळकर यांनीं आपला दृढ व्यासंग, चिकित्सक दृष्टि, व त्याचबरोबर आपल्या पूर्वसंस्कृतीचा दृढ अभिमान या गोष्टी लोकांस पटविल्या आहेत. "

श्री. ज. स. करंदीकर(संपादक केसरी)—प्रस्तुत पुस्तक छोटेसेंच आहे खरें. पण ज्याप्रमाणें लहानगी मुंगी हत्तीच्या कानांत शिरली कीं ती त्या अजस्त्र प्राण्याला कासावीस करून सोडते, त्याप्रमाणें या छोट्या पुस्तकानें 'सनातन' हिंदुधर्मीयांना अस्वस्थ करून सोडलें आहे. वास्तविक पाहतां यांत सनातनी लोकांना विषाद वाटण्यासारखें कांहीं नाहीं. उलट रा. केळकर यांच्या सूचनेप्रमाणें हिंदु समाजांतील पुढाऱ्यांनीं व आचार्यांनीं एक विचारानें सद्यःस्थितीला अनुसरून सर्वत्र प्रमाणभूत मानला जाणारा एखादा स्मृतिग्रंथ तयार केल्यास त्यायोगें हिंदुधर्मीयांच्या वागणुकीतील **'मिथ्याचार'** बंद होऊन स्मृत्युक्त आचार होऊं लागेल आणि शिथिल होत चाललेली धर्मश्रद्धा पुनः दृढावेल. "

" **वैनतेय** " (सांवतवाडी) "श्री. केळकर यांची भाषा प्रौढ व अलंकृत असल्यामुळें विषयांचा रुक्षपणा कोठेंहि जाणवत नाहीं. विचार–स्वातंत्र्य

हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हें मान्य असणारांना हें पुस्तक निःसंशय आवडेल."

बलवंत (रत्नागिरी)–"मराठी वाचतां येणाऱ्या व समजणाऱ्या **प्रत्येक हिंदूनें** हें पुस्तक अवश्य मननपूर्वक वाचावें,"

ज्ञानप्रकाश–"प्रगमनशील माणसांच्या मनांत जे विचार वावरत असतात त्यांचेंच संकलन या निबंधांत सुसंगत रीतीनें केलें आहे. आणि या दृष्टीनें हें पुस्तक नवमतवादी समाजास संग्राह्य असें झालें आहे. नव्या स्मृतीच्या आवश्यकतेसंबंधानें ज्यांना जुन्या शास्त्री लोकांशी वाद करावयाचा असेल त्यांना प्रस्तुत निबधांतलें पहिलें प्रकरण 'मनुस्मृतिसार' हें चांगलें उपयोगी पडण्यासारखें आहे. रा. केळकर यांनीं हा निबंध परिश्रमपूर्वक लिहिला असून सनातन धर्माभिमानी लोकांस जसा तो निरुत्तर करणारा आहे. त्याचप्रमाणें विचार प्रवर्तक व मार्गदर्शक असा आहे."

संपादक हिंदू गोंवा हे आपल्या अग्रलेखांत लिहितात–"श्री. काशिनाथपंत केळकर यांच्या लेखनांत त्यांच्या वडिलांच्या मनोहर वाग्विलासाइतकी झांक मारते, कीं लेखनकला ही देखील वंशपरंपरागत मालमत्ता होऊं शकते कीं काय अशी शंका आल्यावांचून राहात नाहीं. प्रस्तुत पुस्तकाची पृष्ठें शंभरापेक्षां कमी असून किंमत अवघी आठ आणे आहे, आणि एवढ्यावरून किंवा पुस्तकांतील मोहक भाषासरणीवरून त्यावर अभिप्राय द्यावयाचा असता तर त्याला आम्ही हें स्थान खात्रीनें दिलें नसतें. पण या पुस्तकाच्यारूपानें हिंदु समाजासमोर निदान, महाराष्ट्रीय हिंदु समाजासमोर जो प्रश्न ग्रंथकर्त्यानें व्यवस्थितपणें, मार्मिकपणानें आणि त्याहीपेक्षा अधिक कळवळ्यानें ठेवला आहे तो अतिशयच महत्त्वाचा असल्यानें त्याला हें (अग्रलेखाचें) स्थान न देणें म्हणजे त्या प्रश्नाच्या गंभीर स्वरूपाकडे दुर्लक्ष केल्यासारखें झालें असतें."

पृष्ठसंख्या १०० **किंमत फक्त ०८ आणे.**

[पोस्टजनें नऊ आण्यांचीं तिकिटें पाठवावींत.]

ग्रंथकर्त्याकडे.

पत्ता—(१) ५५४ सदाशिव पेठ, पुणें.

(2) S. P. BOOK-stall, *POONA.*

स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा.

कांहीं निवडक अभिप्राय

(१) बॅरिस्टर मुकुंदराव जयकर आपल्या पत्रांत म्हणतातः—

Dear mr. Kelkar,

Thank you very much for sending me a copy of your pamphlet on " Women's rights. " I am glad you have devoted your best thought to the question discussed in your pamphlet.

I have, carefully followed your criticism of the " Gains of Learning Bill " I appreciate it very much. I shall make use of one or two original arguments which I have found in your criticism.

(२) **श्री. सदाशिवशास्त्री भिडे**—" प्रस्तुत पुस्तकावरून विद्वान लोकास धर्मसंस्करणाचा विचार करण्याची वेळ आली आहे असें वाटलें तर या पुस्तकाचें काम झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

(३) **श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी औंधः**–" स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा " हें पुस्तक आम्हीं समग्र वाचून पाहिलें. पुस्तक फारच सुंदर जाहलें असून आम्हांस तें फार आवडलें. सदरहू पुस्तकांत स्त्रियांचे हक्कासंबंधीं सर्व बाजूंनीं सांगोपांग विचार केला असून तुम्हीं जीं मतें प्रतिपादन केलीं आहेत, तीं उत्तम आहेत. बडोद्याप्रमाणें आमच्याहि संस्थानांत स्त्रियांचे हक्कासंबंधीं विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमण्याबद्दलची तुमची सूचना आहे त्यासंबंधीं विचार होत आहे. आम्ही आपले संस्थानांत स्त्रियांची सुधारणा करणेसंबंधीं खटपट करीत आहोंत. या कामीं गांवोगांव जागृती करणें जरूर आहे असें आम्हाला वाटतें. तुमचें पुस्तक फार चांगलें निघालें आहे याबद्दल आम्ही तुमचें उभयतांचे मनःपूर्वक अभिनंदन करतों. "

(४) **श्रीमंत बाबासाहेब पंतसचिव, भोरः**–तुमचें पुस्तक वाचून फार समाधान व आनंद वाटला. बहुजनसमाजाला या प्रश्नाचें शिक्षण

देण्याला तुमच्या पुस्तकाचा फार उपयोग होईल. सामान्य लोकांना या बाबतींत फारच अस्पष्ट व पुसट कल्पना असतात.

(५) **सौ. रमाबाई तांबे** (मध्यप्रांताचे गव्हर्नर श्री. **तांबे यांच्या पत्नी**) लिहितात:—

"तुमचें पुस्तक मीं वाचून पाहिलें व मला तें फार आवडलें. स्त्रियांचे हक्क व त्याबद्दल सुधारणा या विषयाबद्दल बरीच मंडळी विचार करावयास लागली आहेत व पुष्कळांना असें पण वाटूं लागलें आहे कीं, स्त्रियांचें वारसाहक्कांत कांहींतरी सुधारणा व्हावयास हवी आहे. तरी पण हा विषय सर्वसाधारण मनुष्याला समजणें जरा कठिणच आहे. या पुस्तकाचे लेखकांचे लक्षांत ही अडचण बरोबर आली आहे व त्यांनीं या क्लिष्ट विषयाची थोडक्यांत व सोप्या भाषेंत फारच छानपणें फोड करून दिली आहे. मला तर वाटतें प्रत्येक भगिनीनें हें पुस्तक वाचून यामध्यें दिलेल्या मुद्यांचा विचार करावा. हें उपयुक्त पुस्तक लिहिल्याबद्दल उभयता लेखकांचें अभिनंदन व कौतुकच केलें पाहिजे."

(७) **श्रीमंत राणीसाहेब सांगली**:—"प्रस्तुत विषयाबाबतींत सुधारणा होणें हिंदू स्त्रियांना अत्यंत अवश्य आहे. व आपल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल फार कौतुक व आनंद वाटत आहे."

(८) **श्रीमंत सरदार माधवराव साहेब किबे, इंदूर**:—विषयाचें विवेचन या पुस्तकांत विशद रीतीनें केलें आहे व त्यांतील पुष्कळ गोष्टींशीं माझें एकमत आहे.

(९) **श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई गोंवा**:—"आपल्या पुस्तकांतील लेखमाला मीं काळजीपूर्वक वाचली. खरोखर आपण ही फार मोठी कामगिरी करीत आहां याबद्दल मी आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. पोर्तुगीज कायद्यान्वयें येथें स्त्रियांना इस्टेटीचा समान हक्क आहे. म्हणजे मुलगा व मुलगी यांना वाटणी सारखीच आहे."

(१०) **श्री. दत्तात्रय केशव केळकर, बी. ए. पांचगणी**:—तुमच्या पुस्तकांतील प्रत्येक पान विचार व अभ्यासपूर्वक लिहिलेलें आहे असें मला वाटलें.

स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

प्रकरण १ लें.

विषयप्रवेश

स्त्रिया, हक्क आणि सुधारणा हे तीन शब्द एकत्र आले कीं निरनिराळ्या लोकांच्या मनांत विविध विचार येऊन जातील. ज्यांना स्त्रियांच्या दुर्दशेची कहाणी ऐकवत नाहीं त्यांना या शब्दांनीं आनंद होईल. कित्येकांना वाटेल, 'झालें, घरचा स्वयंपाक धड करतां येईना आणि लागल्या हक्क शब्द उच्चारायला.' कित्येक स्त्रियांना हा जिव्हाळ्याचा प्रश्न वाटेल तर कित्येक म्हणतील ' ही काय भानगड आहे ? आम्हांला कसले हक्क ?' असें म्हणून त्या स्तंभितच होतील व अशा स्तंभित होणाऱ्या स्त्रियांचीच संख्या अधिक. कारण रूढीराक्षसीनें इतकी जबरदस्त भूल आम्हांला दिली आहे कीं, आम्ही कोण हेंच भान आमचें हरपलें आहे व खऱ्या वैदिक धर्माला तिलांजलि देऊन स्मृतिकार व त्यांवरील भाष्यकारांनीं आपल्या मंत्रांनीं आम्हांला भारून ' आम्ही माणसें नाहीं, वस्तु आहोंत, पशूपेक्षां आम्ही निराळ्या नाहीं. खरोखरच नाहीं. ' ही भावना आमच्या मनावर दृढमूल करून टाकली आहे. मोहिनी विद्येच्या जोरावर एकादा मांत्रिक पुरुषालाही आपण स्त्रिया आहों असें भासावयाला लावतो. तसेंच स्मृतिकारांनीं रूढि व आचार यांच्या जोरावर आम्हांला वस्तु केलें आहे व त्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, आम्हांला त्यांत आनंदच आहे. कारण गतकालांतील मनुष्यत्वाची जाणीव मरून अगर मारून नाहींशी झाल्यावर सुख–दुःख कसलें ?

परंतु हा मोहिनी मंत्राचा जोर नाहींसा होऊन कांहीं स्त्रियांना गतकालचें वैभव स्वच्छ दिसूं लागलें व ' काय ही आपली अवस्था ? तें पूर्वींचें वैभव कसें लाभेल ?' याविषयीं त्यांना अहर्निश तळमळ लागली. आपल्या भोंवतीं मंत्रमुग्ध

देण्याला तुमच्या पुस्तकाचा फार उपयोग होईल. सामान्य लोकांना या बाबतींत फारच अस्पष्ट व पुसट कल्पना असतात.

(५) सौ. रमाबाई तांबे (मध्यप्रांताचे गव्हर्नर श्री. **तांबे यांच्या पत्नी**) लिहितातः—

" तुमचें पुस्तक मीं वाचून पाहिलें व मला तें फार आवडलें. स्त्रियांचे हक्क व त्याबद्दल सुधारणा या विषयाबद्दल बरीच मंडळी विचार करावयास लागली आहेत व पुष्कळांना असें पण वाटू लागलें आहे कीं, स्त्रियांचें वारसाहक्कांत कांहींतरी सुधारणा व्हावयास हवी आहे. तरी पण हा विषय सर्वसाधारण मनुष्याला समजणें जरा कठिणच आहे. या पुस्तकाचे लेखकांचे लक्षांत ही अडचण बरोबर आली आहे व त्यांनीं या क्लिष्ट विषयाची थोडक्यांत व सोप्या भाषेंत फारच छानपणें फोड करून दिली आहे. मला तर वाटतें प्रत्येक भगिनीनें हें पुस्तक वाचून यामध्यें दिलेल्या मुद्यांचा विचार करावा. हें उपयुक्त पुस्तक लिहिल्याबद्दल उभयता लेखकांचें अभिनंदन व कौतुकच केलें पाहिजे. "

(७) श्रीमंत राणीसाहेब सांगलीः— " प्रस्तुत विषयाबाबतींत सुधारणा होणें हिंदू स्त्रियांना अत्यंत अवश्य आहे. व आपल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल फार कौतुक व आनंद वाटत आहे. "

(८) श्रीमंत सरदार माधवराव साहेब किबे, इंदूरः—विषयाचे विवेचन या पुस्तकांत विशद रीतीनें केलें आहे व त्यांतील पुष्कळ गोष्टींशीं माझें एकमत आहे.

(९) श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई गोंवाः— " आपल्या पुस्तकांतील लेखमाला मीं काळजीपूर्वक वाचली. खरोखर आपण ही फार मोठी कामगिरी करीत आहां याबद्दल मी आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों. पोर्तुगीज कायद्यान्वयें येथें स्त्रियांना इस्टेटीचा समान हक्क आहे. म्हणजे मुलगा व मुलगी यांना वाटणी सारखीच आहे. "

(१०) श्री. दत्तात्रय केशव केळकर, बी. ए. पांचगणीः— तुमच्या पुस्तकांतील प्रत्येक पान विचार व अभ्यासपूर्वक लिहिलेलें आहे असें मला वाटलें.

स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा

प्रकरण १ लें.

विषयप्रवेश

स्त्रिया, हक्क आणि सुधारणा हे तीन शब्द एकत्र आले कीं निरनिराळ्या लोकांच्या मनांत विविध विचार येऊन जातील. ज्यांना स्त्रियांच्या दुर्दशेची कहाणी ऐकवत नाहीं त्यांना या शब्दांनीं आनंद होईल. कित्येकांना वाटेल, 'झालें, घरचा स्वयंपाक धड करतां येईना आणि लागल्या हक्क शब्द उच्चारायला.' कित्येक स्त्रियांना हा जिव्हाळ्याचा प्रश्न वाटेल तर कित्येक म्हणतील ' ही काय भानगड आहे ? आम्हांला कसले हक्क ?' असें म्हणून त्या स्तंभितच होतील व अशा स्तंभित होणाऱ्या स्त्रियांचीच संख्या अधिक. कारण रूढीराक्षसीनें इतकी जबरदस्त भूल आम्हांला दिली आहे कीं, आम्ही कोण हेंच भान आमचें हरपलें आहे व खऱ्या वैदिक धर्माला तिलांजलि देऊन स्मृतिकार व त्यांवरील भाष्यकारांनीं आपल्या मंत्रांनीं आम्हांला भारून ' आम्ही माणसें नाहीं, वस्तु आहोंत, पशूपेक्षां आम्ही निराळ्या नाहीं. खरोखरच नाहीं. ' ही भावना आमच्या मनावर दृढमूल करून टाकली आहे. मोहिनी विद्येच्या जोरावर एकादा मांत्रिक पुरुषालाही आपण स्त्रिया आहों असें भासावयाला लावतो. तसेंच स्मृतिकारांनीं रूढि व आचार यांच्या जोरावर आम्हांला वस्तु केलें आहे व त्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, आम्हांला त्यांत आनंदच आहे. कारण गतकालांतील मनुष्यत्वाची जाणीव मरून अगर मारून नाहींशी झाल्यावर सुख–दुःख कसलें ?

परंतु हा मोहिनी मंत्राचा जोर नाहींसा होऊन कांहीं स्त्रियांना गतकालचें वैभव स्वच्छ दिसूं लागलें व ' काय ही आपली अवस्था ? तें पूर्वीचें वैभव कसें लाभेल ? ' याविषयीं त्यांना अहर्निश तळमळ लागली. आपल्या भोंवतीं मंत्रमुग्ध

झालेल्या स्त्रिया मूर्च्छित होऊन पडलेल्या पाहून त्यांचे हृदयपाश तुटूं लागले व त्यांची उन्नतीसाठीं धडपड सुरू झाली. प्रत्येक कुटुंबांतील कर्णधार स्त्रिया विमोहित झाल्यानें तुफान दर्यात कुटुंबस्वरूप कोट्यवधि तारवें वाऱ्याबरोबर भडकत चाललेलीं त्यांनीं पाहिलीं, तेव्हां त्यांनीं बंधुवर्गाला अत्यंत दीनपणें विनवून विचारलें कीं, या तारवांना मार्गावर आणण्याचा उपाय काय ? आणि हीं अशीं भडकलीं कशीं ?

तेव्हां स्मृतिकारांचे तत्त्वप्रसारक म्हणूं लागले कीं " कुठें ? हीं तारवें भडकलीं नाहींत. आणि त्यांतील कर्णधार स्त्रियाही मूर्च्छित नाहींत. त्या पूर्वीपासून अशाच मनोवस्थेंत आहेत. आणि त्यांचीं कुटुंबेंही अशींच आहेत. " पण कांहीं सहृदयांना ही फसवणूक आवडली नाही. त्यांनीं Paul Bert नामक प्रख्यात फ्रेंच शिक्षणाधिकाऱ्यासारखा मंत्र दिला. Baul bert म्हणतात,

If you educate a boy you educate a single individual, if you educate a girl you train up a whole family, and it is therefore worthwhile to put oneself at greater expense for education for girts than it is for boys. "

एका मुलीला ज्ञानदीप मिळाल्यास ती सर्व कुटुंब उज्ज्वल करते. मुलाचा ज्ञानदीप हा स्वतेजाची वृद्धि करतो. तेव्हां कुटुंबांतील मुलींच्या हातीं ज्ञानदीप देणें अधिक महत्त्वाचें आहे. अशा तऱ्हेचा कानमंत्र ऐकतांच कांहीं स्त्रियांना स्पष्ट कळून आलें कीं ज्ञान गमावून बसल्यामुळें या जडधी स्त्रिया समाजाचें तारूं बुडवीत आहेत. हें ज्ञान झालेल्या स्त्रिया स्वतः ज्ञानी होऊन बंधुवर्गाबरोबर चालूं लागल्या. सौ. सरोजिनी नायडूसारख्या राजकारणांत चमकूं लागल्या. मथुलक्ष्मी रेड्डीसारख्या कौन्सिलांत तेजस्विनी झाल्या. कु. नेहरूसारख्या वकिली पांचपेंच लढवूं लागल्या. हजारों स्त्रिया शैक्षणिक वल्हीं हलवूं लागल्या, पण अफाट हिंदुस्थानांत एवढ्या स्त्रिया म्हणजे अगाध, निर्मर्याद समुद्रावरील फेसाप्रमाणें होत. त्यांनीं काय होणार ? मंत्रमुग्ध जडधींची जडता कुठें गेली आहे ? त्या तशाच अचेतन राहिल्या आहेत. त्यांना Paul Bert अगर त्यासारखेच उद्गार काढणारे हर्टहॉग यांच्या उद्गाराची किंमत कुठें कळत आहे ? हजारांतून एकादी स्त्री शिक्षण

घेणारी. त्यांतून स्वजातीसाठीं झटणाऱ्या स्त्रिया अगदींच हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या. ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. वैदिक काळीं उपभोगलेले हक्क व त्या एकेक हक्कांना स्मृतींनीं व तदनंतरच्या स्मृतींवरील भाष्यांनीं दिलेला काट पाहून ज्या बंधुवर्गाचें हृदय हळहळतें त्यांनीं स्त्रियांना पूर्ववैभव आणून देण्याचा प्रयत्न करणें हें सध्यां निर्जीवांना सजीव करण्याइतकेंच कठिण आहे !

सजीव स्त्रियांना निर्जीव बघण्यांतच कांहींना—नव्हे पुष्कळांनाच आनंद आहे. ' गृहिणी गृहमुच्यते ' म्हणावयाचें, पण गृह निश्चेतन. गृहिणीही मेढखांबासारखीच निश्चेतन. " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः " हें वचन किती गोड आहे! पण वस्तुस्थिति पहातां अशी दिसते कीं नारी ह्या पूज्याकार आहेत. नुसत्या पूजा करण्याला योग्य आहेत, त्यांची देव्हाऱ्यांत स्थापना करावयाची, मग दगडाच्या देवता व या देवता बसतील खेळत.

ही स्थिति निश्चित उद्वेगकारक आहे. स्त्रियांची देवता म्हणून स्थापना व्हावयास नको आहे. त्यांची मानुषी म्हणून स्थापना व्हावयास पाहिजे आहे. त्यांच्याबद्दल गाइलेलीं गोड गाणीं आंत जहरी आहेत.

त्या गोड गाण्यांनीं निष्क्रिय झालेल्या, स्वत्व विसरलेल्या स्त्रिया या समाजाचा नाश करीत आहेत. वेड्या राजांचे पोवाडे होतातच. भाट चारण त्यांची स्तुतिस्तोत्रें गातातच. कां? तर त्यांच्या पैशाकडे पाहून. त्याचप्रमाणें सदैव स्त्रियांचे पोवाडे कशाकरितां होतात,तर त्यांच्यांतील गायीसारखा गरीबपणा, अमानुष वागणूक मिळत असतांही त्यांचा चंदनाप्रमाणें झिजण्याचा देहस्वभाव, निस्सीम, अत्यंत आंधळी श्रद्धा याचसाठीं त्यांची स्तुति. त्यांच्यांतील हे गुण कोणत्याही माणसाळलेल्या प्राण्यांत दिसतील. झांशीची एकच लक्ष्मीबाई जर स्त्री जातींत असती तर तो अपवाद म्हटला असता. पण राणी दुर्गावती, जोहार बाई अशा शूर स्त्रिया काय थोड्या होत्या ? ज्ञानी स्त्रिया थोड्या होत्या ? वेदापासून दृष्टि टाकीत टाकीत यावें कीं प्राचीन परंपरेंत स्त्रीरत्नें झळकलेलीं दिसतील. मग त्यांना मलिनपणा कोणीं आणला ? कोणत्याही समाजांत नाहीं इतकी उज्ज्वल स्थिति स्त्रियांची असतां त्यांना निस्तेज कोणीं केलें ? त्यांना ग्रासलें कोणीं ?

रूढि व वैदिक हिंदुधर्मावरील भाष्यांनीं. " बहवो बहु जानन्ति सर्ववेद न कश्चन " या उक्तीप्रमाणें कोणालाही वैदिक धर्माचा सर्वस्वी उलगडा झाला

नाहीं. मग रूढि, आचार व स्वतःचे विचार यांच्या मेळानें प्रत्येक वेळीं हिंदु-धर्मवचनें बदलत जाऊन स्त्रियांच्या मानेभोवतालचा फांस घट्ट होत चालला.

कालानें धर्म पालटला !

" श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः **क्रमप्राप्तैरथापि वा ।**
स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।
शास्त्रोक्ताचारशीलश्च सवै हिंदु सनातनः "

इ. क्रमप्राप्त गोष्टी आचरण्यानें हिंदुधर्म पालटतां पालटतां सनातनच राहिला. लाखों वर्षांच्या कालांत वेदोदधींत बुड्या मारून ज्यानें त्यानें आपलीं आवडतीं रत्नें बाहेर काढलीं. कोणीं शिंपा काढल्या, कोणीं नक्रच काढले ते स्त्रियांना ग्रासायला सोडून दिले ! यावरून खरीं धर्मवचनांचीं रत्नें सर्व अशीं कोणालाच लाभलीं नाहींत. कित्येक दुर्दैवी प्राण्यांच्या हातीं मात्र शंखच सांपडले

निरनिराळ्या स्मृतिकारांनीं आपलीं वचनें निरनिराळ्या लोकसमुदायासाठीं सांगितलीं. पण इंग्रज-अमदानींत इंग्रज तरी नवखेच. त्यांनीं सर्व कला एकत्र करून जडस्वरूपीं हिंदु कायदा आसेतु-हिमाचल सुरू केला. त्यामुळें कायद्याची तांतही आसेतुहिमाचल सर्व स्त्रियांच्या मानेला लागून राहिली. त्यांचा दर्जा केला, कायदेशीर हक्क गेले व चेतनाही गेली.

आतां पाश्चात्य राष्ट्रांशीं टक्कर द्यावयाची आहे. तर श्री. हरविलास शारदांनीं म्हटल्याप्रमाणें रूढींच्या शृंखला तोडून स्त्रीपुरुषांपैकीं प्रत्येकाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक साधनांचा पूर्ण उपयोग करण्याला अवसर मिळाला पाहिजे. प्रगमनशील मन, विधायक कार्य आणि कर्त्या स्त्रिया पाहिजे आहेत. म्हणजे प्रत्येक समाजघटकाला आत्मज्ञान होऊन आपोआपच नवें युग निर्माण होईल. पण हें सर्व केव्हा ? स्त्रियांना दर्जा प्राप्त होईल तेव्हां. पुरुषवर्ग डोमिनीयन स्टेटससाठीं भांडत आहे. त्यांनीं खुशाल भांडावें. स्त्रियांचा त्यांना पाठिंबा आहे. त्यांना सध्यां डोमिनीयन स्टेटस साठीं भांडायचें नाहीं. त्यांना 'डोमेस्टिक' स्टेटस द्या; तें त्यांना पाहिजे आहे. त्यांच्या ' डोमेस्टिक ' स्टेटसची रूपरेखा पुढील प्रकरणांवर टाकून देणें युक्त होईल.

प्रकरण २ रें

वैदिककाल व स्मृतिकाल

द्रव्यसंचय जमिनींत पुरलेला असावा; लोभी माणूस वर घर बांधून राखण करीत असतो. पण पुरलेलें द्रव्य जागच्या जागीं फार काल रहात नाहीं. स्त्रियांच्या वैभवाचेंही तसेंच झालें आहे. वैदिक काळांतील त्यांचे वैभव पार पुरलें गेलें आहे. कालाच्या तडाख्यांत तें दूरवर गेलें, पण स्त्रिया कफल्लक झाल्या असूनही जणूं तें वैभव अजून आहेच अशा आनंदांत आहेत. स्त्रिया आपल्याकडून कसून राखण करीत आहेत. पण कशाची राखण करायची हेंच माहित नसल्यानें ऐन ऐवजीं त्या बुडाल्या तरी काय गमावलें ही जाणीव त्यांना झालेली नाहींच. गतकालचें वैभव नुसतें शेखी मिरविण्यासाठीं आठवायचें नाहीं पण तें परत मिळवण्यासाठीं प्रयत्न करतांना 'आम्ही जुनें होतें तेंच द्या म्हणतों' असें म्हणण्यापुरतें तरी तें वैभव आठवलें पाहिजे.

वैदिक काल

इतर समाजाच्या इतिहासांत स्त्रिया या आरंभापासूनच कःकिंमतीच्या गणलेल्या होत्या. पण हिंदू समाजाची तशी स्थिति नाहीं. पूर्वकाळीं स्त्रियांचा दर्जा निःसंशय मोठा होता. ज्या वेदाभ्यासाचा अधिकार स्त्रियांकडून सर्वस्वी काढला गेला त्या वेदाचा अभ्यासच नव्हे तर प्रत्यक्ष कांहीं वेदमंत्रही स्त्रियांनीं रचलेले आहेत. विश्ववारा, अपाला, वसुकपत्नी, यमी, घोषा, वाच्, श्रद्धा इत्यादि अनेक मंत्रद्रष्ट्या स्त्रियाहि आपल्याला ऋग्वेदांत दिसतात. त्याहि हविर्भाग देऊन निरनिराळ्या देवतांना प्रसन्न करून वरप्राप्ति करून घेत. इंद्राणीसारख्या सवतीमत्सरानें जळणाऱ्या स्त्रियाही त्यांत आहेत. तर उलटपक्षीं वीरवृत्तीच्या स्त्रियांहि नाहींत असें नाहीं.

कक्षीवानाची कन्या घोषा ही म्हणते– "हे अश्वीहो, घोषा तुमची स्तुति करीत आहे. माझें स्तवन ऐका आणि **आईबाप पुत्राला देतात त्याप्रमाणें मला शिक्षण द्या.** बांधवांना सोडावयास लावणारी मूर्खपणाची आणि अयोग्य बुद्धि माझ्या मनांत उत्पन्न होत आहे तिच्यापूर्वीच मला तारा." ऋग्वेद १०–३९

घोषेला पुत्राप्रमाणेंच शिक्षणाची लालसा होती; एवढेंच नव्हे तर ती पुढें म्हणते, " हे नेते अश्वीहो, तुम्हांला तुमची सेवा करणारी राजा कक्षीवानाची मुलगी घोषा बोलावते आहे आणि अश्वीविषयीं माहिती विचारते. तसेंच तुम्ही मला दिवसरात्रीं सहाय्यक व्हा. तसेंच रथयुक्त शत्रूशीं लढण्यास मला समर्थ करा" ऋ. १०-४०

स्त्रियांमध्यें पुरुषांपेक्षां भीरुतेचें प्रमाण अधिक असलें तरी त्या भीरुतेची जोपासना करण्यानें व करूं देण्यानेंच स्त्रिया अधिक दुर्बल झाल्या. पण अबला या वैदिक कालीं सबलाही होत्या. याचें उदाहरण राजकन्या घोषा ही आहे. तिनें शिक्षणाबरोबर लढाऊ सामर्थ्यही पैदा केलें व मग " बलवान्, वीर्यवान्, पत्नीवर प्रेम करणाऱ्या पतींशीं " विवाह केला. घोषेप्रमाणेंच दुसरें उदाहरण विश्पलेचें आहे. कक्षीवान् ऋषि अश्विनी कुमारांना म्हणतो—

" पक्ष्याचा पंख तुटावा, त्याप्रमाणें लढाईंत खेलाच्या विश्पलेचा पाय तोडला गेला, तेव्हां पहाटेच लोखंडाचा पाय बसवून तिला पुन्हां युद्धांत संचार करण्यासाठीं तयार केलीत. " १.११७.१५

विश्पला पाय तुटला असतांही लोखंडाचा पाय लावून युद्धाला तयार झाली. स्त्रियांना भ्याड समजून त्यांच्या ललाटीं पराक्रम नाहींच म्हणणारांनीं हीं उदाहरणें पाहाण्यासारखीं आहेत. ऋग्वेदकालीं घर ऐवढेंच स्त्रीचें अधिष्ठान समजलें गेलें नव्हतें. रणांगणावरही त्यांनीं पराक्रम गाजविला. पुरुषांचे बरोबरीनें शिक्षणही घेतलें. वाचूसारखी मंत्रद्रष्टी स्त्री तर महाज्ञानी असून अधिकारवाणीनें आत्मविश्वासानें बोलत आहे. त्यासाठीं १०.१२५ हें सबंध सूक्तच वाचण्यासारखें आहे. ती म्हणते, " जें ज्ञान देव व मनुष्य यांनीं अनुभविलें आहे तें मी स्वतः सांगतें. ज्याला मी इच्छितें त्याला मी श्रेष्ठ करतें, त्याला ब्राह्मण करतें, त्याला ऋषि करतें आणि त्यालाच बुद्धिमान करतें. ब्रह्मद्वेष्ट्या खाष्ट शत्रूंना ठार करण्याकरितां मी रुद्राचें धनुष्य सज्ज करतें, लोकांशीं युद्ध करतें, तसेंच मी द्यावापृथ्वींत व्यापून आहें. स्वर्गापेक्षां आणि पृथ्वीपेक्षा श्रेष्ठ असणारी मी आपल्या सामर्थ्यानेंच एवढी निर्माण झालें. " सर्व सूक्त येथें देणें शक्य नाहीं. पण तें स्त्रीचें अलौकिक सामर्थ्य पट-विणारेंच आहे. शिक्षण, शौर्य, बुद्धिमत्ता या बाबतींत स्त्रिया या रेसभरही मागें नव्हत्या हें दर्शविण्यास एवढीं उदाहरणेंही पुरेशीं आहेत.

श्यावाश्व ऋषींच्या सूक्तांत स्त्री ही पुरुषाची अर्धांगी ही कल्पना अगदीं उर-फाटी करून स्त्रीचें पुरुष हें अर्धांग असें म्हटलें आहे. श्यावाश्व म्हणतो—

" देवभक्तिहीन व लोभी पुरुषापेक्षां शशीयसी एक स्त्री असली तरी श्रेष्ठ आहे. तिला आपला पति मारकट, लसलस करणारा असें कळलें तरी ती आपलें मन देवाकडे लावते. तिचा अर्धभाग म्हणजे पति अगदींच अश्लाघ्य वर्तनाचा व कंजुष असें मी म्हणतों. "

विवाहाचे बाबतींत पाहूं गेल्यास प्रौढ विवाहच अस्तित्वांत होते. 'वीर्यवान् बलवान् पत्नीवर प्रेम करणाऱ्या पतीची ' प्राप्ति व्हावी यासाठीं देवतांना आळविणाऱ्या शिक्षित स्त्रिया प्रौढच होत्या. विवाहानंतर स्त्रीबद्दल कल्पनाही उच्च होती. सूर्यासोमाच्या विवाहांत सूर्येला दिलेला आशीर्वाद असा आहे—

" हें बलिष्ठ इंद्रा, ही स्त्री ज्यायोगें पुत्रवती व भाग्यशाली होईल असें तूं कर......तूं घरीं जा आणि घराची मालकीण हो. सर्वांना ताब्यांत ठेवणारी तूं घराशीं आपलेपणानें बोल. या घरांत घरधनीणपणाविषयीं तूं जागृत रहा. हे वधू, तूं सासू, सासरे, दीर, नणंदा यांच्यावर छाप ठेवणारी हो. सर्व देव तुमचीं मनें एकविचारानें युक्त करोत. उदक, वायु, धाता हे सर्व तुमचीं मनें जुळवोत. "

वैदिक कालांत स्त्रियांबद्दल हीन कल्पना तर नव्हतीच; बुद्धीचा विकास होण्यास त्यांना पूर्ण वाव होता. त्यामुळें त्यांना समाजांत मान होता.त्या सामर्थ्यवान होत्या. त्यांना धर्मक्रिया पुरुषाप्रमाणें करता येत होत्या. या कल्पना उपनिषत्कालींही तशाच स्थिर होत्या. यम, हारीत यासारख्या विद्वानांनीं तर पुरुषाप्रमाणें स्त्रियांनांही चतुराश्रम मोकळे असल्याचें सांगितलें आहे.

स्त्रियांबद्दल असणारी उच्च भावना ही ७ व्या शतकानंतर मावळली व त्यांच्या स्वातंत्र्याभोंवतीं एकेक पाश पडूं लागून त्याचे हक्क सर्वस्वी हरण केले गेले.

" पुरा कल्पे कुमारीणां मौञ्जीबंधनमिष्यते ।
अध्यापनं च वेदानां सावित्रीवचनं तथा ।।
पिता पितृव्यो भ्राता वा चैनामध्यापयेत्पुरः ।
स्वगृहे चैव कन्याया भैक्षचर्या विधीयते ।।
वर्जयेदजिनं दण्डं जटाधारणमेवच ।
तमतिक्रान्तकालाच्च पतिताः सर्व एव ते "

या सर्व ओळी वाचून मौञ्जीबंधनापासून सर्व आश्रम पुरुषाप्रमाणें पाळणाऱ्या स्त्रिया या कालांतरानें पतित झाल्या अगर समजल्या गेल्या. त्यामुळें त्यांचें ज्ञान, त्यांचे गुण सर्व विलयाला जाऊन मनूसारख्यांनीं त्यांच्याबद्दल फारच अनुदार व हीन उद्गार काढले. " स्त्रिया पुरुषांचें वय अगर सौंदर्य कांहींच पहात नाहींत तर ' सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुंजते ' " स्त्रिया या कामासक्त निःस्नेह व चंचल असल्यानें त्यांचें फार जपून रक्षण केलें पाहिजे. " यांत स्त्रियांना मनू हा पशुवृत्तीच्या लेखतो असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. स्त्रियांच्या सांनिध्यांत पुरुषानें सावधान राहावें, कारण त्या त्याला अडमार्गाला नेतात. मनूनें स्त्रियांना आड मार्गाला नेणाऱ्या म्हणण्यांत पुरुषाची केलेली किंमत –त्यांच्या मनाचा दुबळेपणा हा त्याच्या लक्ष्यांत आला नाहीं, तरी तो स्त्रियांच्या दृष्टींतून सुटणें शक्य नाहीं. आपले दोष झांकण्यासाठीं दुसऱ्यांना शिव्या देण्याचाच हा प्रकार आहे ! वैदिक कालच्या ज्ञानी व बलाढ्य स्त्रियांबद्दल उल्लेख वाचल्यावर मनूचे पुढील उद्गार तर आश्चर्यकारक वाटतात. तो म्हणतो. ' स्त्रिया या दुर्बल व वेदाभ्यासशून्य असल्यानें त्या अनृतासारख्याच अपवित्र समजाव्या ! ' स्त्रियांचे वैदिक धर्मविधीही अमान्य करण्यांत आले. मनूच्या स्मृतींत प्रथम मुलींची अष्टवर्षा विवाहाची मर्यादा घातली गेली.

मनुस्मृतींतील या उद्गाराकडे पहातां वेदउपनिषदें यांच्या कालानंतर एवढें स्थित्यंतर होण्याचें कारण काय हा साहाजिकच प्रश्न येतो. ही कारणमीमांसा दोन तीन तऱ्हांनीं लावतां येईल. उपनिषत्कालानंतर शिक्षित स्त्रियांनीं विवाह-विचार करण्याचें सोडून दिल्यानें वंशवृद्धि कमी झाली असावी. मनुस्मृतींत वंशवृद्धि व गृहकृत्यें या दोहोंनीं स्त्रीला इतकी जखडून टाकली कीं, स्त्रीचें कार्य यापलीकडे असणें शक्य नाहीं ही कल्पना रूढ झाली. पुत्रजन्माला विलक्षण महत्त्व आलें. या गोष्टी पहाता या कल्पना रूढ होण्यास कारण स्त्रियांची ज्ञानलालसा व संसारपराङ्मुखता असेल असें वाटतें. व त्यामुळें ज्या ज्ञानाची त्यांना इतकी लालसा तें वैदिक ज्ञान त्यांजपासून पूर्णपणें हिरावून त्यांना गृहकारागारांतच टाकून दिल्या. दुसरें कारण प्रौढ विवाहामुळें व चतुराश्रमाची परवानगी नसल्यानें प्रौढ विद्यार्थ्यांचीं मनें वेदाभ्यासापासून चलित होत असतील व त्यामुळें मनूसारख्या शहाण्यांनीं या स्त्रियापासून सावध राहण्याबद्दल ताकीद दिली असेल।

तिसरें कारण स्त्रियांना पावित्र्य राखणें जड जात असेल. हीं कारणें म्हणजे निवळ कयासच होत. पण मनूच्या अनुदारपणावद्दल तिटकारा येतो तरी त्यानें इतकें जुलमी धोरण स्वीकारण्यास, तत्कालीन परिस्थिति व पूर्वेतिहास हाहीं कांहीं असाच असेल कीं त्यामुळें मनूला असे उद्गार काढावे लागले असावे. मनूनें पहिल्या अध्यायांत म्हटलें आहे—

आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एवच ।
तस्मादस्मिन्सदायुक्तो नित्यं स्यादात्मवान्द्विजः ॥

मनूचा कायदाहि तत्कालीन रूढाचारांवर अधिष्ठित असल्यानें त्यानें समाज पाहून तसें नियंत्रण घातलें. पण त्यांत स्त्रियांच्या मानेभोवतालची तांत आपण किती बळकट करीत आहों, व उलट पुरुषांना वाटेल तसें मोकळें सोडून आपण किती पक्षपात करीत आहों, याचा परिणाम किती अतिरेकाला जाईल हें त्याच्या ध्यानांत आलेलें नाहीं,त्यामुळेंच त्यांची विवाहाची अष्टवर्षाची मर्यादा पाळण्यांतील लग्नापर्यंत आली. स्त्री ही गोठ्यांतील गाईहूनही कमी किंमतीची झाली!

मनूनंतर होऊन गेलेल्या कायदेकारांना हा अन्याय दृष्टीआड करतां येईना. पण सर्व मनुस्मृति झुगारणें त्यांना शक्य नव्हतें व तें धैर्यही त्यांना कदाचित् नसेल. तेव्हां भिकाऱ्यापुढें तुकडा टाकावा त्याप्रमाणें उदार मताचा आव कित्येकांनीं आणला. नारदानें म्हटलें, स्त्रिया या परतंत्र कशा तर प्रजा राजाचे ठिकाणीं परतंत्र असते तशा. परतंत्र याचा अर्थ मर्यादित घ्यावयाचा. मीमांसासूत्रकार जैमिनी मात्र सणसणीतपणें म्हणतो कीं, वेदांकडे पाहतां स्त्रिया या गुलाम अगर पशुवृत्तीच्या नाहींत. त्यांना संपत्तींत व धर्मकार्यांत बरोबरीचे हक्क होते व हें वेदांचें वचन स्मृतींतून अवमानिलें असेल तर त्या स्मृति मानण्याचें कारण नाहीं. हें जैमिनीचें म्हणणें कोणाही स्वाभिमानी व विचारी स्त्रीस पटेल. दायभागाचा कर्ता जीमूतवाहन यानेंहि पूर्वींच्या कायदेकारांची दूषित विचारसरणी खंडून स्त्रियांना कांहीं दर्जा प्राप्त होईल असें केलें. पण आकाशच फाटलें तेथें ठिगळ कोठें लावणार ? एकाच आईबापांचीं मुलें पण कन्या व पुत्र यांकडे पहाण्याच्या, त्यांना वागविण्याच्या पद्धतींत जमीन–अस्मानाइतकें अंतर ! तें आईबापांचें प्रेम नाहीं म्हणून नव्हे, तर रूढि व स्मृतिकारांचे कायदे यामुळें. स्त्रिया सुधारणेच्या शिखरावरून लोटून दिल्या त्या खोल गर्तेंत पडल्या.

पुनः तेथें जाण्यास त्यांना कित्येक अडचणी आहेत. त्या पाहिल्या पाहिजेत व दूर केल्या पाहिजेत, तरच सर्वांची उन्नति होईल.

प्रकरण ३ रें

लग्नाचा बाजार

वरदक्षिणा कीं कन्याविक्रय ?

हिंदुस्थान म्हणजे अजबखाना आहे. त्यांतील रीतीरिवाजांचे असंख्य नमुने पाहून एकादा मनुष्य गोंधळून जाईल. एकच हिंदु धर्म पाळणाऱ्या शेकडों जातींतील शेकडों रीति पाहिल्या म्हणजे त्यांची मिळणी कशी व्हावयाची हा प्रश्न पडतो. त्यांच्यापायीं होणारें नुकसान पाहून उद्वेग वाटतो.

आपल्यांत म्हण आहे कीं, घर बांधून पहावें आणि लग्न करून पहावें. म्हणजे दोन्ही गोष्टींत मनुष्याची संपत्ति इतकी उधळली जाते कीं त्या काळजीनें मनुष्याचा क्वचित् मृत्यूहि लवकर ओढवतो.

मुलींच्यावर अकृत्रिम प्रेम करणारीं आईबापें आपल्या मुलींना सुस्थळें मिळावीं या आशेनें घरदाराची विल्हेवाट लावून मुलींचीं लग्नें करून देतात. आणि एवढें करूनहि मुलींच्या पुढील सुखाची कांहींच खातरजमा देतां येत नाहीं. हिंदूंत कांहीं जाती अशा आहेत कीं, त्या मुलींचा हुंडा न घेतां मुलांचा हुंडा घेतात. पण एकंदरींत हिंदूंच्या लग्नाला विक्रयाचें स्वरुप असतें हें १९११तील सेन्सस रिपोर्टमध्यें केलेलं विधान अक्षरशः सत्य आहे.

या बाबतींत पूर्वीची स्थिति अगदीं निराळी होती.

कन्येसाठीं पैसा घेणें अगर तिला विकणें हें स्मृतिकारांनीं गर्ह्य ठरविलें आहे. पूर्वीं भेट म्हणून पित्यानें दिलेली संपत्ति ही धर्मक्रियांसाठीं खर्च होई. आतां हुंडा हा मुलांच्या शिक्षणाचा खर्च म्हणून घेतला जातो. अगर लग्न ही वधूच्या आई-बापांना लुटून संपत्ति मिळविण्याची आयुष्यांतील एकच संधि म्हणून अवास्तव

हुंडा घेतला जातो. वधूकडून हुंडा घेणें अगर वराकडून घेणें दोन्हीही प्रकार तितकेच निंद्य आहेत.

स्वसुखापेक्षां उच्च दृष्टि ठेवून पूर्वीप्रमाणें विवाहबद्ध होणें हेंच खरोखर उचित आहे. पण सध्यांचे लग्नप्रसंग पहातां त्यांतील खरें गांभीर्य नष्ट होऊन तेथें रागद्वेषादि विकारांचा नुसता थयथयाटच अधिक असतो. वधूवरांना ही जबाबदारी कळवून घेण्याची फुरसद नसते. विवाहमंत्रांची किंमत भाषेच्या अज्ञानानें कांहींच कळत नसल्यानें उपाध्यांच्या तंत्राकडे निरर्थक बडबड यापेक्षां अधिक लक्ष दिलें जात नाहीं. वस्तुतः विवाहमंत्र हे वधूवरांना त्यांची जबाबदारी जाणवून देणारे असल्यानें त्यांच्या स्वभाषेंतच ते मंत्र त्यांना ऐकविले पाहिजेत. वधूवरांनीं घ्यावयाच्या शपथा दोघांनींही समजून घेतल्या पाहिजेत. विद्युत्प्रवाह जसा शरीरांतून जावा त्याप्रमाणें वधूनें वराच्या हाताला हात लावून मंत्र तिच्या अंगीं बाणत असेल ही कल्पना हास्यास्पद आहे. स्वमुखानें वधू मंत्र म्हणत असे हें ऋग्वेदांतील सूर्येच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसतें. तर ती गोष्ट व विवाहांतील उच्च हेतु हा जो खरा वैदिक धर्म तो त्यागून दांभिक धर्म कां घ्यावा ? उच्च हेतूंनीं प्रेरित होऊन स्वखुषीनें एकमेकांच्या उन्नतीसाठीं वधूवर विवाहबद्ध झालीं पाहिजेत; त्याला क्रयविक्रयाचें स्वरूप येऊन लग्नाचा बाजार मांडू नये.

लग्नें जुळविणारे दलाल

कित्येकांना विवाहाकरितां स्थळांची निवड करण्यास अतिशय पंचाईत पडते याचें कारण जात लहान असते व त्यांतही आणखी कित्येक भानगडी असल्यानें वधू अगर वर मिळणें कठिण जातें. अशा स्थितींत विवाह जुळवून देणारे त्रयस्थ असतात. त्रयस्थांच्या मदतीचा कित्येक प्रसंगीं उपयोग होतो; पण हे त्रयस्थ दलाली करूं लागले म्हणजे वधूवरांच्या हितापेक्षां आपल्या पिशवींत पैसा, कसा व किती येईल हेंच ते अधिक आस्थेनें पहातात. मुंबईइलाख्यांत लग्न जुळवून देण्याबद्दल शंभरापासून हजारांपर्यंत रुपये उकळतात असें स्टीलनें लॉ ॲन्ड कस्टस ऑफ हिंदू कास्टस् या पुस्तकांत म्हटलें आहे! अर्थात् हे व्यवहार गुप्त रीतीनें होतात अगर गरजू आईबाप गुप्त ठेवतात, ही गोष्ट निराळी. पण कायद्याच्या दृष्टीनें विवाह जुळवून देण्याच्या अटींवर पैसे घेणें ही अनीतिच आहे. असल्या व्यवहारांत किती फसवणुकी होत असतात हें कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. (२२

मुंबई ८१२) व्यंकटाचार्लू वि. रंगाचार्लू या खटल्यांत सप्तपदी वगैरे समारंभ होऊन लग्न पुरें झालें असलें तरीही कोर्टानें तें रद्द समजावें असें ठरविलें आहे. दलालांकडून होणारे करार बेकायदा समजले जातात. त्या करारांप्रमाणें पैसे न दिल्यास वधूवर अगर तिच्या पालकांवर फिर्याद लावल्यास दलालाला पैसे मिळू शकत नाहींत असें काल्वकंट वेंकट विरुद्ध काल्वकंठ लक्ष्मी या खटल्यांत सिद्ध झालेलें आपणास दिसतें.

पालकांनीं आपल्या मुलाचें लग्न जुळविण्यासाठीं लयस्थाला पैसे देऊं करणें अगर हीन हेतूंनीं प्रेरित होऊन पैसे देऊन अगर घेऊन पालकांकडून विवाहाची संमति घेणें या सर्व गोष्टी बेकायदा करारांत गणल्या जातात. हे करार कोर्टांत फिर्याद लावून अमलांत आणतां येत नसले तरी सद्यःस्थितींत दलालानें विवाह जुळवून आणून आपली तुंबडी भरल्याचीं हजारों उदाहरणें दृष्टीस पडतात.

दलालींत उच्च हेतूपेक्षां फसवणूकच अधिक असते. पण लग्न ही ब्रह्मगांठ असल्यानें झालेलें लग्न मात्र कायम राहतें !

लग्नखर्च

आमच्यांतील लग्नें म्हणजे रणधुमाळी बरी म्हणावयाची. लग्नभूमि म्हणजे रणभूमि. या रणभूमीवर विहिणीविहिणींचीं भांडणें उखाळ्यापाखाळ्या या रणदुंदुभि. त्यांच्या आवाजानें पुलकित होऊन दोन्ही बाजूंचे योद्धे रणार्थ सज्ज होतात. वधू-पक्षाची स्थिति उत्तर बाळासारखी होते. स्वतःशींच गडबडून बडबड करण्यापलीकडे कांहींहि करण्याचें सामर्थ्य वधूपक्षांत नसतें. वरचढ वरपक्षवधूपक्षावर चढाई करून जातो. त्यावेळीं रणांगणावर मानवहानि व्हावी त्याप्रमाणांत वधूपक्षाची मानहानि होत असते. खऱ्या युद्धांत व या युद्धांत फरक एवढाच कीं, वधूपक्षाची सेनानायक वधू व वरपक्षाचा सेनानायक वर यांची आज्ञा कोणीच न मानतां व्याही-सैनिकांत बेबंदशाही सुरु असते. रणांगणावार उभयपक्षीं तोफखाना सुरु होतो. वधूपक्ष कमजोर तेव्हां तोफखाना केवळ वरपक्षाकडूनच डागला जातो. वधू-पक्ष नामोहरम आधींच झालेला असतो. मग जेवढी चीजवस्त खंडणीदाखल लुटतां येईल तेवढी लुटून घेऊन वधूपक्षाला जीवदान मिळतें व कायमचें मांडलीकपणाचें नातें सुरू होतें ! पण एवढेंच होऊन भागतें थोडेंच ! दिवाळसणासारखे नजराणे जर आले नाहींत तर ओलिस असलेल्या वधूच्या जाचाला प्रारंभ होतो. इतकेंही

होऊन मनःस्वास्थ्य कोणालाच नाहीं. वरपक्ष सदैवच हपापलेला. लुटीची महत्त्वाकांक्षा पुरी कधींच होत नाहीं. वधू ही कायमची आपल्या पक्षाला आणूनही तिचे हाल शत्रुपक्षाप्रमाणें होतात.

' अर्थोहि कन्या परकीय एव, ' परक्याचा अर्थ परक्याला देऊन भित्याचें स्वतःचें घर अगदीं संपत्तिशून्य होतें. सर्वांचे मानपान संभाळायाचे. कां? तर मुलीला सुख लाभावें म्हणून! सर्वस्वाची राखरांगोळी मुलीच्या सुखासाठीं केल्याचीं उदाहरणें आपल्याकडे थोडीं का आहेत?

बरें, ही राखरांगोळी करून, लग्नाचा धडाका उडवून, तो पैसा वधू अगर वरपक्षांपैकीं कोणाच्याच पदरांत पडत नाहीं. भटजी, ताशेवाले, बत्तीवाले, बँडवाले, शेजारींपाजारी, बोलावून आणलेल्या मानकरणी व सहस्रभोजनाच्या जेवणावळी हींच तो पैसा घेऊन जातात व पुनः सर्व कफल्लक!

आपली सर्वांचीच आर्थिक स्थिति इतकी खालावलेली आहे कीं असे पैसे उधळण्याचे पेशवाई दिवस आतां राहिले नाहींत; पण आमचे डोळे उघडतात कोठें?

यापेक्षां ही उधळपट्टी थांबवून वधूपक्षीं लग्नाला खर्च करण्याची जेवढी ऐपत असेल त्या मानानें आकडा ठरवून त्याच्या तृतीयांश द्रव्य वधूला स्त्रीधन म्हणून द्यावें. ज्यांना बद्ध करण्यासाठीं उठाठेव त्यांना या पैशांचा उपयोग तरी होईल.

लग्न म्हणजे सण होय, रण नव्हे. मान घालवा, संपत्ति घालवा, कधीं कधीं सर्वस्वही घालवून लग्नाचा धडाका उडवा असें कोणत्या वेदांत अगर कोणत्या स्मृतींत सांगितलें आहे? ज्या इतरेजनांच्या डोळ्याचें पारणें फिटायचें त्यांना हें पारणें फिटण्यांत तरी आनंद क्षणिकच.

वस्तुतः लग्न लागायचें टाळीनें. तेथें ताशांचा कडकडाट पाहिजे कशाला? बॅन्डवरील मार्चिंग कवायती गीतें अट्टाहासानें गाण्याची काय जरूर? उपाध्याची दक्षिणा ती किती? आणि तिच्या हजारों पटीनें इतरेजनांवर उधळलें जाणारें द्रव्य किती?

हौस करायची तर करा; पण जरा कांहीं सुमार! महिन्याचें उत्पन्न असायचें ५० रुपये आणि मुलीचे लग्नांत कर्ज काढून पांच हजार अगर पन्नास हजार उधळायचे याला काय प्रपंच म्हणावयाचें! यासाठींच मासिक उत्पनाच्या फार तर तिप्पट पैसा खर्च करण्याची मुभा कायद्यानें असावी. करमणुकीवर कर लादावयाचा तर

सुधारणा वर्तमानपत्रांत फडकूं लागल्या, सुप्रसिद्ध रखमाईचा खटला कोर्टांत रंगारुपास आला, संमतिवयाच्या कायद्यामुळें सनातनी व सुधारक यांच्यामध्यें तुंबळयुद्ध होऊन क्रीडाभुवनांत दंगेधोपे झाले, त्या वेळेला किती निकराचीं रणें माजलीं असतील याची कल्पनाच केली पाहिजे. १८८९-९० सालीं देशांत राजकारण इतकेसें पुढें गेलेलें नसल्यामुळें सामाजिक वादांना जोर होता व दादाजी विरुद्ध रखमाबाई हा खटला त्यावेळीं इतका गाजला कीं स्त्रीचें लग्न तिच्या संमतीवांचून झालेलें असेल तर तिला नवऱ्याला टाकता येतें कीं नाहीं, या मुद्यावर डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लाईफमेंबरांत दोन वर्षे भांडणें सुरू होतीं; वर्तमानपत्रांना वर्षभर याशिवाय दुसरा विषय नव्हता व त्यावेळीं पुण्यामुंबईतला असा एकहि प्रतिष्ठित विद्वान अगर पुढारी मनुष्य नसेल कीं हिंदुविवाहाच्या संस्काराची व्याप्ति किती, या तात्त्विक वादविवादाच्या भानगडींत तो पडला नसेल! ज्या कोणाला हा इतिहास नीट माहीत असेल त्याच्या एक गोष्ट चटकन लक्षांत येईल कीं, सामाजिक सुधारणेची प्रगति म्हणजे, वेळोवेळीं झालेल्या या वादांतून लग्न 'संस्काराच्या' अर्थांचिच ती परिणति किंवा स्थित्यंतर होय.

या सर्व पाऊणशें वर्षांच्या वादांतला मुख्य मुद्दा इतकाच कीं स्त्रीचें स्वतंत्र अस्तित्व हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मान्य करतां येतें कीं नाहीं? व लग्नासारख्या गोष्टींतहि तिला आपली संमति देतां येतें कीं नाहीं? व तिनें ती दिली नसेल तर कायदा तिचें स्वातंत्र्य रक्षण करणार कीं मनुप्रमाणेंच "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" म्हणून तिचें अस्तित्व अमान्य करणार? हरविलास शारदा यांच्या मूळ बिलांत "स्त्री ही १४ वर्षांच्या खालीं असेल तर तिची संमति ही कायदेशीर संमति मानली जाऊं नये व तें लग्न रद्द व्हावें" असें कलम होतें तें पास झालें असतें तर तें फार योग्य झालें असतें. कारण स्त्रियांचें स्वतंत्र अस्तित्व त्या योगानें मान्यच केल्यासारखें झालें असतें. पण कदाचित् काळ आला होता पण आज तशी वेळ आली नव्हती म्हणा; पण तशी वेळ अखेर येईपर्यंत "हिंदु विवाह हा संस्कार आहे कीं करार आहे?" हा वादहि थांबणार नाहीं. कित्येक वाद हे प्रतिपक्षास केवळ जिंकल्यानेंच संपत असतात! म्हणून या तात्त्विक परंतु जिव्हाळ्याच्या वादांची रूपरेषाहि स्त्रियांना कळणें अवश्यच आहे.

वस्तुतः लग्नांतील हीं उधळपट्टी करमणुकीसाठींच असते. तीवरही कर कां नसावा? मासिक उत्पन्नाच्या तिपटीपेक्षां जास्त पैसा खर्च करणारावर अवश्य कर लादावा. मात्र त्या कराचा विनियोग गरिबांच्या लग्नाकडे करावा.

हिंदुधर्मपद्धतीनें लग्न झाल्यावरहि त्या लग्नाची सरकारी नोंद असावी. लग्नांत खर्च किती केला, लग्न कोणाचें, ज्याचें लग्न त्यांच्यावर सक्ती झालेली आहे किंवा कसें या गोष्टींची नोंद शास्त्या अधिकाऱ्यापुढें व्हावयास पाहिजे; म्हणजे 'लग्नाचा बाजार' नाहींसा होऊन ती सुसंघटित संस्था होईल.

प्रकरण ४ थें

विवाह हा संस्कार कीं करार ?

स्त्रियांच्या सर्व हक्कांच्या बाबतींत जर कोणची वादग्रस्त, तंट्याची व अवघड बाब असेल तर ती विवाहसंस्कारांचें खरें स्वरूप काय याविषयीं होय. हिंदु-लग्न हा संस्कार आहे कीं करार आहे ? 'संस्कार' म्हटला तर त्याचा खरा अर्थ काय व व्याप्ति किती ? करार नाहीं म्हटलें तथापि विवाहाचे बाबतींत स्त्रियांना कांहीं विशिष्ट हक्क आहेत कीं नाहींत ? विधवा स्त्रीनें विवाह करणें कायदेशीर आहे असें आतां कायद्यानेंच ठरलेलें आहे; पण एक नवरा जिवंत असतांना केवळ अपवादप्रसंगीं तिला दुसरा विवाह (कायद्यानें नसला तरी) धर्मशास्त्रानें विहित आहे कीं नाहीं ? इत्यादि गोष्टी इतक्या नाजूक, सूक्ष्म व बिकट आहेत कीं नुसत्या स्मृतिवचनांचे आधार दाखवून कोणाची खात्री पटणार नाहीं. त्याकरितां रणें पडतील.

आणि खरोखरच गेल्या पाऊणशें वर्षांचा सामाजिक सुधारणेचा इतिहास पाहिला तर याचें प्रत्यंतर असेंच दिसून येतें. शारदाबिल पास झालें तेव्हां सुधारणेच्या दिशा उजळूं लागल्या होत्या. कांहीं थोड्या धर्ममार्तंडांनीं बोटें मोडलीं इतकेंच. खरें युद्ध असें कांहींच झालें नाहीं ! पण ज्या वेळेला विधवापुनर्विवाहाचा कायदा पास झाला, पुण्यांत ग्रामण्य प्रकरणें झालीं, मलबारांच्या सामाजिक

या कायद्यावद्दलचे वाद पन्नास वर्षें संपूनयेत असा तो खरोखरच चमत्कारिकच आहे! कित्येक भुलभुलावणीचीं स्थळें अगर व्यूह असेच असतात कीं त्यांच्या आंत जातां येते. पण आंत गेल्यावर बाहेर येतां येत नाहीं. स्त्रीच्या दृष्टीनें एकदां लग्नबंधन पडलें कीं तें वज्रलेपच होतें. त्याला अपवाद म्हणून नाहीं! हिंदु धर्माच्या अंतर्गत असलेलें व संस्कार म्हणून मानलेलें लग्नबंधन पतीच्या धर्मांतरानें तरी तुटावें. पण तिच्या गळ्याची ही तांत इतकी घट्ट आवळली गेली आहे कीं तिला अशा स्थितींत पुनर्लग्नाची परवानगी तर नाहींच, पण जर ती धर्मांतर केलेल्या नवऱ्याच्या हयातींत दुसरें लग्न करील तर पीनलकोड तिला सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा फर्माविल्याशिवाय राहणार नाहीं. याचें एक कारण असें कीं पतिपत्नींचें बंधन मनुष्यानें निर्माण केलेलें नसून तें विधात्यानेंच बांधलेलें असतें पतिपत्नी हीं दोघें पूर्वजन्मीं या जगांत तसेंच परलोकांतहि एकत्रच वास करितात असें कित्येक शास्त्रकारांनीं म्हटलें आहे. पण कादंवरी वेगळी आणि वस्तुस्थिति वेगळी. अरसिक, अडाणी माणसाच्या हातीं काव्य पडलें म्हणजे त्या काव्यावरोवरच माणसाच्या व्यवहाराचीहि माती होते. सतीचा जुलूम हें याचेंच उदाहरण होय. विधवाविवाहाला विरोध याच मुद्यावर होता. पण परलोकीं गेलेल्या पतीला पत्नीवर हक्क सांगण्याची इंग्रजी कायद्यानेंच बंदी केली म्हणून विधवा त्यांच्या नातलगांच्या तावडींतून वचावल्या. अव्वल इंग्रजींत शास्त्रीपंडितांना जितका हिंदु कायदा माहीत होता तसाच तो त्यांनीं इंग्रज न्यायाधीशांच्या हवालीं केला. पण इंग्रज न्यायाधीश पडले उंटावरचे शहाणे. शास्त्र व रूढी यांचा वाद पडला असतां रूढीलाच प्रामाण्य द्यावें हें त्यांनीं ठरविलेलें तत्त्व सामान्यतः खरें आहे. पण रूढी दिशाभूल करणाऱ्या, जुलमी व जाचक असतील तरीहि शास्त्रवचनांचा आधार घेऊन त्या बदलूं नयत हें शहाणपण कोठलें! परिस्थिति व तारतम्यहि पाहिलेंच पाहिजे. पण ' कलेक्टर ऑफ मदुरा विरुद्ध मुत्ता रामलिंग ' या दाव्यांत शास्त्रवचन स्पष्ट असलें तरी तें बाजूला ठेवलें पाहिजेअसा विचित्र निकाल न्यायमूर्तींनीं दिला आहे!

त्याच रूढीच्या भुसभुशीत थरांचा कालांतरानें कठिण फत्तर झाला व त्यावर उभें राहून आपण शेषाच्या मस्तकावर अचल उभे आहोंत असें मानूं लागलों. ,, संस्कार " याचा अर्थ "ज्याचा कधींहि भंग होत नाहीं," असा आपण करितों.

पण हा त्या परंपरागत मानसिक रूढीचाच पुरावा होय. दुसरें कांहीं नाहीं. कारण 'संस्कार' याचा असा अर्थ कोणीहि कोणत्याहि धर्मग्रंथांतून काढून दाखवावा. इतर सोळा संस्कार आहेत त्यांतलाच लग्न हा एक. त्यांत विशेष वेगळें काय आहे ? इतर संस्कार जसे जितके बंधनकारक तितकाच हाहि. संस्कार याचा अर्थ अभंग, अभेद्य किंवा पूर्ण बंधनकारक असा असेल तरी तो नवरा व बायको या दोघांनाहि सारखाच लागू असला पाहिजे. नवऱ्याच्या हिताच्या वेळीं 'संस्कार' याचा अर्थ वेगळा, व बायकोच्या वेळीं वेगळा असें मानणें म्हणजे धर्मशास्त्राची ती केवळ थट्टाच होय !

आपण समाजांत एकमेकाशेजारीं गुण्यागोविंदानें राहतों; व्यक्तीच्या हिता-करितां कां होईना पण सार्वजनिक हित आपलेंच मानतों; हा ज्याप्रमाणें एक सामाजिक करार होय. तसाच लग्न हाही एक सामाजिक करार होय. 'समाजव्यवस्था' असें जरी कोणीं त्याला सुंदर प्रौढ नांव दिलें तरी "सामाजिक करार" हेंच त्याचें वास्तविक स्वरूप होय. व्यावहारिक गोष्टीं-तही दैवी वरदहस्ताची मनुष्याला अपेक्षा असते म्हणून धर्मानें त्याला संस्काराचे स्वरूप दिलें इतकेंच. एकाची मालमत्ता दुसऱ्यानें लुटूं नये त्याचप्रमाणें एकाची स्त्री दुसऱ्यानें हरण करूं नये, व केल्यास समाजानें त्याचा प्रतिकार करावा हाच या सामाजिक कराराचा हेतू आहे. महाभारतांत श्वेतकेतूची कथा आली आहे. त्यावेळीं लग्न ही संस्थाच अस्तित्वांत नव्हती. वाटेल त्यानें दुसऱ्याच्या बायकोचें हरण करावें अशी स्थिति होती व त्यांत कांहींहि अधर्म मानला जात नसे. द्रौपदीला तर पांच पति होते व ते कराराशिवाय एकत्र राहणें शक्यच नव्हतें. सुभद्राहरणाच्या आधीं अर्जुनावर वनवासाचा प्रसंग कां आला तें सर्वांना माहीत आहेच. नलराजा नापत्ता झाल्यावर दमयंतीनें आपण स्वयंवर मांडलें आहे असें जाहीरच केलें होतें. या सर्व उदाहरणांचा अर्थ इतकाच कीं, लग्न हा करार असला तरी त्यांत कांहीं धार्मिक उच्च भावना ठेवणें हें मनुष्याचें कर्तव्य होय; पण अप-वादप्रसंगीं मनुष्यानें व्यवहारासारखेंच वर्तन करणें इष्ट आहे. तसें तो न करील तर मूर्ख ठरेल.

हिंदुविवाहशास्त्र वेगळें आहे असें मानणें म्हणजे जगांतील इतर माणसें हीं

माणसेंच नाहींत असें मानण्यासारखें आहे. मनुष्य घर जसें कायम व निरंतर राहण्याकरितांच बांधतो तसेंच लग्न हेंहि कायम टिकण्याकरितांच करतो. लग्न मोडून मनुष्य सतत दुःखांतच पडणार असेल तर या सामाजिक कराराला तो दैवी व धार्मिक वरदहस्ताची कां अपेक्षां करील? लग्न हा जितका सामाजिक करार तितकाच तो धार्मिक संस्कारहि होय. पतिपत्नींनीं एकवेळीं एकच सहचारी निवडावा व त्याच्यांशीं एकनिष्ठपणानें वागावें असाच जगांतील सर्व धर्मशास्त्रकारांचा आशय आहे. धर्म वेगळे असले तरी मूलतः त्यांच्या वैवाहिक नीतिविषयक कल्पना एकच आहेत. ख्रिस्ती लोकांत लग्नापेक्षां घटस्फोटाचींच उदाहरणें आपणांस वर्तमानपत्रांतून अधिक वाचावयास मिळतात म्हणून ख्रिस्ती विवाह हा करार होय अशी आपली समजूत होते. पण रोमन कॅथॉलिक लोकांत अशी प्रद्धत नाहीं. बायबलमध्येंहि घटस्फोट सांगितला नाहीं, असे कित्येक उतारे दाखवितां येतील. स्त्रीच्या दृष्टीनें रोमन कॅथॉलिक विवाह हा थेट सध्यांच्या आपल्या हिंदुविवाहाप्रमाणेंच अभंग आहे. हालकेन. ग्रंथकाराची " The woman thou gavest me " ही सुप्रसिद्ध कादंबरी ज्यांनीं वाचली असेल त्यांना याचें प्रत्यंतर पटेल. मुसलमानी कुराणानें चार बायका करण्याची परवानगी दिली आहे. याचा अर्थ एक सोडून चार बायका करा असा नव्हे! असंख्य बायका करून झनाना भरण्यापेक्षां जास्तींत जास्त निदान चारच करा, अधिक करूं नका असा आहे. कारण पांचवें लग्न मुसलमानानें केलें तर तें बेकायदेशीर ठरतें! महंमदापूर्वी अरब लोकांना वैवाहिक प्रतिबंधनच नव्हतें. त्या दृष्टीनें ही त्याची बहुमोल सामाजिक कामगिरीच नव्हे काय? पण खुद्द कुराणांतच महंमदाचें असें एक वचन सांपडतें कीं " मनुष्याला खुदानें दोन अंतःकरणें दिलीं नाहींत. मग त्यानें एकापेक्षां अधिक बायकांशीं काय म्हणून विवाह करावा? " याचा खरा अर्थ, लग्न ही गोष्ट कराराप्रमाणें हीन भासूं नये, संस्काराप्रमाणें कांहीं उच्च भावना त्यांत आहे, असाच पैगंबराचा हेतु होता असें उघड ठरत नाहीं काय?

अहिंदूंचीं लग्नें करारानें होत असतील, पण हिंदु लग्नविधि हा संस्कार आहे, असें विधान मोठ्या झोंकांत करण्यांत येत असतें. पण याच्याच उलट, अहिंदूचे लग्नविधि हेहि ' संस्कार ' च आहेत व हिंदुलग्नविधि हा एक करार आहे असें प्रमेय मांडलें तर तें नाशाबित करणें कठिण जाईल. ख्रिस्ती अगर मुसलमानी लग्न

हा केवळ करार असता तर दोन साक्षीदारांसमोर ते पुरे कां होऊं नयेत ? पण खिस्ती लग्नविधीला चर्चमध्यें जावें लागतें. व मुसलमानांत लग्नाकरितां काजी उपाध्याय बोलवावा लागतो. करार करण्याला कायदेशीर वय १८ लागतें तर हीं लग्नें १२ ते १६ पर्यंत झालेल्या मुलींचीं सध्यां हजारों उदाहरणें युरोपांत काढून दाखवितां येतील. दान हेंच हिंदुविवाहाचें गमक म्हटलें तर खिस्ती विवाहांत कोणी तरी वधू व वराचे गॉडफादर व गॉडमदर व्हावेंच लागतें. तरुणी अज्ञान असतांना तिचा पालक तिच्याकरितां आपली संमति देतो, असेंच खिस्ती व मुसलमानी शास्त्रावरून दिसतें. पण इतक्या सर्व गोष्टी असल्या तरी सामान्यतः आपली म्हणण्याची पद्धत अशीच कीं, ' हिंदुलग्न हा संस्कार आहे व अहिंदु विवाह हा करार आहे. ' हें सांगण्याचा मुख्य मुद्दा इतकाच कीं विवाह धार्मिक विधि असला तरी जगांत कोठेंहि व्यवहाराचें योग्य बंधन सर्वांनींच मानलेलें आहे. म्हणून ' संस्कार ' या शब्दाची बडबड निरर्थक होय. हा विवेक हॉलकेन या ग्रंथकारानें मार्मिक रीतीनें ओळखला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणें " लग्न ही एक अनादिसिद्ध समाजव्यवस्था आहे. कायदा व धर्मशास्त्र यांचें स्तोम कोणींहि माजवूं नये. कारण असा त्यांचा आगंतुक जुलूम कोणीच मान्य करणार नाहीं. कायद्यामुळें लग्नें होतात असें मानणें म्हणजे कायदा जन्माला येण्यापूर्वी पुराणकालांत ज्या अनेक पवित्र स्त्रीपुरुषांचीं लग्नें झालीं तो निवळ व्यभिचार होय असें ठरेल. बरें, आज चर्चमध्यें न जातां जे लग्नें करतात ते परमेश्वराच्या घरीं एकदम अनीतिमान् ठरणार कीं काय ? लग्न ही केवळ व्यक्तिविषयक व्यवहाराची गोष्ट आहे. राज्यसत्ता त्या बंधनाचें रक्षण करते व धर्म त्या मानवी बंधनाला आपला आशीर्वाद देतो. इतकाच लग्नविधीचा अर्थ आहे. "

स्मृतिशास्त्रांवरूनहि हेंच प्रमेय सिद्ध होतें कीं नाहीं हें पुढील प्रकरणांत पाहूं.

प्रकरण ५ वें.

विवाहसंस्काराच्या मर्यादा

हिंदु विवाहविधीला धार्मिक अधिष्ठान आहे हें खरें, तथापि त्यालाहि मुख्य बाजू व्यावहारिक आहे ही स्मृतिकारांची दृष्टि सुटली नव्हती. कारण ऋग्वेदीय ब्रह्मकर्माच्या संस्कारप्रकरणांत म्हटलें आहे— "ततो दाता— अव्यंगे अपतिते अक्लीबे दशदोषविवर्जिते इमां कन्यां प्रदास्यामि देवाग्निद्विजसन्निधौ" म्हणजे "पति अव्यंग, अपतित, अक्लीव, व दशदोषविवर्जित आहे अशा समजुतीनें मी ही कन्या देत आहें." यांतील प्रत्येक शब्द लक्षांत घेतां या अटींचे कांहीं शब्द लग्नापूर्वी लागण्यासारखे आहेत व कांहीं विवाहानंतर लागण्यासारखे आहेत हें लक्षांत येईल.

नारदस्मृतींत "नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबेच पतिते पतौ। पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते'॥ असें सांगितलें आहे. याचा अर्थ, "पति नष्ट झाला अगर नापत्ता झाला, त्यानें संन्यास घेतला, तो क्लीब असला, धर्मांतर अगर जातिभ्रष्टता इत्यादि कारणांनीं पतित झाला, तर या पांच आपत्तींमध्यें (एक पति जिवंत असतांहि) स्त्रीला दुसरा पति करणें धर्मविहित आहे. वराचे दशदोष कोणते हें कात्यायन व विष्णु यांनीं सांगितले आहेत.

उन्मत्तः पतितः कुष्ठी षंढश्च वा सगोत्रजः।
चक्षुश्रोत्रविहीनश्च तथापस्मारदूषितः॥
कुब्जवामनजात्यंधः क्लीबपीडार्तरोगिणाम्।
व्रतचर्या भवेत् तेषाम् **यावज्जीवमसंशयम्**॥

हे रोग असणारांनीं 'यावज्जीव' व्रतस्थ राहावें म्हणजे लग्न करूं नये असें वर स्वच्छ सांगितलें आहे. जर कोणी करील तर तें लग्न स्त्रीवर बंधनकारक नाहीं. अशा आपत्तीमध्यें कन्येच्या बापानें वेळाशक कन्या परत घेऊन कन्येचें पुन्हां दुसऱ्या वराला दान करावें. कात्यायनानेंहि असेंच म्हटलें आहे कीं,

सतु यदन्यजातीयः पतितः क्लीब एव वा ।
विकर्मस्थःसगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपि वा ।
ऊढापि देया साऽन्यस्मै सप्रावरभूषणा ॥

नुसते " वाग्दत्ताऽपि " असे शब्द येथें नाहींत. तर, " ऊढाऽपि " म्हणजे होमहवन व सप्तपदी यांनीं तें लग्न जरी संपूर्ण झालें असलें तरी (तें लग्न रद्द समजून) कन्या दुसऱ्या वराला द्यावी असा या स्मृतिकाराचा आशय आहे.

कित्येकांना वाटतें धर्मांतराचा प्रश्न मुसलमान हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं शक्यच नसल्यानें स्मृतींत त्याचा उल्लेख नसेल, पण धर्मांतर व पातित्य या दोन्ही गोष्टींचा स्पष्ट उल्लेख वसिष्ठस्मृतींत आहे. " दत्तामपि हरेत्कन्यां " असें वसिष्ठानें स्वच्छ ह्मटलें आहे.

कुलशीलविहीनस्य षंढादि पतितस्य च ।
अपस्मारि **विधर्मस्य** रोगिणां वेषधारिणाम् ।
दत्तामपि हरेत्कन्यां सगोत्रोढां तथैवच ॥

नवऱ्यांनीं लग्नाच्या बायका टाकणें ही एक हिंदुसमाजांत नेहमींचीच रड-कथा आहे. व कित्येक वेळेला खरोखर पुरुषांना तसें कांहीं कारणहि नसतें. पण जी मनुस्मृति सनातनी लोकांना स्त्रियांना नेहमीं दास्यत्वांत ठेवण्यास उपयोगी त्या मनूचीच साक्ष या वेळीं त्याच्या उलट जाईल ! कारण मनुस्मृतींत (अध्याय ९-१७४) मध्यें असें ह्मटलें आहे कीं–

या पत्या परित्यक्ता विधवा या स्वेच्छया ।
उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते ॥

" नवऱ्यानें परित्याग केलेल्या स्त्रीनें स्वतःच्या इच्छेस येईल त्याशीं विवाह करावा. " असा मुलगा 'पौनर्भव' मानला असून द्वादश पुत्रांच्या यादींत त्याचें नांवहि दिलें आहे.

पण कित्येकांस वाटेल कीं मनुस्मृतीमध्यें नियोग सांगितलेला असल्यामुळें पहिल्या नवऱ्याची तिच्यावरील मालकी नष्ट होत नसावी. वशिष्ठानें ' भर्तार-मनुत्सृज्य ' असे स्पष्ट शब्द घालूनच या बाबतीचा खुलासा केला आहे.

या क्लीबं पतितं उन्मत्तं वा **भर्तारमनुत्सृज्य** अन्यपतिं विन्दते मृते वा सा पुनर्भूः भवति ॥

बळजबरीनें मुलींचें हरण करून लग्न झालें असेल तरी तें रद्द होय. तिचा पुनः विवाह करण्यास हरकत नाहीं. बौधायनानें म्हटलें आहे.

बलाच्चेत्प्रहृता कन्या मंत्रैर्यदि न संस्कृता ।
अन्यस्मै विधिवत् देया, यथा ' कन्या ' तथैव सा ॥

' बल ' याचा अर्थ धाकदपटशा **force** व त्याप्रमाणें अयोग्य वजन **undue influence** असाहि होईल.

वरील उदाहरणावरून लग्नाचे बाबतींत आपत्तीच्या प्रसंगीं स्त्रियांना कांहीं विशिष्ट हक्क होते असें उघडच ठरतें. हल्लीं लग्नाचा बाजार पुरुषांना खुला झाला आहे. मुसलमान लोकांस आम्ही हंसण्यास तयार कां तर त्यांच्यांत चार लग्नें करण्याची परवानगी आहे म्हणून ! पण त्यांच्यांत पांचवें लग्न बेकायदेशीर ठरतें. हिंदूंत आजच्या कायद्याप्रमाणें असंख्य बायका करण्याला प्रत्यवाय नाहीं ! कोणी करीत नाहीं हें वेगळें. कारण नसतांना पुरुषानें दुसरें लग्न करूं नये, असाच शास्त्राचा आदेश दिसतो. " आज्ञाधारक, सुग्रण, प्रियभाषिणी, पतिव्रता अशा स्त्रींस जो सोडून देतो, त्याला राजानें कडक शिक्षा करून स्वकर्तव्याची जाणीव करून द्यावी " असें नारदस्मृतींत सांगितलें आहे. व " निष्कारण गुणवान् भार्येस टाकून जो दुसरीशीं लग्न करितो त्याजकडून राजानें मिळकतीपैकीं तिसरा हिस्सा तिला द्यावा. " असें याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे. " स्त्री रोगिणी परंतु शीलवान असेल तर तिच्या परवानगीशिवाय पतीला दुसरें लग्न करितां येत नाहीं " असें मनूनें लिहिलें आहे. " नवऱ्यानें दुसरा विवाह केला असतां पहिल्या बायकोच्या मनांत तेथें राहण्याचें नसेल तर तिला बापाकडे माहेरीं राहण्यास जातां येत असे. अशा प्रकारचे उल्लेख देवलस्मृति व व्यवहारमयूख यांत आले असून " कारणावांचून केवळ मोहानें जो आपल्या भार्येचा त्याग करितो तो धर्मकार्याचा व पुत्रसंतानाचा त्याग करितो; त्याच्या पापकृत्याचें क्षालन होत नाहीं, म्हणून या लोकींहि राजानें त्याला चोराप्रमाणें शासन करावें " असें स्मृतिचंद्रिकेंत स्पष्ट सांगितलें आहे. " केवळ मद्यपी, दुष्टाचरणी, पतीला नेहेमीं प्रतिकूल असणारी, रोगी, खराब, ऐपतिबाहेर खर्च करणारी भार्या असेल तर पुरुषानें दुसरा विवाह करावा. " स्मृतिकारांचे हें समर्याद वर्णन कोणीकडे व पुरुषास वाटेल तितकीं लग्नें करितां येतात ही अलीकडील हिंदु कायद्याची भाषा

कोणीकडे ! Law is an ass अशी एक म्हण आहे, तिचा अर्थ वेगळा आहे. पण हिंदु स्त्रियांच्या बाबतींतला त्याचा आडमुठेपणा पाहिला म्हणजे ही म्हण वाच्यार्थानेंहि खरी आहे असें वाटूं लागतें !

लग्नसंस्कारांत बरेच विधि आहेत. पण कोणता विधि झाला असतां लग्न हें पक्कें, पुरें व उभयपक्षी बंधनकारक Complete मानलें जावें किंवा जातें हें पहाणें मनोरंजक आहे. लग्नांतील मुख्य विधि म्हणजे वाग्दान, कन्यादान अगर पाणिग्रहण व चतुर्थी कर्म हे होत. यांतील कोणत्या विधीला मुख्यत्व अगर गौणत्व द्यावयाचें हें केवळ परिस्थितीवर अवलंबून आहे. वाग्दान झालें म्हणजे लग्न ठरलें असें आपण समजतों. व ठरलेलें लग्न कोणी मोडीत नाहीं असा आपला शिष्टाचार आहे. तो बहुशः जरूर पाळावा. पण वाग्दान म्हणजेच लग्न व वाग्दानानेंच लग्न ' पुरें होतें ' असा शास्त्रार्थ कोणी मांडील तर ती नुसतीच चूक नव्हे जुलूम होईल. " सकृत्प्रदीयते कन्या हरस्तांश्चोरदंडभाक् " म्हणजे कन्येचें वाग्दान हें एकवारच होतें (कारण शिष्ट माणसें एकदां शब्द देतात तो मोडीत नाहींत.) वाग्दान झालेल्या कन्येचें दुसऱ्यानें हरण केलें तर त्याला राजानें चोराप्रमाणें शिक्षा करावी, असें याज्ञवल्क्यानें सांगितलें आहे हें खरें, पण शब्दप्रामाण्यवादी हटयोगी लोक पुढें निपजतील असें जणूं स्वप्नच त्याला पडलें होतें ! म्हणून त्याच श्लोकाचा दुसरा चरण त्यानें असा घातला आहे कीं,

दत्तामपि हरेत्कन्यां पूर्वाश्चेद्वर आप्रजेत् ॥

चांगला व गुणवान् दुसरा वर मिळेल तर वाग्दान झालेलें असलें तरी बापानें आपली कन्या परत घ्यावी. Every thing is fair in love and war हें वचन केवळ वरांनाच लागू नाहीं. वधूला व तिच्या बापालाहि तोच हक्क आहे !

सप्तपदी हा विधि सध्यां मुख्य गणला जातो. सप्तपदी झाली कीं लग्न पुरें झालें असेंच आपण समजतों. सप्तपदीचें श्लोक फार सुंदर व अर्थपूर्ण गांभीर्यानें भरलेले आहेत. तथापि खरोखर वधूवरांपैकीं एकहि तिकडे लक्ष देत नसेल. दैवी भावनेबरोबर आपण " करार " बद्ध होतों कीं नाहीं हें त्यावरून कोणीहि काढून पहावें. जीविताचा प्रवास आक्रमण करतांना परस्परांनीं कसें वर्तन करावयाचें असतें याची आणभाक एकमेकांना देऊन हीं सात पावलें सहचारीबरोबर

चालवयाचीं असतात. पतिपत्नी म्हणून दोघांनीं सात पावलें जगाचा एकत्र प्रवास केला कीं इतरजनांच्या दृष्टीनें तीं विवाहबद्ध झालीं. पित्याच्या गोत्रांतून पतीच्या गोत्रांत तिचें संक्रमण झालें असें मानण्याची जगाची वहिवाट आहे. व याच-करितां " पाणिग्रहणिका मंत्राः पितृगोत्रोपहारकाः " असें वचन स्मृतिकारांनीं लिहिलें आहे.

पण कायद्याची काय किंवा धर्मशास्त्राची काय, खरी Test (कसोटी) गुंतागुंतीच्या व आपत्प्रसंगींच लागत असते. उदाहरणार्थ. वाग्दान झालें व सप्तपदीहि झाली, पण पति हा क्लीब आहे असें नंतर आढळून आलें तर ! याचकरितां ' चतुर्थीकर्म ' हा विधि सांगितला आहे. बृहस्पतीनें म्हटल्याप्रमाणें—

चतुर्थी होममंत्रेण त्वङ्मांसहृदयेंद्रियैः ।
भर्ता संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत् ॥

चतुर्थीकर्म अगर गर्भादान या गोष्टीनें पत्नीचें त्वक्, मांस व हृदय हीं इंद्रियें भर्त्याशीं एकजीव होतात व याचमुळें तिचें पतीच्या गोत्रांत पूर्वगोत्रांतून स्थित्यंतर होतें. वधूचें गोत्र बदलण्याला एकानें ' सप्तपदी ' व बृहस्पतीनें ' चतुर्थी कर्म ' या मर्यादा कां सांगितल्या तें वाचकांच्या आतां लक्षांत येईल. चतुर्थी कर्म हीच लग्न विधींतील खरी निर्णायक मर्यादा होय. ही झाली म्हणजेच लग्न पुरें होतें. तोंपर्यंत तें कायदेशीर दृष्टीनें अपुरेंच मानलें पाहिजे. मुसलमानी धर्मशास्त्रांतहि Option Cpuberty म्हणजे " वयांत आल्यानंतर स्वयं-निर्णयाचा हक्क ' सांगितला आहे. याचाहि अर्थ हाच होय. स्वयंनिर्णयाचा हक्क मुलीला पतीशीं संसर्ग होण्यापूर्वीं बजावावा लागतो व तो तिनें बजावला म्हणजे लग्न रद्द होतें. याचा अर्थ पतिपत्नींसंयोग हीच लग्नविधीच्या पूर्ततेची अंतिम मर्यादा होय असें मुसलमानी धर्मशास्त्रावरून दिसते. या मर्यादेच्या अगोदर तिला केव्हांहि लग्न रद्द करून घेतां येईल, त्यानंतर येणार नाहीं. कारण उभयतांच्या संसर्गानंतर विवाहाच्या नाण्यावर त्यांच्या कायदेशीर संमतीचा ठसा कायम उम-टत असतो.

असो. वरील सर्व विवेचनावरून हिंदु लग्न संस्कार हा निरपवाद नाहीं, विवे-चक आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. सनातनी लोक शास्त्राचा अभिमान धरि-तात कीं स्वतःच्या दुराग्रहाचा धरतात तेंच कळत नाहीं. तुम्हांला शब्दप्रामाण्य

खरोखरच मानावयाचें असेल तर वरील वचनांतून तुमची सुटका होणार नाहीं, व धर्मशास्त्रांतहि विवेक आहे हें तुम्हांला कबूल करावें लागेल व तसें नसेल तर धर्मापेक्षां केवळ " आत्मप्रामाण्य " तुम्हांस अधिक मान्य आहे असाच त्याचा उघड अर्थ होईल ! " स्वस्य च प्रियमात्मनः" मानणें ही फार सोईची गोष्ट आहे, पण त्यांत धर्माचा इतका विपर्यास व बदनामी कशाला ? सनातनी म्हणविणाऱ्यांच्या ढोंगी आचरणानें आजपर्यंत जितका धर्म तरला आहे तितका पुरे आहे त्यावर मिथ्या शब्दप्रामाण्याचे वळसे कशाला ? सारा धर्म व स्मृतिग्रंथ कलियुगांत वाहून गेले. फक्त स्त्रियांच्या उन्नतीची गोष्ट कोणीं काढली कीं मात्र त्या धर्माला जागृतावस्था येते ! हे अप्रिय शब्द लिहिण्यास वाईट वाटत नाहीं असें नाहीं. पण धर्मांत असलेल्या सारासार विवेकबुद्धीचें अग्निहोत्र पेटवून जेव्हां कित्येक धर्ममार्तंड स्त्रियांच्या सुधारणेसंबंधीं निष्कारण तोंडसुख घेतात तेव्हां लेखणीलाहि कठोर वाणी उच्चारणें क्वचित् भाग पडतें.

विवाहाच्या कायद्यामध्यें सध्यां जो घोटाळा व अनर्थ झाला आहे तो सुधारण्याला खरोखर एकच उपाय होय व तो म्हणजे त्याला योग्य अपवाद मान्य करणें हा होय. अपवादानेंच नियम सिद्ध होतो असें नव्हे काय ? जगांत निरपवाद अशी गोष्टच नाहीं. अहिंसा, सत्य, अस्तेय या सर्वमान्य व जगन्मान्य तात्त्विक गोष्टींनाही अपवाद आहेत. तर लग्नासारख्या व्यावहारिक गोष्टींना केवल आपद्धर्मप्रसंगीं अपवाद कां मान्य होऊं नयेत ? त्यानें समाजाचें धारण करण्याची शक्ति खचित वाढेल. घटस्फोट ही काहीं चांगली किंवा आनंद करण्याजोगी गोष्ट नाहीं. लग्न केलें पण तें फसले, हेंच त्यानें अखेर सिद्ध होणार कीं नाहीं ? मग त्यांत भूषण कोण मानील अगर कोणाला मानतां येईल ? आयुष्याच्या अक्षपटावर खेळत असतांना फांसा चुकला व दान हरलें अशीच कोणाहि लग्न मोडणारांना कबुली द्यावी लागेल. पण तसें झालें तरी लग्नबंधनाला अपवाद निर्माण करण्याची आवश्यकता कायमच राहते, नाहींशी होत नाहीं.

प्रकरण ६ वें

कांहीं भानगडीचे प्रश्न

१ विवाह व धर्मांतर

स्त्रियांच्या सभांतून व परिषदांतून बऱ्याच वेळां घटस्फोटाची चर्चा झालेली आढळून येते. नुसतें शारदाविल पास व्हावें म्हटल्यानंच "स्त्रिया अनीतिमान् होतील" अशी हाकाटी सुरू होते, मग घटस्फोटाची चर्चा झाल्यानें किती गैरसमज होत असतील हें सांगण्याचें कारणच नाहीं. पण गैरसमज हे नेहमीं अर्धवट समजुतींनीं होतात. घटस्फोट हवा म्हणणारांना समाजशास्त्राचें योग्य ज्ञान कदाचित् नसेल, पण तो नको म्हणणारांना तरी कोठें आहे! अर्धवट बोलण्यानें गैरसमज होत असतील; पण ते व्हावयाचेच असतील तर स्पष्ट कल्पना मांडून झालेले चांगले!

पण स्त्रियांना लग्न रद्द करून घेण्याचा हक्क सरसकट व निरपवाद हवा आहे, ही गोष्टच आधीं खरी नाहीं. एकत्र कुटुंबपद्धति शाबूद राहावी याची आस्था पुरुषवर्गाला जितकी असेल त्यापेक्षां स्त्रिवर्गाला ती खचित अधिक आहे. नवऱ्यानें टाकलेली स्त्री मुलें कडेवर घेऊन जगांत आश्रयाला कोठें जाईल! व कोणाच्या तोंडाकडे पाहील? पण हिंदु नवऱ्याला आज जे कायद्यानें अमर्याद हक्क दिले आहेत व त्यामुळें खऱ्या लग्नसंस्थेची व तिच्या हेतूची जी धुळधाण झाली आहे; त्याविरुद्ध प्रतिक्रिया किंवा निषेध इतकाच घटस्फोटाच्या ठरावाचा अर्थ असतो. घटस्फोटाचा हक्क कांहीं अपवादात्मक बाबतींत स्त्रिया मागतात हें त्यांचें समाजाविरुद्ध बंड नव्हे. समाजाची निद्रित सदसद्विवेकबुद्धि मोठ्यानें हांक मारून जागी करण्याचा तो एक प्रयत्न होय.

माणसाला एखाद्या गोष्टीनें 'आश्चर्य' वाटलें म्हणजे खास समजावें कीं, या स्वारीला एकंदर परिस्थितीचें गाढ अज्ञान आहे. घटस्फोटाच्या बाबतींत अशीच गोष्ट आहे. पुरषांना वाटतें "बायका नवऱ्यांना टाकण्याची गोष्ट बोलतात? काय त्यांची विशाद आहे! आम्ही रणांत शूर नसलों तरी, नथेंतून तीर खास मारूं." गोष्ट अगदीं खरी. किंबहुना याच शूरपणामुळें (?) समाजाची दृष्टि संकुचित झाली व खऱ्या हिंदुधर्मशास्त्राची विटंबना होऊन गोष्टी या थराला आल्या!

स्त्रियांचे हक्क व स्त्रीपुरुषांची बरोबरी वगैरे सर्वच गोष्टी आपण क्षणभर सोडून देऊं, पण शुद्धिसंघटण व हिंदूंचें एकीकरण याबद्दल देशांत दुमत नसल्या-कारणानें धर्मांतराच्या एका उदाहरणानें स्त्रियांचें म्हणणें गैरसमज न होतां चांगलें लक्षांत येईल. एखाद्या पुरुषानें धर्मांतर केलें तर हल्लींच्या कायद्याखालीं त्याच्या बिचाऱ्या स्त्रीचा कसा जाच होतो हे 'सनातनी' पुरुषांना कल्पनेनें तरी कसें कळ-णार! तें जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे! कल्पना करा कीं, दोघा भावांचें एकत्र अविभक्त हिंदु कुटुंब आहे दोघांनाहि बायका असून लहानमोठ्या मुलाबाळांचा त्यांचा संसार आहे. पैकीं एक भाऊ दुर्वर्तनी निघाला, निशापाणी, नाच व इतर ढंग करूं लागला. इतकेंच नव्हे तर अखेर त्यानें धर्मांतर करून एका यावनी स्त्रीशीं लग्न केलें व तिला घरांत आणून ठेवलें. तर त्या स्त्रीच्या विपत्तीची कल्पना ब्रह्म-देवाला तरी करितां येईल काय.?

धर्मांतर केलेल्या नतद्रष्ट भावाला दुसऱ्या भावाला घरांतून घालवून देतां येणार नाहीं. कारण धर्मस्वातंत्र्याचा कायदाच झाला असल्यानें धर्मांतर करणें हा गुन्हा नव्हे इतकेंच नव्हे तर धर्मांतर करूनहि वडिलार्जित कोणत्याहि मिळकतीच्या वारसदारीला धर्मांतर आड येऊं शकणार नाहीं,अशी कायद्यानें इंग्रजसरकारनें हमी दिली आहे! मग एक भाऊ दुसऱ्या भावाला कोणत्या तोंडानें घालवून देणार? इंग्रज प्रभूनें जसें 'पानस्वातंत्र्य' दिलें तसेंच हें "धर्मस्वातंत्र्य" दिलें! पण त्यानें राणीच्या जाहीरनाम्याला समूळ हरताळ लागला तरी तें चालतें. कां तर सनातनी लोकांना हें सूक्ष्मज्ञान कळत नाहीं व कळण्याची त्यांची पात्रता असली तरी सनातनधर्माचें प्रेम त्यांना फक्त शारदाबिलाच्या वेळींच आठवतें म्हणून!

हिंदुधर्माचा अभिमान बाळगणारा भाऊ दुसऱ्या भावाशीं भांडेल तंडेल फार तर घराची वांटणी करून वेगळा राहील. पण तेथें तरी त्याला सुखानें झोंप येईल काय? मशीद नसलेल्या ठिकाणींहि पीर येऊन दंगेधोपे होतात तर हिंदुकुटुंबांत एक भाऊ धर्मांतरानें आपल्या धर्माला मुकून जिवंत समंध अगर पीर झाला, तर तेथें किती कटकटी रोज उत्पन्न होतील? पण दुसरा भाऊ फार तर घरदाराचा हक्क सोडून चालता होईल, पुतण्यांच्यापैकीं जे कोणी खुषीनें येतील त्यांनाहि बरोबर नेईल व प्रेमानें वागवील. पण ज्या हिंदु स्त्रीची लग्नगांठ हिंदु लग्नपद्धतीनें इष्ट सोयऱ्यांनीं व ब्राह्मण पुरोहितांनीं त्या धर्मद्वेष्ट्या नवऱ्याच्या

गळ्याशीं मारली. त्या स्त्रीला तो कसें सोडविणार ? ' माझ्याबरोबर ये ' असें कोणत्या तोंडानें तिला म्हणणार ? "धर्मांतरामुळें तुझा नवरा मेला " असे शब्द आर्य हिंदु स्त्रीपुढें तो कोणत्या तोंडानें बोलणार ? त्या स्त्रीनें हिंदु धर्माचा कितीहि जाज्वल्य अभिमान बाळगला तरी कायदा म्हणणार लग्न तें लग्न धर्मांतरामुळें हिंदु लग्न स्त्रीच्या दृष्टीनें मोडतें असा कायदा नाहीं !

सनातनी लोक तर काय घमेंडखोरी व तोरा यांच्या दृष्टीनें सरकारपेक्षां मिजासखोर! त्यांचें धर्माचें गाढ अज्ञान! ते " सनातन " शब्दाच्या पोकळ वडबडीनें दुसऱ्यांचा छळवाद करून झांकून ठेवणार ! ते तिला साळसूदपणानें सांगणार " बाई ग ! तुझ्याबद्दल आम्हांला कींव येतें. पण हिंदु स्त्रीला पतीवांचून दुसरा देव नाहीं, धर्म नाहीं, नेम नाहीं व व्रतेंहि नाहींत असें मनुस्मृतींत सांगितलें आहे ! नवरा तरी या जन्मींचा थोडाच, ती पूर्वजन्मीची गांठ ! ती याच जन्मीं काय पण ती पुढच्या जन्मीं तरी कशी सुटेल ? " ही आमच्या सनातनी लोकांची हिंदू धर्माची चाड व हिंदु धर्माचें ज्ञान! पण हिंदु स्त्रिया तितक्याच खमंग व सडेतोड नसतात याचें वाईट वाटतें. त्यांनींहि म्हणावें " तेंहि खरेंच. अतींद्रिय ज्ञानानें प्रकट झालेली मनुस्मृति ' अप्रमाण ' तरी कशी मानावयाची ? तुम्ही या लोकींचे भूदेव ! तुम्ही देवाब्राह्मणांसमान वंद्य आहां. पतित झालेल्या नवऱ्यापासून पतित प्रजा निर्माण करण्यापेक्षां तुम्हींच आतां नियोगानें मला पुत्र प्राप्त करून द्या म्हणजे झालें ! तुमच्या मनुस्मृतींत त्याला आधार आहेच !! "

पण ही थट्टा क्षणभर सुचली तरी दुसऱ्याच क्षणीं मनाला उद्वेग व संताप हीं उत्पन्न होतात. ज्या स्त्रीनें हिंदुधर्माचा अभिमान बाळगावा तिची मान धर्मांतर केलेल्या कसायाच्या हातीं रहावी, धर्ममार्तंडांनीं खऱ्या धर्माला तिलांजलि देऊन " सनातन " शब्दाचे तोंडानें शांतिपाठ गावे, व अशा अपवादात्मक प्रसंगींहि " लग्नाचें बंधन तुटूं नये " असें प्रतिपादलें जावें हा केवळ अज्ञानजन्य दुराग्रहाचा कळस होय ! अशा परिस्थितींत स्मृतिवाक्यांशीं ज्या मतिमंदाची मति अडत असेल त्यांची खरोखर कींव केली पाहिजे. परमेश्वरानें त्यांच्याच एखाद्या आप्तावर असा प्रसंग आणल्याशिवाय, धर्मांतहि सारासार विवेक आहे ही सुबुद्धि त्यांना सुचणार नाहीं ! संकटाशिवाय देव आठवत नाहीं. परदुःख तर नेहमींच शीतळ असतें. मग सनातनी लोकांनीं आपल्या डोळ्यावरचें कातडें कां दूर ओढावें ?

" नवी स्मृति करा " असें प्रतिपादन करणाऱ्या लोकांचें शिव्या खाण्यानें कांहीं वांकडें होत नाहीं. स्त्रिया आजपर्यंत कायदेशीर दास्यांत राहिल्या त्या फार तर आणखी थोडे दिवस दम खातील, पण अखेर परिस्थितीनेंच या नाफेरवाल्या सनातनी लोकांचीं तोंडें फिरून ते विवेकाच्या मार्गावर येतील, व न्याय्य गोष्टी कबूल करतील यांत मुळींच शंका नाहीं.

विवाह व फसवणूक

धर्मांतराप्रमाणेंच कपट अगर फसवणूक ही दुसरी एक ठळक गोष्ट सांगता येईल. अर्थात या गोष्टी सांगण्याचा उद्देश इतकाच कीं, घटस्फोट ही गोष्ट कोणीं तोंडानें उच्चारली तरी एकदम नाक मुरडण्याचें कारण नाहीं. जात एक असतां ती लपवून दुसरी सांगणें ही शुद्ध फसवेगिरी होय, व अशा रीतीनें स्त्रियांचा गळा कापला गेल्याचीं कित्येक उदाहरणें आपल्या समाजांत आहेत. पण लग्न-बंधनाचा कायदा दुर्भेद्य, व धर्म तर निद्रितावस्थेंत. अशा स्थितींत फसलेल्या दुर्दैवी स्त्रियांचीं उदाहरणें कोणी नांवें घेऊन सभ्य मनुष्य सांगत नाहीं याचें कारण स्त्रीजातीची अब्रु ही फार थोर आहे. पण नुसत्या अशा हळहळण्यानें त्यांच्यावरचें संकट थोडेंच दूर होणार !

प्रत्यक्षच उदाहरण नको म्हणून पुराणांतलींच मुरलीची कथा येथें समर्पक रीतीनें सांगतां येईल. ती अशी कीं,एक चांडाल पुत्र होता तो रूपानें फार देखणा, गौरवर्ण व सतेज दिसे. इतका कीं जो जातीनें चांडाल आहे हें सांगितल्याशिवाय लक्षांत येत नसे. एके दिवशीं तो वनांत गेला असतां एका आश्रमांत एक तपस्वी महर्षी विद्यार्थ्यांना वेदाध्ययन शिकवीत बसले असतां कौतुकानें तेथें ऐकत बसला. गुरूंनाहि त्याचें कौतुक वाटून त्यांनीं त्याला कुशल विचारलें. चांडालपुत्रानें मी ब्राह्मण आहे असें मिथ्या सांगितलें व गुरूनाहि त्याच्या विनयशील स्वभावामुळें शंका आली नाहीं. त्याचीं कुशाग्रबुद्धि, तेजस्वी पण मनमिळाऊ स्वभाव यामुळें त्यानें वेदादि सकल विद्या हस्तगत केल्याचा पण गुरुकन्येचेंहि मन हरण केलें. महर्षींनींहि या विद्यासंपन्न वराला आनंदानें आपली कन्या अर्पण केली.

दिवसामागून दिवस व संवत्सरामागून संवत्सरें निघून गेलीं. अज्ञान व अल्पवयी गुरुकन्या प्रौढ होऊन गृहिणी झाली. कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें अपत्यांच्या धाग्यादोऱ्यांनीं तिच्या संसाराचा विस्तार झाला.

लहान मुलेंच तीं. कोठेंहि कोणाबरोबर खेळायला जात. संध्याकाळीं तीं खेळून आल्यावर त्यांचे खिसे तपासणें, त्यांतील शंख, शिंपा वाळू, व इतर चिजा काढून पुनः नवे कपडे घालणें हें आयांना एक कामच असतें. पण या मुलांची तऱ्हा कांहीं विलक्षणच. महर्षींच्या आश्रमाशेजारीं वाढणारीं मुलें पण त्यांनीं महारचांभारासारख्या गलिच्छ मुलांत खेळावें, शिव्यागाळी करावी, अभद्र शब्द उच्चारावें, व नदीकांठीं जाऊन मैदानांत शंख शिंपले गोळा करण्यापेक्षां लहान मोठीं हाडकें जमा करावीं व त्याच्या चित्रविचित्र माळा करून घरीं घेऊन याव्या. आईनें त्यांना असें न करण्याबद्दल सांगावें, पण मुलांचा आपला क्रम एक. एक दिवस मुलांचा असा अवतार घरीं आलेला पाहून गुरुकन्येस फार राग आला व तोंडानें शिवी हासडून ती म्हणाली "कार्ट्या, चल तुला नदींत बुडवितें. तुझा बाप चांडाळ होता कीं काय म्हणून असलीं दुष्कर्में तुला आठवतात? पूर्वजन्मीं कोण होतास कोणास ठाऊक?"

काय असेल ते असो. अशा कृत्यांनीं व पतीच्या एकंदर वृत्तीनें त्या साध्वीचें अंतःकरण संशयित झालें होतें. जिवाची हुरहूर तिला स्वस्थ वसूं देईना. एके दिवशीं एकांतांत तिनें पतीला प्राणाची शपथ घालून विचारलें कीं "तुम्ही कोण आहां तें खरें सांगा!" त्या तेजस्वी गुरुकन्येसमोर चांडालपुत्राची प्रतारणा क्षणभरहि टिकली नाहीं व त्यानें आपलें जन्मवृत्त शरमेनें कबूल केलें.

"तुम्हीं माझा देह भ्रष्ट केला. आतां या लोकीं माझी अब्रू कोण संभाळणार? मुलांचा संभाळ करा. तुमचें मुखावलोकनहि करण्याची माझी इच्छा नाहीं." असें म्हणून शोक व संताप यांच्या भरांत ती तडक महर्षींच्या आश्रमाकडे गेली. "तात महर्षींच्या तोंडाकडे तरी मी कशी पाहूं? जळला हा माझा देह तो विटाळला. पण बाबांचा पवित्र आश्रम तेथें पाऊल टाकून मी काय म्हणून कलंकित करूं?" पृथ्वी दुभंग होऊन पोटांत घेईल तर बरें असें तिला वाटूं लागलें.

ती आश्रमाजवळ गेली. पण बाहेरच मान खालीं घालून उभी राहिली. "मुली, बाहेर का ग उभी राहिलीस?" महर्षींनीं विचारलें.

"बाबा, मातीचें भांडें विटाळलें तर कसें शुद्ध होतें?"

महर्षींनीं विस्मयानें उत्तर दिलें "अग्नीच्या भट्टींत तापवून."

"ठीक आहे. चिता सिद्ध करा. हा मृण्मय देह पुनः शुद्ध व पवित्र होण्याला तोच एक मार्ग आहे."

महर्षींना मुलीचें दुःख पाहून फार गहिंवरून आलें. पण आतां ते तरी काय करणार होते? तिच्या आग्रहाप्रमाणें चिता पेठविली गेली व परमेश्वराचें नामस्मरण करून गुरुकन्येनें त्यांत बेलाशक उडी घेतली. तिचे शारीरदोष मनःसंकल्पाच्या तीव्र विद्युतशलाकेनेंच दग्ध झाले होते म्हणून अग्निनारायणाला तिला कांहींच करितां आलें नाहीं. त्याच्या ताम्रधूसर ज्योतीमधून भगवान् परमेश्वर प्रगट झाले. प्रसन्न होऊन ते म्हणाले "मुली, तूं सत्त्वपरीक्षेला उतरलीस. मीं तुझा उद्धार केला आहे."

"माझ्या या अपवित्र देहाचा उद्धार अग्निनारायण करील पण माझ्या शीलाबरोबर माझें कुळ भ्रष्ट झालें त्याची वाट काय?"

"तुझ्या कुळाचाहि मीं उद्धार केला आहे."

"स्वर्गांतली गोष्ट स्वर्गांत. पण माझ्या कुळाचें नांव या लोकीं कलंकित झालें ती अपकीर्ति कोण धुवून काढणार? परमेश्वरा! तुमचें निकट सान्निध्य मला तुम्हीं दिलें तरच माझी दुष्कीर्ति टळेल!"

"मुली, त्याचीहि तूं काळजी करूं नको. ज्या ठिकाणीं तूं हें अग्निदिव्य केलेंस तेथें वेळूचें वन निर्माण होईल व तूं मुरलीच्या रूपानें माझ्या सदैव सान्निध्यांत राहून माझ्या ओष्ठप्रांतीं खेळत राहाशील. तुझें नांव लोकांत तिरस्करणीय तर होणार नाहींच, पण तुझ्या सत्त्वधीर कीर्तीचे गोड आलाप लोक पृथ्वीवर काढतील." चांडालपुत्रानें भ्रष्ट केलेली काया टाकून ती महर्षिकन्या सध्यां परमेश्वरानें मुरलीरूपानें धारण केली आहे.

अशी ही मुरलीची सरस कथा आहे व ती अनेकांनीं भक्तिभावानें आजपर्यंत एकलीहि असेल. पण कपटानें जातिभ्रष्ट झालेल्या स्त्रियांचा समाजांत काय दर्जा असतो या दृष्टीनें या कथेचें तात्पर्य मात्र मुद्दाम सांगितलें पाहिजे. व तें असें कीं, अशा पतित स्त्रीचा उद्धार करण्याला प्रत्यक्ष परमेश्वरच खालीं अवतरावयास हवा! या कलियुगांत मुरलीप्रमाणें फसलेल्या स्त्रियांचीं उदाहरणें अनेक आहेत. पण जनतारूपी परमेश्वरानें प्रगट होऊन त्यांच्या अब्रूचा निर्वाळा घेतला असें आजपर्यंत घडलेलें नाहीं.

धर्मांतर, जातिभ्रष्टता,फसवणूक असल्या प्रसंगीं तरी लग्नाचा पाश रद्द व्हावा कीं नाहीं ? पण आमच्या धार्मिक सनातनी वर्गाचा आपला नन्नाचा पाढा! त्यामुळें आजचा प्रचलित विवाहाचा कायदा किती चमत्कारिक झाला आहे पहा ! हिंदु लग्न एकदां झालें कीं तें वज्रलेप होतें. फसवणूक, लांचलुचपत, सगोत्रता, विजातीयत्व, कपट इत्यादि काय वाटेल तें घडलेलें असो. एकदां लग्नगांठ बसली कीं ती ब्रह्मदेवालाहि उकलत नाहीं ! नवरा वेडा बहिरा, आंधळा, रक्तपितीसारख्या घोर व्याधीनें जर्जर झालेला असला किंबहुना तो क्लीब असला तरी देखील लग्न तें लग्न ! तें कधींच रद्द होणार नाहीं ! धर्मांतर व जातिभ्रष्टता यानें तरी स्त्रीची सुटका व्हावी ! पण स्त्री धर्मांतर करून बाटली तरी चालेल, पण तिनें हिंदुत्वाचा अभिमान धरून " माझें लग्न रद्द करा व मला धर्मांतराच्या नरकापासून वांचवा " अशी विनवणी करितां कामा नये. कारण प्रसंग कसाहि असो, घटस्फोटाचा फट शब्द, ती उच्चारील तर ब्रह्महत्या होईल ! धर्मांतर, यवनी संसर्ग व मारहाण या खेरीज इतर कोणत्याहि कारणाकरितां स्त्रीला नवऱ्यापासून दूर राहण्याचा हक्क नाहीं. मुलगी सज्ञान असो व सज्ञान असो, स्त्री हा कोणी जिवंत पदार्थ आहे व लग्नासारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं तिची संमति अवश्य पाहिजे असें कायदा मानीतच नाहीं ! ही साधी गोष्ट मान्य होण्यालाही पन्नास वर्षे पुरेशी नाहींत, ही गोष्ट निराशाजनक होय !

पण या बाबतींत टीका करतांना सनातनी लोकांइतकेच इंग्रज सरकार व इंग्रज न्यायाधीश गुन्हेगार आहेत हें स्पष्ट म्हटलें पाहिजे. कारण त्यांना धर्मशास्त्र जाणण्याचा वकूब नाहीं. व त्यांची स्वार्थाची दृष्टि यत्किंचितहि सुटत नाहीं. हिंदु-लग्नविधि हा धार्मिक आहे. पण धर्मांतर करून धर्माची कक्षा ओलांडल्यानंतर तरी तें बंधन कां तुटूं नये ? पण हिंदूनें धर्मांतर केलें तरी हिंदु बायको ही त्या अहिंदूचीच बायको राहते. व ती लग्न करील तर पुनर्लग्नाच्या आरोपावरून तिला सात-सात वर्षे शिक्षा होईल ! पुरुषानें धर्मांतर केलें तर स्त्रीचा विवाह रद्द होत नाहीं. कारण ती तशीच टांगत राहिली तर मुलांबाळांसह धर्मांतर करून ख्रिस्ती होण्याचा संभव अधिक ! बरें ती तशीच हट्टानें राहिली तर तिनें हिंदु धर्माची छाटी नेसून दारोदार भीक मागावी ! पण पुरुषाऐवजीं स्त्री धर्मांतर करूं द्या. परवांच कलकत्त्याला असें घडल्याबरोबर तेथल्या जज्जानें काजी होऊन तिचा मुसल-

मानाबरोबर निका लाविला, व तिचें पहिलें हिंदु लग्न रद्द झालें असा निर्णय दिला. हा न्यायाचा धारवाडी कांटा व समतोल इंग्रजी न्याय विवाहाच्या कायद्यांत धर्मांतराचा स्वार्थ साधण्यासाठीं चाललेला हा धडधडीत अन्याय हिंदी स्त्रियांनीं पायाखालीं कां तुडवूं नये ?

पण असल्या परक्या न्यायाधीशांमुळें सर्व हिंदु धर्मशास्त्राचेंच काय, पण त्यांतल्या त्यांत स्त्रियांचें नुकसान विशेष झालें आहे. मा-बापसरकार त्यांना शिक्षण देत नाहीं व न्यायकोर्ट त्यांना न्याय देत नाहींत. "दया म्हणून करा" असें म्हटलें तर म्हणतात, "तुमच्या धर्मांत हात घालणार नाहीं," अशी इंग्रज सरकारनें शपथ घेतली आहे. न्याय करा असें म्हटलें तरी त्याची अपात्रता त्यांना दृष्टिआड करितां येत नाहीं. कारण अनेक स्मृति, त्यांवरील भाष्यें व वार्तिकें त्यांना कोठून कळणार ? व्यक्तिशः कांहीं इंग्रज न्यायाधीश सत्प्रवृत्त व प्रामाणिक असतील पण विवाहाच्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतींत हा जो न्यायाचा फार्स, गोंधळ व अनर्थ झाला आहे तो पाहून कोणीहि सहृदय मनुष्य दुःख, लज्जा व संताप यांनीं आपलं तोंड खालीं करील !

प्रकरण ७ वें

स्त्रियांचे मिळकतीचे हक्क.

कन्या

The world was sad !—
The garden was a wild
And man, the hermit sighed
Till woman smiled.

जे समाज सुखानें नांदत आहेत त्यांत स्त्रिया व पुरुष हीं दोघेहि सुखी आहेत. आपल्या हिंदु समाजावर सदैव दुःखाची अवकळा आलेली दिसते. याचें कारण कुटुंबें सुखी नाहींत. कुटुंब हाच आपल्या समाजाचा घटक होय. हिंदु

समाजाची सुस्थिति ही स्त्रियांच्या कायदेशीर सुस्थितीवर अवलंबून आहे, व त्यांतही **कन्येला** कुटुंबांत दर्जा प्राप्त झाल्याशिवाय समाजाची भरीव सुधारणा होणें अशक्य आहे.

कन्येला कायदेशीर दर्जा नाहीं याचा अर्थ निष्प्रेम जीवित तिला घरांत कंठावें लागतें असा मुळींच नाहीं. तिच्या आईच्या अत्यंत शीतल प्रेमाच्या छायें-तच ती वाढत असल्यानें तिला दुःखाच्या उन्हाची तिरीपही लागत नाहीं. घरांत आईच्या खालोखाल मान असेल तर तो कन्येलाच. तिला वस्त्रालंकार, भरण-पोषण अत्यंत प्रेमानें, कोडकौतुक करून कोणी घालीत असतील तर आईबापच. पण आईबापांच्या या कौतुकाच्या व प्रेमाच्या मुळाशीं 'मुलीचें पुढें कसें होईल?' ही काळजी सदैव वास करीत असते. कारण कन्या 'परक्याची'!

प्रेमाच्या पाखरणीखालीं वाढणाऱ्या मुलीचा कायदेशीर दर्जा पाहूं गेल्यास तिला खरोखर दर्जा नाहींच असें आढळून येईल. फक्त मुंबई प्रांतांत अलीकडे स्त्रियांना मर्यादित स्वामित्व न देतां मालकीहक्क मिळावेत, अशी न्यायकोर्टांची प्रवृत्ति दिसते. पण बंगाल, वनारस, मिथिल व मद्रास या प्रांतांत स्त्रिया या पुरु-षांच्याकडून वारसा घेवोत अगर स्त्रियांच्याकडून घेवोत, मिळकतीच्या मालकीमध्यें त्यांना केवळ मर्यादित मालकीहक्कच देण्यांत आले आहेत. त्यामुळें या प्रांतांतून त्यांची स्थिति फारच चमत्कारिक झाली आहे. कन्येला हक्क म्हणून कांहीं असतील तर ते दोनच. एक अन्नवस्त्राचा व दुसरा लग्नाचा. जोंपर्यंत ती आईबापांच्या घरीं असते तोंपर्यंत त्या घरीं अन्नवस्त्राची ती अधिकारी असते व विवाहोत्तर सासरींही तिचा तेवढाच अधिकार असतो. पित्याच्या मिळकतीवर तिचा हक्क असतो पण तो भाऊ व इतर सर्व पुरुष भागीदार नसतील तेव्हां व त्यांतही कांहीं बंधनें अशीं आहेत कीं त्यामुळें तिचा हक्क प्रस्थापित होणें जवळ जवळ कठीणच.

आईच्या स्त्रीधनावर मात्र सर्वांना बाजूस सारून प्रथम तिचा हक्क शाबीत होतो. पण या स्त्रीधनांत कोणती मिळकत येते कोणती नाहीं यावर टीकाकारांत इतकीं रणें पडलीं आहेत कीं, स्त्रीधनावर तिचा हक्क असूनही त्याचा उपयोग कर-ण्याची स्थितिच नसते.

भावांची मिळकत कोणीही एकही सपिंड व समानोदक वारस उरलेला

नसेल तरच तिला मिळूं शकते. म्हणजे ती मिळकत मिळण्याचा प्रसंग कधींच येत नाहीं.

भाऊ व विधवा आई नसल्यास पित्याची मिळकत त्याच्या सर्व मुली मर्यादित हक्कानें उपभोगूं शकतात. पण मुलीमुलींतही हक्क आधीं कोणाचा प्रस्थापित करावयाचा या बाबतींत घारवाडी कांटा लावलेला असतो.

या सर्व मुलींत अविवाहित मुलींचा विवाहित मुलींपेक्षा बापाच्या मिळकतीवर जवळचा हक्क असतो. मग विवाहित मुलींची अन्नान्न दशा असली तरी इलाज नाहीं. तिला कांहीं मिळूं शकत नाहीं.

अविवाहित मुलींनंतर विवाहित मुलींचा हक्क. पण त्यांतही डावें उजवें आहेच. सांपत्तिक हीनता असणाऱ्या विवाहित मुलींचा अधिकार संपन्न विवाहित मुलींच्या हक्काहून जवळचा आहे आणि अशा प्रसंगीं गरीब कोण व श्रीमंत कोण याचा लढा कोर्टांत लागल्यानें तीहि जिकीरीचीच गोष्ट होऊन बसते. एवढ्या सर्व अडचणींतून प्रस्थापित केलेला हक्क अनीतीच्या आरोपानें हिरावून घेतला जाण्याचा बराच संभव असतो. इतर प्रांतांत कायद्यानें अनीति ही मुलीचा मिळकतीवरील हक्क नाहींसा करीत असल्यानें बहिणी बहिणी आपापला हक्क शाबीत करण्यासाठीं एकमेकींच्या अंगावर खोटेच शिंतोडे उडवूं लागतात. त्यांना इतर उत्तराधिकारी (Reversioners) सामील होतात. इतक्या सर्व तऱ्हांनीं हक्काची छाटाछाट होत असतां बंगाल प्रांतांत तर विवाहित कन्यांतील सर्व दृष्टया मिळकत घेण्यास लायक असणाऱ्या कन्येचा हक्क, अन्तर्वती कन्या भावी संततीच्या जोरावर लाथाडूं शकते. म्हणजे विवाहित कन्या ही पतीनें टाकलेली, अन्नाला महाग असलेली, अशी असली तरीही केवळ संतति नाहीं अगर संततीचा संभव नाहीं म्हणून बाजूस टाकली जाते. बापाची कुबेराची संपत्ति असतां तिला भिक्षा मागावी लागते.

क्रिमिनल प्रोसीजर कोडाप्रमाणें बापाला त्याच्या हयातींत अनौरस मुलीला पोटगी देणें भाग पडतें. पण हिंदु कायद्यान्वयें अनौरस मुलीला मिळकत तर राहोच पण पोटगीही मिळूं शकत नाहीं.

एवढे मुलीच्या मिळकतीच्या हक्काला आडफाटे फोडून त्यांतून निभावलेला हक्क कशा स्वरूपाचा ? तर तोही मर्यादित स्वरूपाचा. हिंदु धर्मशास्त्राचें हें तत्त्वच

आहे कीं कुमारी, विधवा अगर सधवा यांना पुरुषांच्या मिळकतीवर संपूर्ण मालकी हक्क नसतो. तो बहुधा नेहमींच मर्यादित असावयाचा.

मुलीला मिळकतीवरील मर्यादित हक्कानें पित्याच्या पारलौकिक हितार्थ अगर त्याचें ऋण फेडण्यासाठीं अगर स्वतःच्या अन्नवस्त्रासाठींच केवळ मिळकतीचा उपयोग करतां येतो. अशा रीतीचाहि मिळकतीवरील हक्क बजावीत असतां उत्तराधिकारी (Reversioners) तिला नाडण्यास डोळ्यांत तेल घालून टपलेले असतात. त्यामुळें हा मर्यादित स्वामित्वाचा हक्क सुखापेक्षां दुःखालाच कारण होतो.

अनेक मुली पित्याची मिळकत मर्यादित हक्कानें उपभोगीत असतां त्यांपैकीं एकादी मेली तर त्या मृतकन्येचा मिळकतीवरील हक्क तिच्या मुलांकडे न येतां इतर बहिणींच्या हक्कांत हिचा हक्क विरून जातो. तिच्या अपत्यांना कांहींहीं मिळू शकत नाहीं. अशा रीतीनें एकेका बहिणीचे हक्क विरून शेवटीं पित्याच्या मिळकतीला कोणीच मुलगी वारसदार नसली तर मिळकतीचा हक्क उत्तराधिकारी कायद्यानें बळकावून बसतात ! त्यांना मात्र संपूर्ण मालकी हक्क ! त्या पोटच्या मुली झाल्या तरी 'स्त्री' आणि हे जन्मांत तोंड न पाहिलेले कोठलेही नातेवाईक असले तरी ते पुरुष ! म्हणून पोरींना नाहीं तें चोरांनाही मिळू शकतें !!

कायद्यानें मुलींना केराप्रमानें दूर लोटल्या आहेत. तेव्हां कायद्यानेंच त्यांना थोर केल्याशिवाय घरांत तरी थोरपणा कसा येणार ? मुलगी ही मायेपेक्षां देखील फक्त कींव करण्याची प्रेम करण्याची वस्तु, तिच्याकडे आदरानें कोण पहातो ? बरोबरच आहे; ज्याचें धन त्याला जगांत मान. तेव्हां या कायदेशीर मानासाठीं मुलीला कायद्यानें मिळकतीवरील कांहीं भागावर संपूर्ण मालकी हक्क असले पाहिजेत. इंडियन सक्सेशन ॲक्टाप्रमाणें ख्रिस्ती व हिंदुधर्मीयेतर समाजांत मुलगा व मुलगी यांना वारशाचे बाबतींत अगदीं **समसमान** हक्क असतात. पित्याच्या मरणोत्तर त्याच्या मिळकतींतील तिसरा भाग विधवा आईला व उरलेले दोन भाग मुलगे व मुली यांना सारखे वांटून मिळतात.

मुसलमानी कायद्यानेंही मुलगी ही अंशाधिकारी (sharer) आहे व तिला निश्चित भाग मिळतो. जर एकुलती एक मुलगी असेल तर तिला अर्धी मिळकत हक्कानें मिळते. एकाहून अधिक मुली असल्यास व मुलगा नसल्यास मिळकतीच्या

दोन तृतीयांश हिस्सा त्यांना मिळतो. विधवा बायका आणि मुलगे असल्यास मुलगी निदान शेषाधिकारी तरी (Residuary) असतेच. पण एकंदरींत मुसलमानी कायद्यानें मुलीचे मिळकतीवरील हक्क इतक्या न्याय्य, सोप्या व स्पष्ट रीतीनें सांगितले आहेत, कीं त्यांत भानगडी निर्माण होऊंच शकत नाहींत. हिंदू कन्येचें दुर्दैव मुसलमानी कन्येवर कधींच ओढवणें शक्य नाहीं.

आणि खरोखरच अशी स्थिति पूर्वकाळीं नव्हती. वैदिक काळीं मुलीला पित्याच्या मिळकतीचा तिसरा अगर चवथा भाग मिळत असल्याचा मनूनें उल्लेख केला आहे. बृहस्पतीनें तर–

यथैवात्मा तथा पुत्रः पुत्रेण दुहिता समा
तस्यामात्मनि तिष्ठायां कथमन्यो धनं हरेत् ?

असें म्हणून कन्येला **पुत्रासमान** कल्पिली आहे. व मुख्य पुरुषाच्या मरणानंतर त्याच्या मिळकतींत मातेला मुलाच्या बरोबरीनें हिस्सा मिळतो, माता व मुलगे यांचे भाग सारखे असून कन्यकांना चवथा भाग मिळतो असें स्पष्ट म्हटलें आहे.

बृहस्पतीच्या वचनाप्रमाणें बहिणीचा हक्क भावाबरोबरीचा मानला किंवा थोडा कमी मानला तरीहि चालेल. मुलगी परगोत्रांत जाऊन परक्याची व्हावयाची असली म्हणून माहेरी तिच्या वारशाला सरसकट काय म्हणून अशी लाथ मिळावी ? घरच्या विहिरींत गणपति विसर्जन करतांना आपण शिदोरी व पाद्यपूजा बरोबर ठेवतों. मुलीस परगोत्रांत ढकलतांना तिला थोडेंसें स्त्रीधन मिळतें. तें तिनें घ्यावें व पुनः पाठीमागें आशेनें पाहूं नये ? पण मुसलमानी कायद्याप्रमाणें अगर सक्सेशन ॲक्टप्रमाणें तिला निश्चित वारशाचा भाग कां मिळूं नये ? सासरीं मिळेल म्हणून माहेरीं नाहीं व सासरीं ती परकी म्हणून नाहीं ! मिळून दोहींकडे तिच्या नशिबीं नकार घंटाच यावयाची ?

२ विधवा स्त्रीचे हक्क.

विधवेच्या मिळकतीवरील हक्कांचा विचार करतांना अनेक भानगडीचे प्रश्न निर्माण होतात. तिचा मालकी हक्क किती व कशावर, तिच्या मिळकतीच्या हक्कावर उत्तराधिकाऱ्यांकडून येणारी गदा, तिचे दत्तकाचे अधिकार व चारित्र्य

इत्यादि गोष्टींचा विचार केल्यानंतरच गतभर्तृकेचे मिळकतीवरील हक्क कोणते आहेत, हें सांगतां येतें.

विधवेची सध्यांची मिळकत म्हणजे सुळावरची पोळी. ती मिळेपर्यंत व मिळाल्यावरही मिळकतीऐवजीं ती दुःखांचीच वाटेकरी होते.

१९२५ च्या इंडियन सक्सेशन ॲक्टप्रमाणें हिंदूशिवाय इतर समाजांत व ख्रिश्चन समाजांत पतिनिधनानंतर गतभर्तृकेला मिळकतीचा वाटा मिळतो व तो संपूर्ण स्वामित्वाच्या हक्कानें मिळतो. पतीच्या मिळकतीची मुलें वारसदार असल्यास तिला मिळकतीचा तिसरा भाग मिळतो व या वारसदारांच्या अभावीं तिला अर्धा भाग मिळतो. मुसलमानांतही विधवा ही कायद्यानें अंशाधिकारी असते. सर्वत्र अशी स्थिति असतां हिंदू विधवेनें असें काय पाप केलें आहे कीं, ती मात्र पोटगीची तेवढी मालक व तीही कोणी सुखानें दिली तर! नाहींतर तेवढ्यासाठींही तिला कोर्टाची पायरी चढावी लागते!

अविभक्त कुटुंबांत विधवेला अन्नवस्त्राशिवाय कसलाही हक्क नाहीं. तें अन्नवस्त्रही धड मिळेनासें झालें तर तिला आपली दाद कोर्टापुढें लावतां येईल; पण ती तरी कव्हां? जर कुटुंबांतील इतर भागीदार वाटणी करून आपले भाग घेऊं लागतील तर अविभक्त कुटुंबांतील पुरुष भागीदार विधवेला अन्नवस्त्र देण्यास बांधलेले आहेत. पण पोटगीसाठीं मिळकत तोडून देण्यास बांधलेले नाहींत. (सावित्रीबाई विरुद्ध लक्ष्मीबाई) त्यांनीं मिळकत तोडून दिली तर भाग्य. नाहींतर तिनें सर्वांचे कष्ट उपशीत व कुजकीं नासकीं बोलणीं खात एकत्र कुटुंबांतच राहिलें पाहिजे.

अविभक्त कुटुंबांत राहणाऱ्या पुरुषानें स्वतःची म्हणून मिळकत केलेली असेल तरीहि त्याच्या पश्चात् स्त्रीला त्याच्या मिळकतीवर संपूर्ण हक्क मिळत नाहीं केवळ मर्यादित हक्कानेंच ती मिळकत तिला मिळूं शकते. स्त्रीच्या हातीं मिळकतीचा संपूर्ण हक्क दिला तर त्याचा तिला योग्य उपयोग करतां येणार नाहीं, हीच सगळी भीति. पण सत्ता द्या कीं शहाणपण येतेंच.

विधवेला मिळालेला मर्यादित हक्क इतरांना चांगलाच लुटावयास सांपडतो. अन्नवस्त्र, मुलाबाळांचीं लग्नकार्यें, इतर कौटुंबिकांचें भरणपोषण, योग्य धानधर्म, मिळकतीचें रक्षण इत्यादि कारणांसाठीं पतीनें स्वतः मिळविलेली मिळकत विकतां

येणें अगर गहाण टाकतां येणें हा विधवेला मिळणारा मर्यादित मालकी हक्क. तिचा हा मर्यादित मालकी हक्कहि न साहून तिच्या पतीचे चवदा पिढ्यांपर्यंत जे कोणी नातेवाईक असतील ते तिचा छळ करायला तयार असतात. नवऱ्याच्या पिंडाला कावळा शिवायच्या आंत कधीं जन्मांत तोंड न पाहिलेले हे सर्व नातेवाईक कांव कांव करूं लागतात.

तिच्या मर्यादित मालकी हक्कानें अधिकृत अशा गोष्टींसाठीं तिला अत्यंत निकडीच्या प्रसंगींहीं पैसे उभे करतां येत नाहींत. कारण तिच्या हालचालींवर या ठकांचें लक्ष्य असतें. नुसता कयास करूनही तिच्यावर खोट्यानाट्या फिर्यादींचे मोर्चे लावलेले असतात. अशा स्थितींत अज्ञानामुळें भांबावलेली बिचारी, संपत्ति असतांही सुखानें अन्न खाऊं शकत नाहीं. 'ती मिळकत नसतीच तर अब्रूनें राहतां आलें असतें' असें म्हणावयाची वेळ तिला येते.

नातेवाईकांची साडेसाती पतिनिधनानंतर जी लागते तीमुळें खरोखर विधवा 'नको ती मिळकत म्हणून जवळच्या वारसाच्या स्वाधीन करते. ही गोष्ट सर्वांच्या पथ्यावरच असते. कारण मिळकत तिच्या हातीं असतां त्यांनाही कांहीं करतां येत नाहीं. दोघेंही एकमेकांना शह लावून बसतात. ही मर्यादित मालकी हक्काची स्थिति पाहिली तर तिचे परिणाम असे होतात कीं, नित्य अशा दाव्यांची संख्या वाढून आहे नाहीं तो पैसा वकिलाच्या भरीस घालून पुढें तर कोर्टाची फी भरायला पैसाही उभा करतां येत नाहीं.

ही स्थिति पहातां बंगाल्यांत चालू असणारी दायभाग पद्धति पुष्कळच चांगली म्हणावी लागेल. बंगालशिवाय इतरत्र चालू असणारी मिताक्षरा पद्धति मुळांत इतकी अन्यायाची नसली तरी तिच्यावरील भाष्यकारांनीं केलेली पुंडाईची हातचलाखीच कोर्टानें मान्य केलेली आहे. बंगाल्यांत विधवा ही विभक्त अगर अविभक्त कोणत्याही कुटुंबांत असली तरी पतीच्या मिळकतीवर तिचें संपूर्ण स्वामित्व असतें. निपुत्रिक विधवेपेक्षां पुत्रवती विधवेची स्थिति काहींशीं बरी.

पुत्राला अविभक्त कुटुंबांत आपल्या भागाचा संपूर्ण हक्क मिळत असल्यानें पुत्रप्रेमानें विधवेचे दिवस कांहीं सुखांत जातात. पण पुत्राच्या प्रेमाची वांटेकरी त्याची पत्नी व मुलें झाल्यावर पुष्कळ वेळां आईही त्याला जडच वाटूं लागते. अशा स्थितींत पुत्रप्रेमाला ओहोटी लागून पुत्रावरच अवलंबून असणाऱ्या विधवा

स्त्रीला सुनेकडून व नातवंडांकडूनही अपमान सोसून राहण्याची पाळी येते. कारण तिनें वेगळें व्हावयाचें म्हटल्यास जगायचें कशावर? तिचें अन्नवस्त्र मुलाच्या ताब्यांत! हीच स्थिति विभक्त कुटुंबांतील पुत्रवती विधवेचीहि असते. द्रव्याची ऊब ज्या जवळ असेल तो गुणी, त्याला जगांत मान. तोच विद्वान्. त्याचीच सत्ता विधवेला अन्नाकरितां मोताद होऊन राहावयाचें तेथें तिचेजवळ मान, गुण व सत्ता कशी असणार ?

पति क्रोडोपति असतां त्याच्या छत्राखालीं उपभोगिलेलें स्वर्गसुख पतिनिधनानंतर शतपटीनें दुःखाला कारण होतें. नवकोटीची संपत्ति असली तरी पुत्राचें प्रेम असलें तर ती सुखी होणार.

या सर्व स्थितीला जबाबदार जे जुने न्यायपंडित त्यांना कोणी अमानुष म्हटल्यास वावगें होईल काय? जुन्या शास्त्रकारांकडे पहातां विज्ञानेश्वरासारखे स्त्रियांचे वाली कांहीं स्मृतिकारहि होते.

बृहस्पतिवचनाचा इत्यर्थ तर असाच आहे कीं, पतिनिधनानंतर स्त्रीचें आचरण जर पतीला स्वर्गांत अगर नरकांत टाकण्याला कारण होतें, इहलोकीं पतीच्या पापपुण्याची अर्धी वांटेकरीण पत्नीच असते तर पतीची मिळकत मात्र तिला कां मिळू नये ?

मनूनें स्त्रियांचें रक्षण करा असें सांगितलें, पण अशा गुलामगिरीनें त्यांचें रक्षण होणार कसें? त्यांचे मर्यादित हक्क म्हणजे त्यांचा छळ असें स्पष्ट दिसत असतां त्या छळाला त्रासून स्वतःच्या पोटाला स्वतंत्रपणें उद्योग करून मिळविणें हें कित्येक विधवांना अधिक बरें वाटतें. त्या उद्योगाचे मागें असतां त्यांचा त्राता कोणी नाहीं हें लक्षांत घेऊनच त्यांना अधोगतीला नेलें जात नाहीं काय? हक्काची काटकसर करून रक्षण तर राहोच, पण अधोगतीचा दरवाजा मात्र कांहीं स्त्रियांना खुला केला जातो! याची दिक्कत पुरुषांनीच बाळगली पाहिजे. कारण तेच याला जबाबदार आहेत. पापभीरु स्त्रीला अन्नाला महाग करणें म्हणजे तिच्या शीलरक्षणाचे मार्गावर काटे पसरणेंच होय व तसें करून ती अनीतिमान् झाल्यास तिचा पोटगीचा हक्क हिरावून घेणें म्हणजे हा दुहेरी अन्याय नाहीं कां ?

अन्नवस्त्राचा अधिकार हा अनीति अगर दुसरें कोणतेंही कारण सांगून हिरावून घेतां येऊं नये. लग्न करणें म्हणजे स्त्रीचे अन्नवस्त्राचे अधिकार मान्य कर-

णेंच होय. पति हयात असतां जो तिचा अधिकार तो पतीच्या पश्चात् तिचा कोणी वाली नाहीं म्हणून तर अधिक काळजीपूर्वक दिला पाहिजे.

तिला सासरच्या अगर माहेरच्या कोणत्याही माणसाकडे अन्नवस्त्राकरतां पहावें लागूं नये. तिचा कोणत्याही परिस्थितींत अन्नवस्त्राचा हक्क अबाधित राहिला पाहिजे.

त्याचप्रमाणें विधवा स्त्रीला पतीच्या मिळकतींतील तिच्या भागाची संपूर्ण मालकीण समजली पाहिजे. निपुत्रिक विधवा विभक्त कुटुंबांत असल्यास तिला पतीच्या मिळकतींत अर्धा भाग मिळाला पाहिजे. अविभक्त कुटुंबांत पुरुष भागीदारांच्या बरोबरीनें तिला भाग मिळाला पाहिजे व त्यावर तिचें संपूर्ण स्वामित्व असलें पाहिजे. मग तिनें आपल्या मिळकतींतून तिला वाटेल तो खर्च करावा. तिचा वांटा दिल्यावर उरलेल्या वांट्यांतून उत्तराधिकाऱ्यांचे (Reversioners) वांटे काढावे म्हणजे त्यांचा शह सदासर्वदा तिचे मागें नको. प्रत्येकाचा सवता सुभा झाल्यानें विधवेचा हक्क अबाधित राहील व कज्जाशिवाय उत्तराधिकाऱ्यांनाही मिळावयाचें तें मिळेल.

विधवा पुत्रवती असल्यास पतीच्या मिळकतींतील तिसरा हिस्सा तिला मिळावा व उरलेला वांटा मुलांना मिळावा.

अशा रीतीनें न्याय केल्यास विधवेचे, वारसदाराचे वकिलांचे, सर्वांचेच श्रम वांचतील. उत्तराधिकारी, औरस संतति, वृथा अनीतीचे आरोप यांमुळें आधींच विधवेच्या हक्कांची कुचंबणा होते. त्यांत तिनें दत्तक पुत्र घेतला म्हणजे तिच्या दुर्दशेला पारावार नाहीं.

३ दत्तकाची अनिष्ट चाल.

भिकाऱ्याला भिकेचे डोहाळे सुचतात असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. विधवेच्या कमनशिबानें आधींच तिच्या हालांना पारावार नसतो. तशांत दत्तक घेण्यासंबंधीं कांहीं तरी हक्कांचें खूळ तिच्या डोक्यांत शिरतें. पण खरें पहातां दत्तक घेणें हा ' हक्क ' नाहींच. हक्क हा कांहीं तरी फायद्यासाठीं असतो. तोट्यासाठीं नव्हे. दत्तक न घेतला तर विधवेजवळ संपत्ति मालकीहक्कानें राहते. स्वतः मालकीण म्हणून अन्नछत्र घालण्याची पात्रता असतांना, दुसऱ्याच्या हातीं संपत्ति देऊन त्या संपत्तींतून पोटाला कोणी घालील काय, अशी याचना करण्याचा ज्या दत्तकानें तिजवर प्रसंग येतो तो हक्क कीं आपत्ति ?

दत्तकासंबंधीं एखादें बिल कायदेकौन्सिलांत आलें कीं, विधवेच्या दत्तक घेण्याच्या हक्कावर गदा आली अशी आरोळी सुरू होते. पण स्त्रियांनीं त्यानें फसून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. दत्तक घेणें हें केवळ एक ऐच्छिक कर्तव्य होय, तें तिनें करावें अथवा न करावें. पण दत्तक घेणें याचा खरा अर्थ असलेली संपत्ति घालविणें असाच असल्यानें, ' हक्का ' च्या भावेंत बोलावयाचें तर वाटल्यास दत्तक न घेणें हाच तिचा खरा हक्क होय. पतीनें सांगितलें तरीहि दत्तक घेतलाच पाहिजे अशी विधवेवर कोणालाही सक्ती करतां येत नाहीं, असें मुत्तासादी विरुद्ध कुंडन (२८ अलाहाबाद, ३७७) यांत ठरलें आहे. एकीकडे आज स्त्रिया मिळकतीच्या हक्कांसाठीं भांडत आहेत. मग दत्तक घेऊन संपत्ति घालविण्याच्या मूर्ख व वेडगळ मार्गाला त्यांनीं आपला ' हक्क ' काय म्हणून म्हणावें ?

पण असें मानण्यांत त्यांनीं कांहींच विचित्र वाटून घेण्याचें कारण नाहीं. कारण त्याला लो. टिळकांच्याच म्हणण्याचा येथें आधार देतां येईल. टिळक हे वकील, पंडित, तसेच धर्मशास्त्रज्ञही होते. त्यांनीं १८८३ च्या केसरींत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, " आमच्या मतें हा संस्कार धर्माप्रमाणें अवश्य नसून तो ज्या वेळीं प्रचारांत आला, त्यावेळीं त्यापासून जे फायदे होते, त्यांपैकीं हल्लीं एकहि फायदा होत नसून उलट त्यांच्या शतपट नुकसान होत आहे. फार प्राचीन काळीं दत्तकाचा प्रघात हल्लीं आहे तितका जारीनें सुरू नव्हता. किंबहुना त्यास बिलकूल महत्व नव्हतें, असें म्हटलें तरी चालेल. मनु, याज्ञवल्क्य वगैरे स्मृतींतून अमक्यानें दत्तक घ्यावा, अमक्यानें घेऊं नये, एकच मुलगा असल्यास दत्तक घेऊं नये वगैरे जे नियम आढळतात ते वेदांत दिलेले नाहींत. शिवाय स्मृतिकारांनीं नापसंत केले असते असे दत्तक झाल्याचीं उदाहरणेंही वेदांत सांपडतात. विश्वामित्रानें आपले शंभर पुत्र हयात असतांही शुनश्शेपास आपला पुत्र केल्याची कथा ऋग्वेदांत आहे व यजुर्वेदांत अत्रि ऋषीनें आपले सर्व मुलगे और्व ऋषीस दिल्याचें सांगितलें आहे. धर्मग्रंथांतून बारा प्रकारचे पुत्र सांगितले आहेत. व कलियुगापूर्वीं ते सर्व प्रचारांत असल्यामुळें दत्तकाचें प्रस्थ आजच्या इतकें नव्हतें. मुलींनाही दत्तक घेत. हें पांडवांची आई व कुंतिभोज राजाची कन्या कुंती हिच्या उदाहरणावरून दिसतें.

" स्वर्गप्राप्ति व पिंडोदक देण्यास दत्तकाखेरीज उपायच नाहीं असें मानतां

येत नाहीं. दत्तकानें अमुक एक कार्य होतें असें जरी मानलें तरी तेवढ्यानें तें कार्य दत्तकावांचून होत नाहीं असा अर्थ निघत नाहीं पुत्राचें (मग तो दत्तक असो वा औरस असो) तोंड पाहिल्याखेरीज जर स्वर्ग मिळत नसेल तर आद्यजगद्‌गुरु शंकराचार्यांची वाट काय ? तुकारामबोवा कुठें आहेत व वामन पंडितांच्या ' अजितनाम घडो भलत्या मिसें ' या सूत्राचें काय करावयाचें ? पुत्रादि वारस असतांही आपल्या हयातींतच ' जीवत् श्राद्धं ' आपणांस उरकून घेतां येतें. धर्मशास्त्राची एवढी सोय असतां मरतां मरतां दत्तक घेण्याची एवढी ओढ कां बरें असावी ? ' कुचबी करना और लडका बनाना ' अशी कित्येकांस इच्छा होते. पण " पुत्र प्रतिनिधिः काम्य एव " म्हणजे दत्तक वस्तुतः अनवश्यक आहे असा स्पष्ट शास्त्रार्थ, दत्तकमंजरीकरांनीं दिला आहे.

" दत्तकाचा दुसरा हेतु म्हणजे नामसंकीर्तन. पण आपलें नांव चालविण्याच्या दुसऱ्या हेतूस महत्त्व देणें किंवा न देणें हें प्रत्येकाच्या मर्जीवर आहे. मनुष्यजातीच्या प्राथमिक कुटुंबावस्थेत अशी गरज कदाचित् असेल; परंतु आतां तशी गरज राहिली नाहीं. शिवाजीचें स्मरण आपणांस राहण्यास संभाजी कारण झाले काय ? किंवा नाना फडणविसांच्या कुटुंबानें त्यांच्यामागें दत्तक घेतल्यामुळेंच त्यांचें नांव इतिहासांत आलें काय ? घराण्याचें नांव कांहीं तरी चालवील असा मुलगा दत्तक घेतल्यास उपयोग. पण असा दत्तक आपल्यापैकीं कितीजण घेतात ? बंडांत नाना खेरीज करून किती दत्तकांनीं तरवार गाजविली आहे ? बोलून चालून एखादा पोर धरून आणून दत्तक करावयाचा मग अशा पोरानें आपलें नांव राखण्यापेक्षां बुडविल्यास आश्चर्य कोणतें ?

" दत्तक कोणत्याही प्रसंगीं न घेण्यास फक्त एकच अपवाद आहे. तो म्हणजे, ज्या इस्टेटीस कांहीं कामगिरी जोडलेली असते त्यासंबंधीं होय. यांत पाटिलकीपासून राजापर्यंत सर्वांचा समावेश होतो. अशा इस्टेटीचा मालक औरस संततीवांचून मयत झाला असतां त्याच्या पाठीमागें त्याची कामगिरी बजावण्यास कोणी तरी मनुष्य पाहिजेच. राजा निपुत्रिक मेला व त्याची गादी चालविण्यास कोणी नाहीं. यांत लोकांचें नुकसानच आहे. करितां अशा ठिकाणीं दत्तक घेण्यास हरकत नाहीं. परंतु माझी संपत्ति म्हणून मालकानें तरी ती दत्तकाच्या रूपानें हवी तशी उधळावी काय ? मिळवणारानें किंवा त्याच्या औरस

संततीनें संपत्तीचा उपभोग घ्यावा, पण या दोहोंच्या अभावीं समाजाचा म्हणजे सार्वजानिक हिताचाच त्यावर हक्क आहे. केवळ मीं द्रव्य मिळविलें म्हणून त्यावर माझा हक्क नाहीं, तर लोकांनीं तो हक्क कबूल केल्यामुळें तो मला प्राप्त झाला आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ”

वरच्या मार्मिक उताऱ्यावरून दत्तकाच्या ‘ धार्मिकतेबद्दल ’ भ्रम दूर होण्यासारखा आहे. दत्तक घेऊन घराण्याच्या अब्रूचे धिंडवडे करण्यापेक्षां विधवांनीं इहलोकीं पुण्याचरणानेंच पतीचें परलौकिक हित साधावें. त्यांनीं पतीची इहलोकीं काळजी केली म्हणजे पुरे. पारलौकिकाकरितां ऐहिक व्यवहार भरीला घालण्याचें कारण नाहीं. अविभक्त कुटुंबांत आधींच स्त्रियांची मालकी केवळ पोटगीपुरती व त्यांत दत्तक पुत्रांची भर ! म्हणजे सर्व बाजूंनीं अग्नि पेटवून मध्यें बसण्याइतकेंच त्यांना सौख्य लागणार.

विधवा हातीं सांपडली म्हणजे भाऊबंदांची भर. सर्व बाजूंनीं ते तिला जळूप्रमाणें लागतात. सुष्ट दुष्ट कसाही नवरा लाभला तरी ती एकाचीच ताबेदार असते, पण तीला विधवापणीं या हक्कदारांच्या रूपानें हे दहा ताबेदार गिळावयाला उठतात. त्यांतून रक्षण होण्याकरितां तिनें एकादा दत्तक मुलगा आपला म्हणून मांडीवर घ्यावा तर, या पुरुष हक्कदारांचा ससेमिरा तिकडेही वळतो.

हे अविभक्त कुटुंबांतील पुरुषभागीदार म्हणजे साळूप्रमाणें असतात. साळू जशी स्वसंरक्षणार्थ आपल्या तीक्ष्ण पिसांचा मारा जवळ येणारावर करते त्याप्रमाणें संपत्तीबाबत आपला हक्क रक्षण करण्यासाठीं रागद्वेषांचीं तीक्ष्ण हत्यारें उपसून हे पुरुष भागीदार बसलेले असतात. त्यांतच विधवेनें दत्तक घेतला म्हणजे तिच्या सौख्याची फुटलेली नाव जी प्रहरांत बुडावयाची ती पळाभरांतच बुडून रसातळाला जाते.

बरें, हा जो एवढा मायेचा पूत व पतीला वैतरणी नदींतून वाचवतांना हात देणारा, पुत्र प्रतिनिधी, त्या दत्तक मुलानें तरी उपकारकर्त्या दत्तक आईस स्मरावें ? तिची थोडी तरी सोय पहावी ? दत्तक जाण्यापूर्वी केलेले करार व दिलेली वचनें थोडींतरी पाळावीं ? पण तें तर होत नाहींच. पण दत्तकाच्या पित्यापाशीं दत्तक घेण्यापूर्वी विधवेनें केलेले सर्व करार रद्द ठरतात ! (प्रिव्ही कौन्सिल १९२७ कृष्णमूर्ती विरुद्ध कृष्णमूर्ती) कां तर करार करून पुत्र देणें घेणें हा क्रय-

विक्रय आहे व कायदा अशा अनीतीला आपला पाठिंबा कसा देईल? ज्या धर्मबुद्धीनें विधवा दत्तक घेते त्या तिचें धर्मकार्य एकादे तरी दत्तक मुलानें चालवावें! पण एवढी साधी गोष्टही करारांत असली तरी तिच्या पदरांत पडत नाहीं. मानाची पदरमोड व पैशांची पदरमोड!! मुलाविरुद्ध फिर्याद लावण्याला तिच्या गांठीं कवडीहि शिल्लख रहात नाहीं. व अखेरीस तिला नादारींत फिर्याद लावावी लागते. कुटुंबाच्या देवालयांतील नंदादीपाचा खर्च चालावा अशी केवळ एक साधी अट म्हणे एका विधवेनें दत्तक घेण्यापूर्वी मुलाच्या बापापाशीं केली होती पण मुलगा कुलदीपक निघाला! तो आला तों त्यानें घरचा नंदादीप लाथाडून टाकला. कां तर निष्कारण खर्च होतो म्हणून! कोर्टानेंही विधवेशीं पूर्वी केलेला ठराव बेकायदेशीर ठरवला. (बाळकृष्ण वि. उत्तर नारायण ४३ मुंबई ५४२)

पण दत्तकाच्या अनिश्चितेसंबंधीं येथें जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. कारण तो हिंदुकायद्याचा विषय होय, तथापि दत्तकामुळें वारशाच्या हक्कांत इतक्या गुंतागुंती भानगडी व तंटे उत्पन्न होतात कीं वाटतें मरो तो दत्तक. बापापाठीमागें तोहि कां जात नाहीं?

हिंदूधर्मशास्त्रांतले निदान शेंकडा ६० दावे दत्तकाच्या भानगडीचे असतात. लोकांच्या शक्तीचा व पैशाचा हा कोण अपव्यय! दत्तक घेण्याचा हेतु पारलौकिक नाहीं, धार्मिक नाहीं, व व्यावहारिकही नाहीं. उदारबुद्धीनें केवळ दुसऱ्याला उपकृत करण्याचें लक्षण इतकीच त्याची वास्तविक किंमत पेशवाईत व स्वराज्यांत औरस मुलें असतांनाही दत्तक घेतच असत कीं नाहीं! त्याचाही अर्थ आपली ऐहिक उदार धर्मबुद्धि होय. पण इंग्रजी राज्यानें आपल्या बुद्धीवर अभ्रें पसरलीं व धर्मशास्त्रांत नसलेलींही बंधनें आपण धार्मिक म्हणून मानूं लागलों. सरते शेवटीं एका इंग्रज पंडितानें तर असा निकाल दिला कीं मुसलमान होऊन धर्मांतर केलेल्या माणसासही आपला हिंदू मुलगा दत्तक म्हणून दान करतां येतो! एकीकडे धर्मशास्त्र न कळणारे सनातनी व दुसरीकडे अकलेचे खंदक इंग्रजी परके न्यायधीश हे अशी विद्वत्ता पाजळावयाला निघाल्यावर खऱ्या हिंदुधर्मशास्त्राचा चिचका होण्यास काय उशीर.

पण हा सर्व घोटाळा निस्तरण्याकरतां एक उपाय सुचवितां येईल. व तो हाच कीं, एकतर टिळकांनीं सुचविलेल्या अपवादाखेरीज दत्तक अजीबात बंद करावा.

अगर दत्तकावरील आजचे सर्व निर्बंध काढून टाकावे. याशिवाय त्याचें प्रस्थ कमी होणार नाहीं. औरस पुत्राखेरीज इतर बाराही पुत्र कलियुगांत नष्ट झाले तर दत्तक तरी काय म्हणून रहावा ? व तो रहावयाच तर इतर बारांपैकीं कांहीं पुत्र तरी बेकायदेशीर ठरावे ते काय म्हणून? औरस पुत्र असतांनाही दत्तक घेतां आले, मुली दत्तक झाल्या, दत्तक पुत्रांना ' कृतिम ' पुत्राइतकेंच महत्व राहिलें इत्यादि गोष्टी झाल्या म्हणजे कसलाच तंटा रहाणार नाहीं ! मिथिलामध्यें प्रचारांत असलेल्या कृत्रिम पुत्रपद्धतींत कांहीं गोष्टी फार चांगल्या आहेत असें वाटतें. वाटेल त्यानें वाटेल तो दत्तक घ्यावा; नवऱ्यानें एक व बायकोनें स्वतःचा दुसरा, असे वेगळे दोन मुलगे घेतले तरी हरकत नाहीं, जो दत्तक जाईल व जो घेईल त्यांच्यामधील वारसा एकमेकांतच असावा. कुटुंबांतील इतर नातेवाईकांशीं त्याच्या वारशाचा कोणताही संबंध असूं नये व त्यांनीं मानूं नये, एकत्र कुटुंबांत तो राहिला, तरी तो अविभक्त कुटुंबाचा घटक असें मानण्यांत यऊं नये, इत्यादि अनेक चांगल्या गोष्टी त्या पद्धतींत आहेत. पण आम्ही ही पद्धत कां घ्यावयाची नाहीं ? तर म्हणे लोकाचार नाहीं ! आम्ही मात्र धर्म पाळतों, मिथिलेंतले लोक काय पाप कोळून पितात ? ही गोष्ट त्यांच्याकडे अनीति गणलेली नसली तर येथेंही ती शिष्टसंमतच कां मानूं नये ? पण या सुधारणा कितीही खऱ्या व इष्ट असल्या तरी त्या होणार कशा ? कारण शेळीचे कान गोसाव्यांच्या हातीं ! तो वळवील तशी ती आपली मान वळवणार !

स्त्रीधन.

स्त्रीधन म्हणजे सर्वस्वीं स्त्रीच्या मालकीची असणारी मिळकत. स्त्रीधन हें शुल्कांतून उगम पावून पुढें त्यांचें स्वरूप विस्तृत झालें. ऋषींनीं विविध प्रसंगीं स्त्रियांना जें जें मिळेल तें तें धन स्त्रीधन म्हणून गणल्याकारणानें लग्नाचे वेळीं मिळेल, तेवढेंच स्त्रीधन असा निर्बंध राहिला नाहीं. मनूनें स्त्रीधन सहा प्रकारचें सांगितलें आहे:—

लग्नाचे वेळीं अग्नीसमोर मिळालेलें गृहप्रवेशाचे वेळीं मिळालेलं, प्रेमाची भेट म्हणून कोणी दिलेलें, तसेंच आई, बाप, व भाऊ यांजकडून मिळालेलें असें सहा प्रकारचें धन हें स्त्रीधन. मनूच्या स्त्रीधनाच्या कल्पनेचा याज्ञवल्क्यानें विस्तार केला व याज्ञवल्क्यानें मांडलेल्या कल्पनेवर भाष्य करतांना विज्ञानेश्वरानें आपल्या

मिताक्षरा नामक टीकेंत स्त्रीधनाची व्याप्ति इतकी केली कीं त्यामुळें त्यानें स्त्री-पुरुषांचे मिळकतीवर समसमान हक्कच कबूल केल्याप्रमाणें झालें. त्याच्या स्त्रीधनाच्या व्याख्येकडे पहातां ती इतकी सुलभ व स्पष्ट आहे कीं, त्या व्याख्येप्रमाणेंच सध्यांचा कायदा असता, तर स्त्रियांचीं दुःखें वेशीवर टांगण्याचा प्रसंगच आला नसता.

" आईबाप, भाऊ, पति यांनीं दिलेलें, विवाहाचे प्रसंगीं अग्नीसमोर मिळालेलें पतीच्या दुसऱ्या लग्नाचे वेळीं त्यानें प्रथम पत्नी म्हणून बक्षिस दिलेलें इत्यादि सर्व धन हें स्त्रीधन. " या याज्ञवल्क्याच्या वचनांतील ' इत्यादि ' शब्दावर विज्ञानेश्वरानें टीका करून " स्त्रीला वारशानें मिळालेलें, विक्रीनें व वांटणीनें मिळालेलें स्वसंपादित असें जें सर्व प्रकारचें धन त्याचा समावेश केला आहे.

पण टीकाकारांच्या तरवारी विज्ञानेश्वराचें खंडण करावयास उपसलेल्या होत्याच ! त्यांतून हा स्त्रियांचा प्रश्न ! तेव्हां त्यांनीं सर्वच छाटाछाट केली. स्त्रीधन कोणतें होऊं शकतें हें पहातांना कोर्ट हें या टीकाकारांचेच पुरावे घेत असल्यानें बहुतेक स्त्रीधनाची व्याप्ति शून्याकारच व्हावयाची. सलेम्मा विरुद्ध लछमन २१ मद्रास १०० या खटल्यांत मात्र कोर्टानें स्पष्ट म्हटलें आहे कीं अमुक एक स्त्रीधन आहे कीं नाहीं हें विज्ञानेश्वराच्या वचनानेंच ताडून पहावें. त्याप्रमाणें असणारें स्त्रीधन हें स्त्रीधन कसें नाहीं हें सिद्ध करीपर्यंत तें स्त्रीधनच समजलें जाईल. मद्रास हायकोर्टानें विज्ञानेश्वराचेंच उदारमतवादी धोरण स्वीकारलें. पण असा समसमान हक्कांचा उदारपणा सर्वत्र थोडाच पहावयास मिळणार ?

मंगलप्रसाद विरुद्ध महादेवप्रसाद (१९१२) ३४ अलाहाबाद ४३४ या खटल्यांत विज्ञानेश्वराला धुडकावून प्रिव्ही कौन्सिलनें अनुदार धोरण स्वीकारलेंच कीं नाहीं ? आणि नुसतीं उदार मतें असून तरी उपयोग काय ? कलाकुसरीच्या उद्योगानें मिळविलेलें धन हें स्त्रीधन असावें. कुमारी अगर गतभर्तृका यांनीं संपादिलेलें द्रव्य हें स्त्रीधन समजावें असें सर्व कोर्टांनीं मान्य केलें आहे, पण सधवेनें स्वतः संपादित केलेलें द्रव्य तिचें होऊं शकत नाहीं असें दायभाग व मिथिला संप्रदाय म्हणतो. याचें कारण एवढेंच कीं, स्त्री ही पतीची दासी समजली असल्यानें तिचें तें त्याचेंच व त्याचें स्वतःचें तें त्याचेंच अशी स्थिति होते.

वस्तुतः विज्ञानेश्वराचें म्हणणें ग्राह्य समजून स्वकष्टार्जित अथवा वारसा वगैरे पूर्वी उल्लेखिलेल्या कारणानें आलेली मिळकत ही स्त्रीच्या हयातींत सर्वस्वीं तिच्या हक्काची असली पाहिजे. मग ती स्त्री कुमारी, सधवा अगर विधवा कशीही असो. तिचें हें स्त्रीधन तिच्या वारसांना मिळावें.

मिळालेली पोटगी म्हणून अगर बक्षीसादाखल म्हणून कुमारी, सधवा अगर विधवा यांना आईबाप, इतर नातेवाईक अगर पति यांजकडून जें जें मिळेल तें तें स्त्रीधन होय असें सर्व शास्त्रकारांचें मत असलें तरी दायभाग सांप्रदाय स्थावर मिळकत ही स्त्रीच्या संपूर्ण हक्काची समजत नाहीं. त्या मिळकतीची कोणत्याही प्रकारची व्यवस्था पतीच्या संमतीवांचून स्त्रीला करतां येत नाहीं.

त्रयस्थांनीं दिलेलें धन.

नातेवाइकांशिवाय इतरांनीं म्हणजे त्रयस्थांनीं दिलेल्या मिळकतीची गणना मुंबई, मद्रास व बनारस येथील सांप्रदाय स्त्रीधनांत करतात. पण दायभाग सांप्रदाय हीं मिळकत सधवेला मिळालेली असेल तर ती स्त्रीधन म्हणून समजत नाहीं. कुमारी अवस्थेंत अगर गतभर्तृका झाल्यानंतर मिळालेली मिळकत ही मात्र सर्व सांप्रदायांत स्त्रीधन म्हणून समजली जाते. विवाहाचे वेळीं अग्नीसमोर मिळालेलें धन अगर वरातीचे वेळीं मिळालेलें धन हें सर्व सांप्रदाय स्त्रीधन म्हणून समजतात.

पुरुषाच्या कोणत्याही स्वरुपाच्या मिळकतीवर स्त्रीचा कुमारी सधवा अगर विधवा यांचा संपूर्ण हक्क असूं शकत नाहीं; कारण स्त्रीला मिळकतीच्या भागावर संपूर्ण स्वामित्व दिल्यास स्त्रीधनाप्रमाणें तिचा भाग हा केवळ तिच्या वारसदारांकडेच जाईल व समाईक मिळकतीचे तुकडे तुकडे होऊन जातील. स्त्रीला मिळालेली मिळकत ही पुरुष भागीदारांना मिळणें अशक्य होईल.

पण अन्याय पुरुष भागीदारांनाही होऊं नये व स्त्री भागीदारांनाही होऊं नये असा कायदा केला तर तो न्यायाचा होईल.

स्त्रियांना मर्यादित स्वामित्वाचा हक्क देणें हा अन्याय आहे. त्यामुळें नुसत्या पोटगीशिवाय वस्तुतः कोणत्याही कारणासाठीं त्या हक्काचा उपयोग होऊं शकत नाहीं. मयताच्या कर्जनिवारणासाठीं अगर त्याच्या पारलौकिक कल्याणासाठीं मर्यादित हक्काचा उपयोग करतां येतो. पण तो करूं लागल्यास उत्तराधिकारी

(Reversioners) शह लावून नसत्या भानगडी व कज्जे निर्माण करतात. तरी संपूर्ण स्वामित्वाचा हक्क ज्याप्रमाणें पुरुष भागीदारांना असतो त्याप्रमाणेंच स्त्रियांना जें धन अगर मिळकत मिळेल त्यावर त्यांचा संपूर्ण हक्क असला पाहिजे.

पतीच्या पश्चात् पुत्र अगर कन्यांच्या अभावीं पतीच्या अर्ध्या मिळकतीवर पत्नीचा संपूर्ण हक्क असला पाहिजे. जर तिला मुलगे असतील तर मुलांच्या हिश्याचा निम्मा हिस्सा तिच्या स्वामित्वाचा असला पाहिजे. मुलगे व मुली दोन्ही असल्यास मुलांच्या हिश्यांचा निम्मा हिस्सा मुलींना व निम्मा पत्नीला मिळाला पाहिजे.

संपूर्ण हक्कानें स्त्रियांना मिळणाऱ्या या मिळकतीचा वारसा स्त्रीधनाप्रमाणें केवळ स्त्रीवारसदारांकडेच जाऊं नये तर ती मिळकत मुलामुलींची म्हणून समजली जावी. त्या मिळकतीची विभागणी दोन भाग मुलीला तर एक मुलाला या प्रमाणांत व्हावी म्हणजे मिळकत पुरुषभागीदाराकडून नाहींशी होऊन सर्वस्वीं स्त्रियांची होईल अशी जी भीति आहे ती निर्मूल होईल.

पुरुष भागीदारांच्या मिळकतीची वाटणी करतांना मुलीला एक वांटा तर मुलाला दोन व स्त्री भागीदारांच्या मिळकतीची वांटणी करतांना दोन वाटे मुलीला तर एक वांटा मुलाला, असें प्रमाण ठरविल्यास कोणालाच अन्याय सोसावा लागणार नाहीं. कायदा याप्रमाणें अधिक सोपा व स्पष्ट केला तर पूर्वीपासून चालत आलेले गोंधळ व स्त्रियांच्या हक्काची झालेली पायमल्ली नाहींशी होऊन स्त्रिया या पुरुषांप्रमाणेंच आदरानें, मानानें वागविल्या जातील.

प्रकरण ८ वें

उपसंहार

येथपर्यंत स्त्रियांच्या हक्कांत काय सुधारणा केल्या पाहिजेत याची चर्चा केली, त्यावरून वाचकांस त्यासंबंधीं सामान्य कल्पना येईल. तथापि यासंबंधीं विस्तृत व यथास्थित ज्ञान होण्यास हिंदु कायद्याचेंच एकादें पुस्तक स्त्रियांना समजेल अशा सोप्या सुबोध भाषेंत लिहिलें गेलें पाहिजे. सरते शेवटीं उपसंहारादाखल दोन शब्द सांगून पुरे करूं.

सुधारणा या शब्दासंबंधानें अनेकांच्या अनेक कल्पना असतात. पण त्यासंबंधीं इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, 'सुधारणा' या शब्दाला एकच व ठरीव अर्थ नाहीं. हा शब्द सापेक्ष आहे असेंच इतिहासज्ञ म्हणतील. चालू स्थितीविरुद्ध "प्रतिक्रिया" एवढाच त्याचा अर्थ. समाज हा सुधारणेचीं स्थित्यंतरें करून वेळोवेळीं आपला धर्म परिस्थितीप्रमाणें बदलत असतो, हेंच त्यानें अखेर सिद्ध होतें. सुधारणेचीं उदाहरणेंहि अगदीं परस्परविरोधी मांडून दाखवितां येतील. मग तुम्ही कशाला सुधारणा म्हणाल? वेदकाळीं मांसाशन व सुरापान हेंच रूढ होतें. पण स्मृतिकारांनीं सुरापान निषिद्ध ठरविलें व मांसाशनावर प्रतिबंध घातले. त्यांना हीच सुधारणा वाटली. वेदांचा आधार दाखवून आजहि कोणी मनुष्य सुरापान धर्मविहित आहे असें म्हणेल तर कोणीहि सनातनी त्याला उत्तर देईल कीं वेदांमध्यें तसें असलें तरी माझ्या काळाचा मालक मीं आहें. वेद वंद्य असला तरी ही गोष्ट आज समाजानें निषिद्ध ठरविली आहे. एकवेळ नियोग धर्म्य होता. सुधारणेनें तो निषिद्ध ठरविला. वेदाच्या काळीं प्रौढ विवाह चालू होता, पण स्मृतिकारांच्या काळीं बालविवाह हीच सुधारणा ठरली. व तशी खरोखरच समाजाला आवश्यकता नसती तर केवळ स्मृतिकारांनीं वाक्य लिहिलें म्हणून समाजानें ती उचलून धरलीच नसती. हिंदुस्थानांत आज आपण प्रौढविवाह पाहिजे ह्मणतों पण पाश्चात्य देश त्या टोकापासून झुकून बालविवाह करावे असें म्हणूं लागले आहेत. पूर्वी परदेशगमन हें निषिद्ध होतें. आज परदेशगमन हें शिष्टसंमत झालें आहे. आम्ही अनेकपत्नीत्वाकडून मनानें एकपत्नीत्वाकडे झुकूं लागलों आहोंत. पण गेल्या महायुद्धामुळें पुरुषसंख्येची दाणादाण झाल्याबरोबर अनेकपत्नीत्व बेकायदा नाहीं, असें युरोपांत कांहीं ख्रिस्ती राष्ट्रांतहि दिसूं लागलें आहे. एकपत्नीत्व हा शब्द मुसलमानांना आजपर्यंत कळलाहि नसेल. पण केमालपाशाच्या हातीं तुर्कस्थान आल्याबरोबर बहुपत्नीकत्वाला कायद्यानें बंदी झाली व जुगोस्लाव्हिया, बॉसनिया या मुसलमानी देशांतहि नुकतेच असे कायदे पास झाले असल्याचें वर्तमानपत्रांत आलें आहे. विधवाविवाह यापूर्वी निषिद्ध होता. आतां त्याला शास्त्राची संमति मिळाली आहे. दत्तक कायद्यानें बंद होईल तर बरें असें आपणाला वाटतें. पण दत्तकाच्या चालीला गेल्या दोनच वर्षांत इंग्लंडमध्यें कायद्यानें मान्यता मिळाली आहे. या सर्वांचा अर्थ सुधारणा या शब्दाला एकच विवक्षित असा अर्थ

नाहीं. समाजाची सुधारणा ही लंबकाच्या गतीनें नेहेमीं आंदोलनें घेत असते, रूढीनें एक टोंक गांठलें की प्रतिक्रिया होऊन आपोआपच दुसरें टोंक गांठलें जातें,

सद्यःस्थिति पहातां अशाच तऱ्हेची आहे. रूढीमुळें सध्यांच्या काळाला कांहीं गोष्टी इतक्या अनिष्ट वाटूं लागल्या आहेत कीं प्रतिक्रिया झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्याशिवाय समाजाचें पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं.

स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेकरितां आज कायद्याची मदत घेतली, तथापि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कायदा हें सामाजिक सुधारणेच्या अनेक शिष्ट-संमत साधनांपैकीं ' केवळ एक ' साधन होय. त्याच्याच जोडीला लोकशिक्षण व लोकजागृति नसेल तर कायदेशीर सुधारणा टिकूं शकत नाहीं. डोंगरावर पाऊस पडावा आणि अनेक ओहोळांनीं वाहून जावा अशीच स्थिति सुधारणेची होते. लोकजागृतीनेंच कायदा पचनीं पडतो.

कोणताही कायदा करावयाचा तर प्रथम थोडीशी खळबळ होते, पण समाजांतील मध्यम सुशिक्षित वर्गाचें लोकमत तयार झालें असल्यानें समाजांतच भेद पडून वाद होतात व कणगींत धान्य हलवून भरावें त्याप्रमाणें सुधारक दुर्धारकांच्या वादांनीं व सरकारी पाठिंब्यानें सुधारणा अखेर लोकसमाजाच्या गळीं उतरते.

आज चाळीस वर्षांत देशांत शिक्षण वाढलें, स्त्रीशिक्षणाचा प्रचार रूढ झाला, स्वराज्याच्या आकांक्षा उत्पन्न होऊन स्वातंत्र्याच्या कल्पना उदित झाल्या व लोकप्रतिनिधिनिदर्शक कायदेकौन्सिलें अस्तित्वांत आलीं, मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा पाया घातला गेला, स्त्रिया आपल्या आकांक्षा निश्चयानें बोलून दाखवूं लागल्या व या स्थित्यंतराचें दिग्दर्शन म्हणूनच सरकारकडून पाठिंबा मिळून प्रौढ विवाहाचा कायदा पास झाला हें खरें. तथापि देशांतला सर्व स्त्रीसमाज सुशिक्षित झाला काय ? अशा प्रश्नाला " नाहीं, मुळींच नाहीं! " असेंच उत्तर द्यावें लागेल. केवळ **शेंकडा दोन** इतक्या स्त्रियांना लिहितां वाचतां येतें असें हर्टाग कमिटीच्या रिपोर्टींत म्हटलें आहे व मुलींचीं लग्नें लवकर होतात म्हणून स्त्रीशिक्षणाचा प्रसार होत नाहीं अशी तक्रार केली आहे.

पण कायद्याची मदत मिळाली तरी सुधारणा घडवून आणण्याची पात्रता स्त्रियांच्या अंगीं अखेर शिक्षणानेंच येणार हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. कल्पना करा कीं, स्त्रियांना जेवढे म्हणून हक्क पाहिजेत तेवढे सर्व आज मिळाले पण अडाणी

स्त्रीच्या हातीं हजार रुपयांचा चेक दिला असतां बाजारांत त्याचा तिला जितका उपयोग होईल तितकाच या कायद्यांचाहि होईल. ती सुशिक्षित, खणखणीत व खंबीर असेल तर एक वेळ कायदा विरुद्ध असला तरी आपली स्थिति ताब्यांत ठेवून सुधारेल, पण तीच एकादी अडाणी असली तर कायद्याची सर्व मदत तिला मिळूनही तिच्या संसाराची दुर्दशा होण्याचें थांबणार नाहीं. म्हणून सार्वत्रिक हिताहिताच्या दृष्टीनें कायद्याची कितीही जरूरी असली तरी व्यक्तिशः शिक्षण मिळण्याची व तें मिळण्यासाठीं त्वरा करण्याची आकांक्षा धरणें हेंच स्त्रियांचें पहिलें कर्तव्य होय.

परिशिष्ट

दत्तकाच्या कायद्याची सुधारणा

ना. भास्करराव जाधव यांनीं दत्तकासंबंधीं जें एक बिल मुंबई–कौन्सिलांत नुकतेंच आणलें होतें तें लोकपक्षीय सभासदांकडून विरोध झाल्याकारणानें कसें परत घेतलें गेलें ही हकीकत आतां सर्व श्रुत आहे. ‘अनारंभोहि कर्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम्’ या न्यायानें असलें वेडेंवांकडे बिल आधी आणावयास नको होतें! पण आणलें तर ‘प्रारब्धस्य अन्त गमनम्’ हें द्वितीय बुद्धिलक्षणहि त्यांनीं दाखविलें नाहीं. व विरोधाला सुरवात झालेली पाहतांच आयत्या वेळीं अवसानघात होऊन माघार घेतली! मुळीं दत्तकच घेतां येऊं नये असा पक्ष ते बिलामध्यें स्वीकारते तर त्याला एक परीनें कांहीं अर्थ होता. पण भाऊबंदाची तेवढी भर होऊन विधवेची कष्टमय स्थिती काडीभर देखील सुधारूं नये असा जो त्यांनीं निरर्थक प्रयत्न करून पाहिला त्यांत त्यांचें स्त्रीदाक्षिण्य तरी काय दिसून आलें? जाधवांच्या बिलाची वाट लागलीच आहे. तथापि त्यामुळें दत्तकाच्या कायद्यामध्यें खरी सुधारणा कोणती केली पाहिजे असा प्रश्न साहजिकपणेंच उपस्थित झाला असल्यामुळें त्याबद्दल दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

(१) पहिली सुधारणा अशी कीं दत्तविधान झाल्यावर करारपत्राबरोबर दोघां साक्षीदारांनीं आपण सदर दत्तविधान खरें असून प्रत्यक्ष झालें असल्याचें पाहिल्याबद्दल रजिस्ट्रारपुढें शपथपत्रकांत लिहून दिलें पाहिजे. दत्तविधानाचे महत्वाचे मानानें ही फार साधी गोष्ट आहे. व एवढी काळजी घेतली तर दत्तविधान शाबीत का नाशाबीत अशा मुद्द्यावर एकहि खटला कोर्टांत जाणार नाहीं. या एका मुद्यावर इतके खटले झाले आहेत व पैशाची उतकी उधळपट्टी व दुर्दशा झाली आहे कीं पाहून तिटकारा येतो. आज कागदपत्रांवर साक्ष घालण्याची तऱ्हा अशी आहे कीं, करार करणारांनीं आपल्या समक्ष सही केली इतकीच साक्षीदाराची जबाबदारी. पण ज्याबद्दल करार झाला त्या गोष्टी खऱ्या असल्याची साक्षीदारास माहिती आहे असें कायदा मानीतच नाहीं. दत्तक देणारा व घेणारा यांनीं कागदावर आपणासमक्ष सह्या केल्या इतकेंच फक्त साक्षीदारानें बोलावें. पण मुख्य दत्तविधानाबद्दल खुशाल कानावर हात ठेवावे ! अशी स्थिति असल्यावर मग दत्तविधान असिद्ध ठरण्याला काय उशीर ?

पण ही सर्व दुर्दशा स्मृति ग्रंथांतील कांहीं गोष्टी कोर्टांनीं आवश्यक व बंधनकारक अशा न मानल्यानेंच झाली आहे असें खेदानें म्हणावें लागतें. दान व प्रतिग्रह हें मुख्य कलम हें, मान्य. पण ' ससाक्षिकं ' व राजानें आहूय ' असे शब्द स्पष्टपणानें स्मृति ग्रंथांत लिहिले आहेत त्याची वाट काय? तेहि आवश्यक कां मानावयाचे नाहींत? साक्षीदार पुढें पैशाचे लोभानें बंदलण्याचा संभव असतो म्हणून त्याच वेळीं करारपत्राबरोबर साक्षीदारांचें शपथपत्रक रजिस्टर व्हावें ही सुधारणा गैर नाहीं. दत्तविधानाचे वेळीं राजाला बोलवावें, पण दर ठिकाणा राजा हजर असण्याचा संभव नाहीं, म्हणून त्याचे ऐवजीं ' ग्रामपाल ' यानें हजर राहावें असें वीरमित्रोदयानें आपल्या टीकेंत सांगितलें आहे. ' राजा ' व ' ग्रामपाल ' हे शब्द पूर्वीच्या रजिस्ट्रेशनचेच वाचक आहेत. व ग्रामपाल दत्तविधानाची आपल्या खात्यावर नोंद करून घेत असला पाहिजे असें दिसतें. दत्तविधानाचा करार ससाक्षिक रजिस्टर केला पाहिजे अशा सूचनेवर आक्षेप घेतांच येत नाहीं, इतकी ती सशास्त्र व निरपवाद आहे. शंभर रुपयांवरची स्थावर मिळकत बक्षीस द्यावयाची अगर दुसऱ्यास विकावयाची तर कराराचा कागद रजिस्टर केल्याशिवाय चालत नाहीं. पण दत्तविधानाचे बाबतींत सर्वच विलक्षण

नुसत्या दान–प्रतिग्रहामुळें लाखों रुपयांची स्थावर–जंगम इस्टेट एकाकडून दुसऱ्याच्या ताब्यांत कायदेशीर रीतीनें जाते हें आश्चर्य नव्हे काय ?

दुसरी सुधारणा दत्तकाच्या कायद्यांत अशी हवी कीं, दत्तक घेणारी आई-देणारा मनुष्य व दत्तक मुलगा हीं तिघेंहि कमीत कमी अठरा वर्षे वयाचीं म्हणजे कायद्यानें सज्ञान असावींत. विधवेच्या हिताच्या दृष्टीनें हें अवश्य आहे. दत्तक घेण्याच्या प्रश्नाला कोणी 'हक्क' म्हणो. पण आपल्या ताब्यांत असलेली इस्टेट आपल्या हातानें घालविणें इतकाच या हक्काचा लौकिक अर्थ आहे, तेव्हां मागाहून पश्चाताप करण्यापेक्षां सज्ञानपणानें गोष्टी केलेल्या चांगल्या.

मुलगाहि कायद्यानें वयांत आलेला हवा. एरवीं कुळांतला मुलगा दत्तक म्हणून दुसऱ्यास बहाल करणें हा एक प्रकारचा क्रय–विक्रय किंवा गुलामगिरिच नव्हे काय ? अलीकडील दोन हजार वर्षांत रूढीनें त्याला धार्मिक स्वरूप दिलें असलें तरी त्याचें मूळ स्वरूप क्रय–विक्रयासारखेंच होतें असा इतिहास आहे तो विसरून कसा चालेल ? दत्तविधान नाशाबीत ठरलें तर 'इदं च नास्ति परं च न लभ्यते' म्हणजे धड या कुळांत राहतां येत नाहीं व जन्मकुळांतहि परत जाता येत नाहीं अशी त्रिशंकूसारखी दत्तकाची स्थिति होते ! याला मागाहून कोणी जबाबदार रहावयाचें ? कदाचित् असें होण्याचा संभव आहे कीं, दत्तक आई व दत्तक मुलगा सारख्याच वयाचीं होतील. पण त्यानें कांहीं फारसें बिघडावयास नको. वृद्धपणीं एखाद्यानें अल्पवयी तरुण बायको केली तर, सासू लहान व सून मोठी असें व्यवहारांत घडतेंच की नाहीं ? त्यापेक्षां अशा दत्तकाची गोष्ट कांहीं वाईट नाहीं. दत्तक घेणें हीच मुळी सृष्टिक्रमाविरुद्ध गोष्ट होय. पण ती करावयाचीच तर पुढें व्यवहार सलोख्यानें व प्रेमानें चालतील अशी खबरदारी घेऊनच केली पाहिजे हें इष्ट नाहीं काय ?

दान व प्रतिग्रह याप्रमाणेंच दत्तहोम करावा कीं नाहीं याबद्दल कायदा अनिश्चित स्थितींत आहे. टिळक विरुद्ध श्रीनिवास या खटल्यांत दत्तक बाप व दत्तक मुलगा हे एकाच गोत्राचे असतील तर दत्तहोमाची आवश्यकता नाहीं असें ठरलें आहे. दान व प्रतिग्रहानंतर तो वाटेल तेव्हां करावा इतकेंच नव्हे तर, तो अजीबात न केला तरी चालतें ! पण दत्तविधान हा क्रयविक्रय नसून त्याला धार्मिक स्वरूप असेल तर दत्तहोम करणें हें बंधनकारक मानावयास पाहिजे. लग्नामध्यें अग्निसाक्षिक

सप्तपदी होणें हीं जशी कायद्यानें आवश्यक गोष्ट मानली आहे, त्याचप्रमाणें दत्त-
होम करणें म्हणजे अग्नीला साक्षीदार करणें होय. दत्तविधानाच्या बाबतींत
दत्तहोम ही एकच धार्मिक अशी बाब आहे व ती आवश्यक मानावयाची नाहीं तर
दत्तक घेण्याचे बाबतींत विनाकारण धर्माचें नांव सांगण्यांत काय अर्थ ?

दत्तक आई व दत्तक मुलगा यांच्या दत्तविधानाच्या नंतरच्या हक्कांतहि
फरक व्हावयास पाहिजे. आज कायद्याप्रमाणें एकदां दत्तविधान झालें कीं, दत्तक
हा सर्व मिळकतीचा मालक होऊन बसतो व केवळ अन्नवस्त्राखेरीज कोणताहि
हक्क विधवेला राहात नाहीं. दत्तक मुलाच्या बापाशीं विधवेनें केलेले सर्व करार
कायद्यानें रद्द ठरतात (प्रिव्ही कौन्सिल १९२७ कृष्णमूर्ति वि. कृष्ण मूर्ति) व
स्वतःच्या अन्नवस्त्राची फिर्याद गुदरण्याकरितां तिला अखेर नादारींत फिर्याद दाखल
करावी लागते ! याकरितां इस्टेटीचा एक–चतुर्थांश विधवेला हक्कानें मिळाला
पाहिजे अशी सुधारणा होणें जरूर आहे. मात्र ती मिळकत फक्त तहाहयात सम-
जावी, तिच्या अखंड मालकीची समजण्यांत येऊ नये. तिच्या मरणानंतर ती
तिच्या मुलीला अगर मुलीच्या मुलाला मिळून त्यांच्या अभावीं ती दत्तक मुलाला
मिळावी.

मद्रासखेरीज मुलगी दत्तक घ्यावी असा कोठेंहि कायदा नाहीं. अनैतिक
कारणाकरितां दत्तविधान नसलें म्हणजे मुलगी दत्तक घेण्याला कायद्याचा प्रतिबंध
आहे (११ मद्रास ३९३) दत्तक घेण्याचे हेतू दोन. पिंडदान व वंशवर्धन. पिंडदान
हा धार्मिक विधि असून तो मुलानेंच दिला पाहिजे असें शास्त्रांत नाहीं. गोत्रांतील
कोणाहि सपिंड पुरुषानें तो दिला तरी चालतो. वंशवृद्धि ही ऐहिक गोष्ट असल्या-
कारणानें केवळ ऐच्छिक मानण्यास हरकत नाहीं. पण आजच्या स्त्रीशिक्षणाच्या
काळांत एखाद्या सुशिक्षित व सद्‌गुणी मुलीलो कोणी दत्तक घेण्याचें मनांत आणलें
तर कायद्यानें तसें करतां येत नाहीं. प्राचीन काळीं ही पद्धती नव्हती असें नाहीं.
खुद्द पांडवांची आई कुंती ही कुंतिभोज राजाला दत्तक दिली होती, असें महाभा-
रतांत म्हटलें असून, टिळकांनीं गीतारहस्यांत (पृ. ६०३) या गोष्टीचा उल्लेख
केला आहे. लग्न झाल्यामुळें मूलगी दुसऱ्या कुळांत जाऊन मूळ दत्तककुळांत जागे-
वर कांहीं राहत नाहीं, म्हणून मुलींच्या दत्तकाचीं उदाहरणें थोडीं होत असावीं.
परंतु मुलींचें दत्तविधान झालें असतां. मुलगी दुसऱ्या घरांत गेली तरी, आईची

सर्व इस्टेट मुलीला ' स्त्रीधन ' म्हणून मिळते हा मोठा फायदा होय. वंशसंकीर्तनाचा हेतु कोणाचे मनांत प्रामुख्यानें नसल्यास व पिंडदान हें दुसऱ्या आप्ताकडून करून मुलीला दत्तक घेतां यावें, ह्मणूनच ही सुधारणा सुचविली आहे.

जवळच्याला लाथ, परक्याला हात !

दौहित्र भागिनेय व मातुःस्वसापुत्र म्यणजे मावशीचा मुलगा यांचें दत्त-विधान प्रिव्ही कौन्सिलानें अशास्त्र ठरविलें आहे. पण त्याच बाबतींत प्रथम सुधारणा होऊन कायदा बदलला पाहिजे, इतकी ही गोष्ट महत्त्वाची आहे. वास्तविक पाहातां हे तीनहि नातलग अतिशय जवळचे व प्रेमाच्या जिव्हाळ्याचे आहेत. व त्यांना दत्तक घेतां आलें तर दत्तक घेणारांची मोठी सोय होईल. पण प्रिव्हीकौन्सिलानें यां नातेवाइकांना दत्तक होण्याला अपात्र ठरविलें आहे ! व त्याला आधार काय ? तर नंदपंडित या एका आधुनिक बंगाली शास्त्रकाराचें मत. पण प्रिव्हीकौन्सिलाच्या निकालाला मूळशास्त्राचा आधार नाहीं. असेंब्लीमध्यें एक बिल आणून हा कायदाच बदलून घ्यावा अशी खटपट सध्यां चालू असल्यानें या वादाची रूपरेषा येथें थोडक्यांत सांगावयाचें योजिलें आहे.

दत्तकचंद्रिकेबद्दल प्रवाद

भागिनेयादि पुत्र दत्तक घेऊं नयेत, या म्हणण्याला दत्तकमीमांसेचा आधार सांगण्यांत येतो. पण दत्तकमीमांसा व दत्तकचंद्रिका हे ग्रंथ विशेषतः बंगालमध्यें प्रमाणभूत मानले जातात. मुंबई–गुजराथेकडे मिताक्षरा व मयूख हे ग्रंथ प्रमाण आहेत, पण भागिनेयादि पुत्रांना दत्तक घेऊं नये असें त्यांत सांगितलें नाहीं. तसेंच दत्तकचंद्रिका व दत्तकमीमांसा हे मूळ स्मृतिग्रंथ नव्हेत, त्या टीका आहेत. अर्थात् स्मृतिवचनांना बाजूला सारून टीका व उपटीका या प्रिव्हीकौन्सिलानें मान्य कराव्या व हिंदु कायद्यामध्यें वाटेल तो गोंधळ घालावा, हें आश्चर्य होय ! दत्तकचंद्रिकेबद्दल तर असा प्रवाद आहे कीं देवण्णाभट्टांनीं मुळीं हा ग्रंथ लिहि-लाच नाहीं ! फार पूर्वी बंगालमध्यें एका राजघराण्यांत दत्तकासंबंधीं खटला उप-स्थित झाला होता व पुराव्यादाखल म्हणून, ' रघुमणि ' या नांवाच्या पंडितानें इकडले तिकडले उतारे घेऊन हें चोपडें तयार केलें व त्याला देवण्णाभट्टांची ' दत्तकचंद्रिका ' असें नांव देऊन या पुराव्याचा त्या खटल्यांत बेलाशक उपयोग केला. ही गोष्ट खरी असल्याबद्दल पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं लिहून ठेविलें

आहे. व खटला जिंकला गेल्यामुळें प्रक्षेपकाचे वंशजांनाहि ही गोष्ट चोरून ठेवण्याचें कारण राहिलें नाहीं. नंदपंडित हाहि अगदीं आधुनिक टीकाकार होय. इतका कीं, १८२७ च्या पूर्वीं त्याचें व त्याच्या ग्रंथाचें नांवहि इकडे कोणाला ऐकून माहीत नव्हतें असें कै. मंडलिकांनीं आपल्या पुस्तकांत स्वच्छ लिहिलें आहे! दैववशात् हे दोन–तीन ग्रंथ इंग्रज पंडितांच्या हातीं पडून त्यांनीं त्यांचीं भाषांतरें केलीं. यामुळें त्यांना अवास्तव महत्त्व येऊन, खोटा कायदा मात्र लोकांच्या डोक्यावर बसला.

स्मृतींच्या अर्थाचा अनर्थ !

मूळ धर्मशास्त्राची बाजू पाहिली तर, दौहित्र भागिनेय इत्यादि पुत्र स्मृतिग्रंथांनीं दत्तक होण्याला अपात्र मानले नाहींत. शौनकाचें असें एक वचन आहे कीं,

क्षत्रियाणाम् स्वजातौ वा गुरुगोत्रसमोऽपि वा ।
वैश्यानां वैश्यजातेषु शूद्राणां शूद्रजातिषु ॥
सर्वेषां चैव वर्णानां ज्ञातिष्वेव च नान्यतः ।
दौहित्रो भागिनेयश्च शूद्रस्यापि च दीयते ॥ १ ॥

या श्लोकाच्या शेवटच्या चरणांत शूद्रांनीं दौहित्र भागिनेयादि दत्तक घ्यावे, असें जें सांगितलें त्याचा खरा अर्थ काय, याबद्दल मयूख निर्णयसिंधु इत्यादि ग्रंथांत फार सुंदर चर्चा केली आहे. त्या सर्वांचा निष्कर्ष असा कीं, दौहित्र व भागिनेय हे शब्द कोणत्याहि वर्णाला परिसंख्येच्या अर्थानें सांगितले आहेत. कारण, शूद्रांनीं दौहित्र व भागिनेय याखेरीज दत्तक घ्यावयाचा नाहीं असें म्हणावयाचें तर " शूद्राणां शूद्रजातिषु " असें सर्वसाधारण व व्यापक शब्दांनीं सांगितलें आहे त्याचा अर्थ काय? हेंच अधिक जवळचे नातलग असल्यानें शक्य तर त्यांनाच दत्तक घेणें जास्त युक्त होय. हे नसल्यास सजातीपैकीं कोणताही घ्यावा असा अर्थ आहे. म्हणजे दौहित्रादि पुत्रच दत्तक घ्यावा असा शूद्राचे बाबतींत विधि अगर नियम नाहीं. ब्राह्मणादि इतर वर्णांनीं तो न घ्यावा असाहि विधि अगर नियम नाहीं. मिळून काय, दौहित्र भागिनेय हे दत्तक घेऊंच नयेत असें कोणत्याहि वर्णाला बंधन नाहीं. मयूखकारानें आपला निर्णय हाच दिला असून निर्णयसिंधूमध्यें " ब्राह्मणादिभिरपि दौहित्रभागिनेयौ पुत्रत्वेन ग्राह्यौ इति सिद्धं " असें कृष्णभट्टानें स्पष्ट लिहिलें आहे. दौहित्र भागिनेय हे शूद्रांच्या बाबतींत प्रामु

ख्यानें व इतर वर्णांच्या बाबतींत सर्वसाधारणरीत्या इच्छेप्रमाणें दत्तक घ्यावे असा स्मृतींचा मूळ हेतु असतां, वरील नातेवाईक हे मुळींच दत्तक घेऊं नयेत असा शास्त्रार्थ प्रिव्हीकौन्सिलनें काढला आहे! यापेक्षां हास्यास्पद विपर्यास दुसरा कोणता असेल!

नंदपंडिताचें भाष्य!

भागिनेय दौहित्र यांचे दत्तकासंबंधीं शौनकाच्या वचनाचा अर्थ निषेधार्थी घेतल्यामुळें अर्थाचा कसा अनर्थ झाला हें वर सांगितलें. पण प्रिव्हीकौन्सिलच्या निकालाला नंदपंडिताची दुसरी एक उपपत्तीहि कारण झाली असल्यानें त्याबद्दलहि थोडें सांगितलें पाहिजे. मुलगा दत्तक घ्यावयाचा तो 'पुत्रच्छायावह' असला पाहिजे इतकेंच शौनकाचें वचन आहे. यावर नंदपंडिताचें भाष्य असें कीं 'पुत्रच्छायावह' म्हणजे मुलाप्रमाणें शोभणारा, परंतु वाटेल तो मुलगा नव्हे. तर दत्तक पित्याचा व मुलाच्या जन्मदात्या आईचा सशास्त्र लग्नसंबंध होणें संभवनीय झालें असतें कीं नाहीं हेंहि पाहिलें पाहिजे. जिच्याशीं कौमार्यावस्थेंत दत्तकपित्याला सशास्त्र विवाह करतां आला असता अशाच स्त्रीचा मुलगा दत्तक घेतां येईल, दुसरा घेतां येणार नाहीं. आपल्या भावाचा मुलगा आपणास दत्तक घेतां येतो. कां? तर भावानें ज्या स्त्रीशीं लग्न केलें तिचें कौमार्यावस्थेंत दुसऱ्या भावाशींहि सशास्त्र लग्न होणें शक्य होतें म्हणून. आणि मुलीचा मुलगा, बहिणीचा मुलगा, अगर मावशीचा मुलगा यांना दत्तक कां घेतां येत नाहीं? तर दत्तकपित्याला आपली स्वतःची बहीण, मुलगी अगर मावशी यांच्याशीं शास्त्राप्रमाणें लग्न करतां येत नाहीं म्हणून.

उलट युक्तिवादाचा कोलदांडा

नंदपंडिताचें हें कारण सकृद्दर्शनीं बरोबर वाटतें, पण दत्तकाच्या कल्पनेची मूळ उपपत्ति वेगळीच असल्याकारणानें सशास्त्र लग्नसंबंधाच्या नियमाचें कारण नंदपंडितानें सांगितलें आहे तें सर्वस्वी बंधनकारक मानतां येत नाहीं. एखादी प्रचलित गोष्ट युक्तिसिद्ध आहे, असें दाखविण्याकरितां अनेक कारणें सांगतां येतात. व त्यांतील प्रत्येकांत थोडाबहुत अर्थही असतो. पण कोठलेंही एकच कारण व्यवच्छेदक (exclusive) मानलें म्हणजे मूळ हेतुनियमांचा विनाकारण विपर्यास होतो. नंदपंडितानें एक शास्त्रार्थ सांगितला, पण तसाच दुसरा शास्त्रार्थहि तितक्याच युक्तिसिद्ध रीतीनें मांडून दाखवितां येईल. प्राचीन काळीं

नियोगाची पद्धति रूढ होती. तेव्हां भावजयीशीं नियोग करून दिरानें पुत्र उत्पन्न करावा अशी शास्त्राची आज्ञा होती. पण पुढें लोकांसच हा प्रकार नीतिहीन वाटूं लागून ही चाल बंद पडली. व नियोगानें पुत्र उत्पन्न करण्यापेक्षां भावाच्याच मुलाला दत्तक घ्यावें असें रूढीनें ठरविलें. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें असतां ही उपपत्ति अगदीं खरी अहे. अशा स्थितींत मुलीच्या मुलाप्रमाणें भावाचा मुलगाहि दत्तकशास्त्रांत निषिद्ध ठरावयास पाहिजे. कारण नंदपंडिताचे म्हणण्याप्रमाणें आपणाला विवाह करतां येत नाहीं, व भावाचा मुलगा दत्तक घ्यावा म्हणावें तर आज नियोग निषिद्ध ठरला आहे! पण एक गोष्ट आपण करतों व दुसरी करीत नाहीं यास खरें उत्तर, दोनहि गोष्टी झटल्या तर सारख्याच निंद्य असून एक आपण तशी मानतों व दुसरी मानीत नाहीं, याखेरीज काय देतां येणार ?

एक खुणेचा शब्द

पण वाचकांनीं खुणेचा एकच शब्द लक्षांत ठेवला तर हें वादाचें कोडें उलगडण्यास हरकत नाहीं. नंदपंडितानें शक्यार्थी लग्नसंबंधाची कल्पना मांडली आहे. व नियोगाची उपपत्ति याच्या विरोधी आहे. पण, प्रत्यक्ष लग्न अगर नियोग कोठेंच व्हावयाचा नसतो, ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. भावाचा मुलगा दत्तक घेतात, त्या वेळीं भावाच्या बायकोशीं कोणी प्रत्यक्ष नियोग अगर लग्न करीत नाहीं. मुलीचा मुलगा अगर बहिणीचा मुलगा यांच्या आयांचे बाबतींतहि तीच गोष्ट आहे. मग 'अमक्याशीं लग्न झालें असतें तर' अशी शक्यार्थी दीर्घ शंका कां काढावयाची? आणि या जवळच्या व प्रेमाच्या नातेवाइकांना कां दूर लोटावयाचें?

दौहित्र दत्तकापेक्षां श्रेष्ठ

एकट्या दौहित्राची गोष्ट पाहिली तर त्याला दत्तक घेण्याला याहूनहि प्रबळ कारण आहे. दौहित्र हा श्राद्धामध्यें अतिशय पवित्र मानला असून, वारसाच्या आजच्या यादीमध्यें त्याचें नांव सहावें आहे. इतका तो जवळचा आहे. दौहित्रालाच 'पुत्रिकापुत्र' असें स्मृतिमध्यें दुसरें एक नांव आहे. दोहोंत फरक इतकाच की पुत्रादि इतर वारस असतां दौहित्र दायभाग घेत नाहीं. पण औरस पुत्र नसतांना मुलीचा मुलगा हा मुलाप्रमाणेंच होय, असें मनु, याज्ञवल्क्य व कौटिलीय यांनीं एकमतानें म्हटलें आहे. "पुत्रिका हाच पुत्र. कन्येमध्यें पित्याचा अंश थोडा व मातेचा अधिक इतकेंच. पण ती औरसतुल्यच होय" असें विज्ञानेश्वरानें आपल्या

टर्कित सांगितलें आहे. स्मृतीमध्यें सांगितलेल्या एकंदर १५ पुत्रांच्या यादींत पुत्रिकापुत्राचें नांव वारसाच्या दृष्टीनें औरसाच्या खालोखाल दुसरेंच सांगितलें आहे. व दत्तकाचें नांव सातवें असून हे पुत्र ' यथाक्रम ' दायभाग घेण्यास पात्र होतात असें म्हटलें आहे. अर्थात् दत्तकाचे मानानें पुत्रिकापुत्र हा इतका श्रेष्ठ असतां दत्तक होण्यालाही तो पात्र समजला जाऊं नये हा कोठला न्याय ? औरस होण्याची ज्याची योग्यता तो म्हणे दत्तक होण्याला नालायक ! हा खासा शास्त्रार्थ म्हटला पाहिजे. पण या मुद्द्याची याहूनही खोल चर्चा करतां येण्यासारखी असल्यामुळें फक्त मुख्य मुद्दा लक्षांत घेऊन ही गोष्ट येथें आपण सोडून देऊं.

दत्तकाचा धर्माशीं संबंध नाहीं.

सरतेशेवटीं एकच सुधारणा सांगून हें दत्तक प्रकरण पुरें करूं. व ती गोष्ट म्हणजे अजीबात दत्तकच न घेण्याची होय. ज्यांना दत्तक घेणें हा आपला ' हक्क होय असें वाटत असेल त्यांना हें म्हणणें म्हणजे ' मूले कुठारः ' असेंच वाटेल हें खरें. दत्तक घ्यावयाचाच तर आज ज्यांना घेत नाहींत तेहि घेण्याला कां योग्य हें वर सांगितलें. पण दत्तक न घेणें हीच खरी सुधारणा होय. आपत्तीखेरीज मुलगा दान देऊं नये व घेऊं नये, असें स्मृतीमध्यें स्पष्ट सांगितलें आहे. अर्थात आपत्ति म्हणजे, ' राष्ट्रीय आपत्ति ' होय. भारतीय युद्धासारख्या एकाद्या युद्धांत पुरुषसंख्येचा संहार होऊन हाहाःकार होतो, म्हणूनच दत्तकाची कल्पना पुढें येते व ती त्या वेळेपुरती योग्यहि असते. पण दत्तकाची संस्था समाजांत सदैव असणें ही गोष्ट अनिष्ट होय.

धर्माचें नांव विनाकारण या प्रश्नांत घुसडण्यांत येतें. पण दत्तकाचा हेतु पारलौकिकापेक्षां ऐहिकच जास्त आहे हें धर्मशास्त्रावरून सिद्ध करून देतां येईल. भावाला जरी मुलगा झाला,तरी त्यानें सर्व कुल पुत्रसंपन्न होतें.असें मनुस्मृतींत म्हटलें आहे. भावाला मुलगा असतां दत्तक घेऊं नये, असाच त्याचा अर्थ होत नाहीं काय ? पिंडदान हें स्वतःच्या मुलानें केलें पाहिजे असेंहि नाहीं. कोणाहि ज्ञातिबांधवानें तें केलें तरी चालतें, इतकेंच नव्हे तर परक्या ब्राह्मणाकडूनहि तें होऊं शकतें असें स्मृतीमध्यें सांगितलें आहे. स्वतःला मुलगा नसला तर मुलीला अगर मुलीच्या मुलालाच वारसा जाणार. दत्तक न घेतला तरीहि आपण त्याला

मुलाप्रमाणेंच मानतो. व तोहि पिंडदान करतो. मग त्याला दत्तक म्हणून स्वतःच्या मांडीवरच बसविण्यांत काय विशेष आहे?

पण या गोष्टीचा उमज स्त्रियांना दिवसेंदिवस शिक्षणाच्या संस्कारानें अधिक पडावयास हवा. त्यांच्या मनोवृत्तींतच कालांतरानें व शिक्षणाच्या संस्कारानें पालट होईल, अशी आशा असल्यामुळें दत्तक घेणेंच बेकायदेशीर आहे असें बिल कोणी कौन्सिलांत आणीत नाहीं हें वेगळें. पण नवऱ्याची परवानगी असतां विधवेच्या मनांतच जर दत्तक घेण्याचें नसेल, तर तशी तिच्यावर कोणालाहि सक्ति करतां येत नाहीं असें कायद्यानें ठरलें आहे, हेंहि त्यांनीं विसरून उपयोगी नाहीं. परमेश्वरेच्छेनें अगर दैवयोगानें जी गोष्ट लाभली नाहीं, तिचा व्यर्थ हव्यास धरण्यांत अर्थ कोणता! व कृत्रिम उपायांनीं केलेला 'मायेचा पूत' आईचें नातें तरी काय ओळखणार? म्हणून दैवाची चूक दुरुस्त न करण्यांतच खरा सुबुद्धपणा व शहाणपणा आहे.

एक वैदिक कथा

ऋग्वेदांत अशी एक कथा आली आहे कीं, विश्वामित्रानें आकसानें वसिष्ठाचा जिवंत मुलगा अग्नींत टाकला, व त्यास जाळून ठार मारलें. पण या मंडलाचा कर्ता वसिष्ठच असतां त्यानें दत्तक घ्यावा असें कोठें सांगितलें नाहीं! उलट असें सांगितलें आहे कीं, "हे अग्निनारायणा, दुसऱ्याचा मुलगा आपला होत नाहीं. म्हणून खुळ्या लोकांचे मार्ग आह्माला जाणण्याचा प्रसंग येऊं नये. दुसऱ्याकडे ओढा असलेला परक्याचा मुलगा आवडत असतांहि प्रत्यक्ष मुलगा म्हणून मनानेंहि मानवत नाहीं. कसेंहि झालें तरी दुसऱ्याचा मुलगा मूळ स्थानाकडेच जाणार. म्हणून पराक्रमी आणि कर्तृत्ववान असा नव्या जोमाचा पुत्र आम्हास होऊं दे." स्त्रियांची गोष्ट एक वेळ असो. त्या साहजिक भावनावश असल्यानें त्यांची इतर उपायांनीं खात्री पटवितां येणें शक्य आहे. पण ज्या शास्त्रीपंडितांना स्मृतीपेक्षां श्रुतीचें प्रामाण्य अधिक मानावयाचें असेल त्यांना तरी वरील उद्गारांचें तात्पर्य वेगळें सांगण्याचें कारण नाहीं!

विद्याधनाच्या कायद्याची सुधारणा.

" जिंकील त्याची सत्ता आणि मिळवील त्याची मत्ता" अशी मुळीं म्हणच आहे. स्वकष्टार्जित मिळकतीवर ज्याची त्याची स्वतंत्र मालकी असावी हें रास्त आहे. किंबहुना या विश्वासावरच जग चाललें आहे.

पण हिंदुधर्मशास्त्रांत विद्येनें प्राप्त झालेलें धन विद्या मिळविणाराच्या स्वतंत्र मालकीचें होत नाहीं. तें समाईक व अविभक्त कुटुंबाचें होय असें कायद्यानें हल्लीं ठरलें आहे !

यामुळें कज्जेदलाली व असंतोष तर वाढतोच, पण विद्याधन मिळविणाराच्या **स्त्री-वारसांना** निष्कारण हाल व जाच सोसावा लागतो. कष्टानें विद्याधन मिळविणारा पुरुष मृत झाल्यावर त्याचें सर्व धन दायाद पुरुषबांधव घेतात. व मुली अनाथ होऊन केवळ अन्नवस्त्राच्या धनी होतात !

ही आपत्ति दूर व्हावी म्हणून बॅ. जयकर यांनीं असेंब्लींत एक बिल आणलें आहे. त्याचा सारांश असा कीं, " विद्याधन हें पितृद्रव्याच्या किंवा एकत्र कुटुंबाच्या मदतीनें मिळविलेलें असो किंवा नसो, तसेंच मिळविलेलें शिक्षण सामान्य प्रतीचें असो किंवा उच्च शिक्षण असो; विद्याधन हें मिळविणाराच्या स्वतंत्र **मालकीचें** समजण्यांत यावें.

हिंदु कायद्याचा जाच कसा होतो तें एकदोन उदाहरणांवरून स्पष्ट समजेल. समजा, तुह्मी दोघे भाऊ एकत्र कुटुंबांत राहतां व समाईक आहां. तुह्मी विद्या संपादन केली व वकील बॅरिस्टर झाला. तुमचा भाऊ उनाडपणाखेरीज कांहीं करीत नाहीं. आतां भावानें तुम्हाला छळावयाचें म्हटलें तर त्यानें ताबडतोब वांटणीची फिर्याद करावी ! विद्याधन हें तुमचें स्वकष्टार्जित असलें तरी तें कोर्टांत 'समाईक' कुटुंबाचेंच ठरणार, व उनाड भावाला बापाच्या मिळकतीची वांटणीच काय, पण तुमच्या विद्याधनांतला हिस्साहि हक्कानें मिळणार ! कारण आज कायदाच तसा आहे.

तुमच्या भावानें व्यापारधंदा करून इस्टेट केलेली असली तरी तुम्हांला मात्र उलट त्याच्या मिळकतींत वांटा मिळणार नाहीं. कारण तुमची मिळकत ही मात्र "विद्याधन" आहे, त्याची नाहीं. तुह्मी विद्या शिकलां पाप केलेंत. उनाड-

पणा केला असता तर बरें नसतें झालें! असेंहि तुह्मास पश्चात्तापानें वाटेल. पण त्याला इलाज काय?

पण तुमचा भाऊ जगाच्या स्वार्थी व कावेबाज व्यवहारांत हुषार असला तर तो असें करील. जिवंतपणी तुमच्याशीं समाईक व एकत्रच राहील. तुम्हालाहि वाटेल ' सुखासमाधानाचें अविभक्त कुटुंब कशाला मोडा व भांडणें करून वेगळे कां व्हा? ' पण तुह्मी मेल्यावर तुमचें सर्वच विद्याधन " शेषाधिकारी " म्हणून भावाकडे जमा होईल, व तुमच्या स्त्री–वारसांना फक्त पोटगी व अन्नवस्त्राशिवाय कांहींहि मिळणार नाहीं! संसारव्यवस्थेंत धनाचे वारस शेषाधिकारी ह्मणून पुरुष बांधवच असणें याचेंच नांव " **हिंदु-एकत्र-कुटुंबपद्धति** "!

वकीलहि उनाड भावाला सांगेल, " शहाणा असशील तर भावाच्या हयातींत विद्याधनाच्या वांटणीबद्दल भांडूं नको. कारण विद्याधनाची वांटणी झाली तरी स्वतः विद्याधन मिळविणाराला यथान्याय कांहीं तरी जाणारच. घेऊन घ्यावयाचें, मग अर्धेंच कां? सर्वच घे. भाऊ मरेपर्यंत वाट पहा. चांगुलपणाचें यश तुझ्या पदरांत पडेल; भावाच्या विधवा, मुली वगैरे केवळ अन्नवस्त्राच्या धनी होतील; व ' शेषाधिकारी ' म्हणून सर्वच संपत्ति तुला मिळेल! " पुराव्याचा बोजाहि अनाथ स्त्री वारसांवरच कायद्यानें पडणार, कारण हिंदुधर्मशास्त्राचें प्रमेयच (Presumption of Law) असें आहे कीं ' हिंदु कुटुंब नेहमीं एकत्र अविभक्त व समाईक असणें हा नियम व असें नसणें हा अपवाद ' अर्थात् सामान्य नियमाविरुद्ध अपवाददर्शक परिस्थिति ज्याला प्रतिपादन करावयाची असेल त्यानेंच पुराव्यानें शाबीत करावी।

पण हा सर्व अनर्थ व घोटाळा शब्द प्रामाण्यानें केला! व तो करणारांत संस्कृत धर्मशास्त्रकार, निबंधकारहि होते, तसेंच संस्कृत ग्रंथाच्या भाषांतराच्या सहाय्यानें हिंदुधर्मशास्त्रांचा न्याय देणारे, म्हणजे उंटावरून शेळ्या हांकणारे, युरोपियन न्यायाधिशहि होते! बिचारे मनु व याज्ञवल्क्य पोथ्या–पुस्तकांत राहिले! त्यांचा मूळ हेतु कोणालाच कळेना. धर्मशास्त्र कळेना तर राहो. Equity justice and good conscience या ब्रीदत्रयीला तरी या न्यायाधीशांनीं जागावयाचें होतें; ' अदमास पंचे ' आवास्तव टीका लिहिणाऱ्या देशी पंडितांकडे व निबंधकाराकडे त्यांनीं बुद्धि गहाण टाकली. त्यांच्या हाताला

नुसता हात लावला व ' मम ' म्हणून न्यायपीठावरून निर्णय दिला! ज्यानें कष्ट करावे व धन मिळवावें त्याच्याच मालकीची ती संपत्ति व्हावी हें कांहीं येवढें अगाध ज्ञान नाहीं. सामान्य तारतम्य आहे. मूळ स्मृतीमध्यें तें सांगितलें नसेल हेंहि शक्य नाहीं. पण पाहतो कोण? शब्दप्रामाण्य अगदीं वेदांपासून अलीकडील संस्कृत टीकाकारापर्यंतहि येऊन बसलें म्हणजे मूळ हिंदुधर्मशास्त्र असेंच लोपून जावयाचें!

या विषयासंबंधानें याज्ञवल्क्यस्मृतींतले मूळ दोन श्लोक आहेत. ते असें--

पितृद्रव्याविरोधेन यदन्यत्स्वयमार्जितम् ।
मैत्रमौद्वाहिकं चैव दायादानां न तद्भवेत्–११८
क्रमादभ्यागतं द्रव्यं हृतमभ्युद्धरत्तु यः
दायादेभ्यो न तद्दद्याद्विद्यया लब्धमेव च–११९

ह्याचा सरळ अर्थ असा कीं, " पितृद्रव्याच्या मदतीवांचून जें कांहीं स्वकष्टार्जित असेल तें धन, मित्राकडून मिळालेलें धन, विवाहांत बक्षीस मिळालेलें धन हीं दायाद बांधवांची (समाईक मिळकत होत नाहीं-) ११८."

तसेंच " परंपरेनें वारस ह्मणून मिळालेलें धन, कांहीं कारणानें नष्ट झालेलें पण पुनः एखाद्यानें स्वतः प्रयत्न करून मिळविलें असेल तें धन, तसेंच विद्येचे योगानें मिळविलेली संपत्ति हीं इतर दायादांना देण्याचें कारण नाहीं–११९."

वरील श्लोकांचा सरळ अर्थ काय होतो हें वाचकांनीं पाहावें वरील दोन श्लोक हीं पृथक् व स्वतःसंपूर्ण वाक्यें आहेत. " विद्यया लब्धमेव च " या पदाशीं " पितृद्रव्याविरोधेन " या पदाचा संबंध मिताक्षरेमध्यें जोडण्यांत आला आहे, पण तो कितपत योग्य आहे हें सामान्यपणें व्याकरण जाणणारांसहि कळेल, त्याला मीमांसक नकोत! " विद्यया लब्धमेव च दायादेभ्यो न तद्द्यात्" असें स्पष्ट व निःसंदिग्ध विधान आहे. ' विद्यया लब्धं ' धनाची व्याप्ति आणखी मर्यादित करावयाची असती तर वरच्या श्लोकांतील पितृद्रव्याविरोधेन किंवा त्या अर्थाचे दुसरे शब्द याच श्लोकांत पुनः आले नसते काय?

" यदन्यत्स्वयमार्जितम् " इतक्यापुरताच ' पितृद्रव्याविरोधन ' याचा संबंध आहे. ह्मणजे उदाहरणार्थ, पितृधनाच्या भांडवलावर मुलानें व्याजबट्टा करून (त्यांत व्यापार येत नाहीं!) सावकारी सुरू केली तर ती त्याची स्वतंत्र मिळकत

नव्हे. कारण या धंद्याला मुख्यतः पितृधनच कारणीभूत झालें, म्हणून ती समाईक मिळकत होते हें सरळ आहे. पण ११८ व ११९ हे दोन श्लोक आपापल्या पुरतीं संपूर्ण वाक्यें असतांना वरच्या श्लोकांतील एक पद उचलून दुसऱ्या वाक्यांतल्या पदांच्या मागें मर्यादा म्हणून जोडून द्यावें, हा शुद्ध वडाची साल पिंपळास चिकटविण्याचा प्रकार होय! दुसरें असें कीं, विद्यालब्ध धनाला 'पितृद्रव्याविरोधेन' असें विशेषण लावावयाचें तर मैत्रं, औद्वाहिकं, क्रमात्, अभ्यागतं व हृतं या सर्वांनाहि तें लागलें पाहिजे. पण यांना तें न लागतां 'विद्याधन' याला मात्र लावावयाचें हा नुसता दूरान्वयच नव्हे तर अर्थाचा अनर्थ होय!

यालाच आणखी प्रत्यंतर प्रमाण पुढच्याच १२३ व्या श्लोकांत सांपडतें, "पितृभ्यां यस्य यद्दत्तं तत्तस्यैव धनं भवेत्" म्हणजे "आईबापांनीं ज्याला ज्याला जें जें कांहीं दिलें असेल तें तें त्याच्या एकट्याच्या मालकीचें होतें." बापानें इतरांना अनेक वस्तू दिल्या, व विद्या शिकणारा होता त्याच्या विद्येवरच मुख्यतः पैसे खर्च केले, तर या श्लोकाप्रमाणें ती विद्या त्याची होते, पण त्या विद्येच्या योगानें तो जें धन मिळवील तें धन मात्र त्याचें होत नाहीं, असें कसें म्हणतां येईल? 'स्वयमर्जितं' असें धन कोणतें? तर जें 'पितृद्रव्याविरोधेन' मिळविलें असेल तें ही व्याख्या सामान्यतः खरी व बरोबर आहे. पण विद्याधन हें त्याला मुद्दाम स्पष्टपणें अपवाद करावें असाच स्मृतिकारांचा हेतू आहे. कारण मनुस्मृति याज्ञवल्क्यापूर्वीची असून त्यांतही असें स्पष्टपणानें सांगितलें आहे कीं, 'विद्याधनंतु यद्यस्य तत्तस्यैव धनं भवेत्। मैत्र्यमौद्वाहिकं चैव माधुपर्किक मेवच या श्लोकांत विद्याधन हें ज्याचें त्याचें स्वतंत्र मालकीचें हें स्पष्टपणें सांगितलें आहे पण मैत्र्यं, औद्वाहिकं यांचाहि याज्ञवल्क्याप्रमाणें उल्लेख आहे. 'पितृद्रव्याविरोधन, या विशेषणाचा संबंध 'विद्यालब्ध' धनाशीं नाहीं असें या उदाहरणानें तर स्पष्टच शाबीत होतें.

पण या मुद्द्याची आणखी चर्चा करण्याचें कारण नाहीं. बिचाऱ्या मनु याज्ञवल्क्यांच्या वेळेला उद्योगधंद्याची इतकीशी वाढ झाली नव्हती. पण इतर स्मृतिकारांच्या वेळीं ती थोडीबहुत तरी झाली असावी म्हणून 'विद्याधन' व 'पितृद्रव्याविरोधन' या शब्दांचा संबंध जोडून ओढाताण सुरू झाली. अलीकडे

कोर्टांत नवे खटले आले म्हणजे जसे नवे निकाल होतात त्याप्रमाणें, व्यास, कात्यायन, नारद, बृहस्पति, वसिष्ठ इत्यादिकांनीं मूळ अर्थाची कशी फिरवाफिरव केली आहे व नव्या गोष्टी लक्षांत आणून कसे नवे निर्णय दिले आहेत हें स्मृतिचंद्रिकेंत पाहाण्यासारखें आहे! 'स्मृतींत बदल होत नाहीं, नव्या काळाला नवी स्मृति होत नाहीं' या ढोंगी सिद्धांताचेंच हें खासें उदाहरण होय! याकरितां वाचकांनीं कृपा करून देवण्णाभट्ट यांनीं केलेल्या 'स्मृतिचंद्रिका' या ग्रंथाचीं पृष्ठें २७३ ते २७८ हीं चाळून पाहाण्याची तसदी घ्यावी.

नव्या परिस्थितीला अनुरूप असे स्मृतिकारांनीं नवे अर्थ लावले यांत त्याची चूक नाहीं. आम्हांलाहि आज तोच हक्क असावा इतकेंच आमचें म्हणणें. जयकरांचें बिल हिंदुधर्मशास्त्राच्या मूळ हेतूना धरून तर आहेच, पण इतर स्मृतिकारांशीं ते विरोधी आहेत असें कोणी म्हटल्यास **Notwithstanding of any rule, or interpretation of Hindu Law to the contrary** हे शब्द त्यांनाहि इतर स्मृतिकाराप्रमाणेंच हक्कानें घालता येतील व तसे त्यांनीं आपल्या बिलांत घातलेहि आहेत.

कांहीं आक्षेपांस उत्तर

'विद्याधना' संबंधीं (Gains of Scienc) कायदा असावयाचाच तर तो मूळ मनुस्मृतींतल्याप्रमाणें असावा, अगर अलीकडे जयकर यांनीं जें बिल आणलें आहे तसा निश्चितार्थक पाहिजे. पण सध्यांची कायद्याची अनिश्चित स्थिति पाहिली म्हणजे आपण केवळ धुक्यांत उभे आहों असें वाटतें. अगर स्केटिंग रिंगच्या खेळाची आठवण होते! ठामपणें जरा पावलावर जोर द्यावा तों घसरगुंडी सुरू होते व तोल जातो. स्मृतिवाक्यांच्या शब्दाचा छल करून शेवटीं तारतम्यानें निकाल देत असतांना इंग्रजी न्यायाधीशांना याचा चांगलाच प्रत्यय आला आहे!

विद्याधनासंबंधीं मनु-याज्ञवल्क्यांची कल्पना काय होती, हें सांगितलेंच आहे. पण ज्या इतर स्मृतिकारांनीं ते मूळ हेतू सोडून विद्याधन हें समाईक व एकत्र कुटुंबाचें ठरविलें त्यांनाही असें वाटलें कीं, आपण केलें खरें, पण तें थोडेसें चूकच झालें कारण तपशिलांत शिरावयाचें तर 'सब घोडे बारा टके' असा न्याय करणें हास्यास्पद होईल व असा निर्णय तरी कोण मान्य करील? म्हणून विद्याधनाचे दोन भाग कल्पून 'विशेष विद्या' व 'सामान्य विद्या' असें दोन भेद करण्यांत आले.

इंग्रजी पंडित ऊर्फ न्यायाधीश तर बोलूनचालून परके. तुमच्या शास्त्रांत असले तसा ते न्याय देणार. त्यांनींहि 'सामान्य विद्या' म्हणजे Ordinary किंवा general education आणि 'विशेषविद्या' म्हणजे Special training of any profession अशीच वर्गवारी केली. 'पितृद्रव्याविरोधेन' म्हणजे "एकत्र कुटुंबाच्या समाईक मिळकतीची मदत न घेतां" असा अर्थ आहे हें त्यांना सांगण्याचें कारणच नव्हतें. कारण मिताक्षरेंतच तसें सांगितलें आहे. अलीकडची एकत्र हिंदु कुटुंबाची कल्पनाच अशी आहे कीं, बापाला वडिलार्जित संपत्तींत मुलापेक्षां अधिक हक्क नाहींत. मुलगा जन्माला येण्याचा अवकाश. तो बापासारखाच या मिळकतीचा समाईक हक्कदार व वारस बनतो. पण जयकरांनीं म्हटल्याप्रमाणें 'स्पेशल ट्रेनिंग' म्हणजे काय व 'जनरल एजुकेशन' म्हणजे काय याची मर्यादा ठरविणें अवघड आहे व न्यायाधीशांनाहि अनुभवांतीं असेंच आढळून आलें. (लॉरिपोर्ट ६ बॉंबे २२५ पाहा) Equity varies as the chancellers foot म्हणजे "पाय लहान मोठा, तसा न्याय खरा खोटा" असें होऊं लागलें ! कायदा अनिश्चित, तर कायदा करावयाचा कशाला ?

'आवश्यक' 'सामान्य' किंवा 'बेताचें' शिक्षण कोणतें हें कोण कसें ठरविणार ? कारण कालाच्या ओघाप्रमाणें व शिक्षणाच्या प्रसारामुळें एका वेळीं उच्च गणण्यांत येणारें (स्पेशल ट्रेनिंग) शिक्षण हें उद्यां सामान्य कोटींतच जाईल आजच्या बी. ए. झालेल्या वर्गाची शोचनीय स्थिति पाहिली म्हणजे याचा उलगडा होईल. 'पितृद्रव्याविरोधेन' याचाहि अर्थ असाच तारतम्यानें व विवेकानें केला पाहिजे. कारण आयुष्यांत लहानपणीं अगर केव्हां तरी, माणसानें आपल्या एकत्र कुटुंबाची कांहीं तरी मदत घेतलेली आढळून येणारच ! दायभागाचा कर्ता जीमूतवाहन यानें असें मार्मिकपणानें ह्मटलें आहे कीं, "असला कांटेकोर सासूपणा तुम्ही कराल तर अनवस्था होईल ! कारण प्रत्येक मनुष्य एकत्र कुटुंबांत जन्माला येतो व आपल्या आईचें स्तनपान करून करूनच वाढतो. त्याशिवाय त्याला गत्यंतर नसतें. ह्मणून एकत्र कुटुंबांतूनच याचें पालनपोषण झालें आहे असें ठरवून तुम्ही त्याची स्वतंत्र मिळकत उद्यां जप्त करूं लागला तर जगांत स्वतंत्र मिळकत कोणाची उरावयास नको.

कोर्टांचे निकाल तरी कसे चमत्कारिक आहेत पाहा. बी. ए. होणें हें सामान्य शिक्षण, पण मुलगा मॅट्रिक्युलेट होऊन वकील झाला कीं ते स्पेशल

ट्रेनिंग झालें व त्याची मिळकत समाईक ठरते! (७ मद्रास ४७,) विलायतची याला करून आय. सी. एस. अगर बॅरिस्टर होणाराची मिळकत समाईक मानली तर क्षणभर कदाचित तें रास्त ह्मणतां येईल (गोकुळचंद केस). कारण बापाला चांगली झीज सोसूनच या खर्चाला तोंड द्यावें लागतें. पण विलायतेला पाठविलेल्या मुलांपैकीं एक पास झाला. व नापास झालेल्या दुसऱ्या जिरंजिवांनीं इतर व्यापारधंद्यांत नांव काढून पैसा केला तर त्याची मात्र इस्टेट स्वतंत्र मालकीची होते! (४ मद्रास) एका नायकिणीचा खटला तर याहून गमतीदार आहे. या नायकिणीनें गाण्यानाचण्याच्या कलेवर अलोट संपत्ति केली. त्यावरोबर तिच्या दत्तक आईनें तिच्यावर वांटणीची फिर्याद केली व सांगितलें कीं, आपण तिला या कलेचें स्पेशल ट्रेनिंग दिलें त्यामुळेंच ही संपत्ति मिळवितां आली. व कोर्टानें मुलीविरुद्ध म्हणजे आईसारखाच निकाल दिला! (चलकोंडा वि. रत्नचलम् १ मद्रास.) यावर मेन या ग्रंथकारानें अशी थोडी थट्टा केली आहे कीं, "खरेंच गाण्यानाचण्यापेक्षां तिनें राजरोस वेश्येचाच धंदा केला असतां तर अधिक बरें नसतें झालें! बिचारीच्या कपाळीं आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीला मुकण्याची पाळी तरी आली नसती!"

पण इतका सावळा गोंधळ कायद्यांत ठेवण्यापेक्षां तो बदलून विद्याधन हें ज्याच्या त्याच्या स्वतंत्र मालकीचें ह्मणून ठरविलेलें काय वाईट? पैशाच्या मदतीशिवाय विद्या शिकवितां येत नाहीं हें खरें. पण बुद्धि नसेल तर कितीहि पैसा ओतला तरी तो फुकटच! भौतिक जगाच्या व्यापारी बाजारबट्ट्यावर ज्ञानाची किंमत इतकी कमी लेखली जावी कीं, त्याला स्वतंत्र अस्तित्वच असूं नये, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय.

जयकरांच्या बिलाप्रमाणें आय. सी. एस. चें शिक्षण व त्यायोगें मिळालेलें धन हें सुद्धां समाईक ठरणार नाहीं हें खरें. पण सर्व कुटुंबाचें पालनपोषण व्हावें एवढ्या एकाच हेतूनें प्रेरित होऊन बापानें एका मुलाच्याच उच्च शिक्षणावर प्रमाणाबाहेर खर्च केला असेल तर, आपसांत लेखी करार करवून या गोष्टीला तोड काढतां येईल. व याकरितां This act does not apply to any express agreement in writing to the contrary असा अपवाद किंवा दुरुस्ती जयकरांनाहि आपल्या बिलांत करतां येण्यासारखी आहे. मुख्य मुद्दा इत-

काच आहे. कीं 'विद्याधना'च्या बाबतींत कायद्याचें जें प्रमेय आहे कीं, 'विद्याधनाची मिळकत सर्वांची समाईक असतें ती बदलून ज्याची त्याची ती मिळकत कायद्यानें स्वतंत्र मानण्यांत यावी. मुख्य प्रमेय बदलण्यांत यावें; व याविरुद्ध व्यवहार व्हावयाचा असल्यास तो लेखी करारानें व्हावा म्हणजे झालें.

जयकरांच्या बिलासंबंधानें कोणाचे चिल्लर किरकोळ आक्षेप असतील तर त्यांचें वरील युक्तिवादानें व प्रत्यक्ष स्मृतिवचनें दाखवूनच समाधान करतां येईल. पण कित्येकांना वाटतें कीं, "हिंदु एकत्र कुटुंबपद्धतीवर यामुळें अप्रत्यक्ष घाला येणार ! तुमचें नवें तें चांगलें व आमचें जुनें तें वाईट, असेंहि कदाचित असेल, पण त्याची सुधारणा तुम्ही करूं नका. प्राचीन ऋषि कांहीं वेडे नव्हते. व त्यांनीं कायद्यानें निर्माण केलेली एकत्र कुटुंबसंस्था आज कमींत कमी दोन हजार वर्षें टिकली आहे ! 'कुटुंबसंस्थेचें' हें बंधन नसतें तर हिंदु समाज सनातन अनादि काळापासून टिकून राहिलाच नसता. विद्याधन मिळविणारा मृत झाल्यावर त्याच्या स्त्रीवारसांना कांहीं मिळत नाहीं व पुरुष मात्र शेषाधिकारी या नात्यानें सर्व धनाचे मालक होतात, इतकेंच कीं नाहीं ? पण त्यांत तरी फारसें काय बिघडलें ? स्त्रियांना शिक्षण नसतें. त्या अडाणी असतात. त्यांना हे हक्क आणखी दिले तर त्या आपलें धन तर घालवितीलच, पण शेवटीं आपला घात मात्र करून घेतील. मग दुसऱ्याची भर होण्यापेक्षां भाऊबंद अगर पुरुष वारस यांच्या हातीं द्रव्य गेलेलें काय वाईट ?"

'हिंदु एकत्र कुटुंबसंस्थे'संबंधीं आक्षेपकांची शंका दूर करणें अवघड नाहीं. हिंदु-एकत्र-कुटुंब-संस्था ही कांहीं सनातन नाहीं. पण तुमचा हा भ्रम मात्र 'सनातन आहे ! कारण आज ज्या प्रकारची कुटुंबसंस्था अस्तित्वांत आहे तशीच एक लाख वर्षांपूर्वीपासून कायम आहे, अशी समजूत विशेषतः ऐतिहासिक दृष्टीनें ज्यांनीं धर्मशास्त्राकडे कधींच पाहिलें नसेल त्यांचीच असणार ! व अशांनीं "स्मृतींत बदल होत नाहीं. तुम्हांस तो करण्याचा अधिकार नाहीं, स्मृतींचा कायदा सनातन आहे. इतकेंच काय पण सर्व स्मृति या एकदम एकाच वेळीं व एकाच काळीं निर्माण झाल्या !" असें म्हणावें हें साहजिक आहे. स्मृतीचा कायदा "आहे" येवढें खरें. पण तो पूर्वी होता तसाच आजहि आहे याची ग्वाही कोणीं द्यावी ? कारण 'बदल' होणें हाच तर सृष्टिक्रम आहे. Old order changeth yielding place to new" असें टेनिसननें आपल्या काव्यांत म्हटलेंच आहे.

ग्रीसच्या इतिहासांत थीससच्या जहाजासंबंधानें एक गोष्ट आहे. थीसस व अथेन्सचे शूर तरुण लोक मोठ्या पराक्रमानें क्रीटहून दिग्विजय करून आले. तेव्हां त्या पराक्रमाचें स्मारक म्हणून त्यांचें जहाज अथेन्सच्या लोकांनीं 'जसेंच्या तसें' ठेवून दिलें. कालांतरानें त्याचीं वल्हीं व फळ्या हळूहळू कुजून निकामी होऊं लागल्या. पण तसतशा लोकांनीं त्यांचे ऐवजीं नवीन घातल्या. सरतेशेवटीं एक वेळ अशी आली कीं लांकडाची लहानशी फळीच काय पण पूर्वींच्यांतली एक चूकहि जुनी शिल्लक राहिली नाहीं! तथापि या ऐतिहासिक महत्त्वाच्या व जुन्या (!) जहाजाकडे लोक प्रेमानें बोट दाखवून म्हणत "होय! हेंच तें थीससचें जहाज तें जुनें असलें तरी आजहि जसेंच्या तसें आहे. क्रीटच्या दिग्विजयानंतर यांतूनच बसून थीसस अथेन्सला परत आला." दुसरें कित्येक नास्तिक शंकेखोर जवळ असत. ते म्हणत "अहो, यांत खरोखर जुनें असें काय आहे? दरवर्षीं आम्हीं पाहतों, यांत दुरुस्ती व बदल चाललेलीच आहे." पण या उत्तरानें पहिल्या लोकांचें समाधान पूर्वी कधीं झालें नाहीं व यापुढेंहि होणार नाहीं. कारण कोणा एकाच माणसाच्या हयातींत सगळ्या दुरुस्त्या कधीं झाल्याच नाहींत! म्हणून 'जहाज जुनें कीं नवें' हा वाद कधीं तुटला नाहीं. इतिहासकार म्हणेल 'जहाज खरें. पण तें जुनें म्हणण्यापेक्षां नवेंच म्हटलें पाहिजे. जहाज नवें. पण तें जुनें असल्याचा भ्रम हा मात्र सनातन खरा!"

काशीच्या एका पंडिताचीहि अशीच गोष्ट आहे. शास्त्रीबुवा एक दिवस चांभाराकडे जाऊन जोडा दुरुस्तीला देते झाले. 'काय करावयाचें?' असें चांभारानें विचारल्यावर शास्त्रीबुवा म्हणाले "जोड्याला टांच बसवावयाची, तळ लावायचा आणि फक्त वर नवें कातडें जोडून दे कीं झालें! फारशी दुरुस्ती मात्र करावयाची नाहीं हो!"

चांभार त्यांच्या तोंडाकडे पाहात हसूं लागला व म्हणाला. "टांच बसवावयाची. तळ लावावयाचा व वर नवार घालावयाची, यापेक्षां नव्याचें आणखी तें काय करावयाचें असतें? ही जुन्याची दुरुस्ती कसली! नवाच जोडा करावा असें म्हणाना?" शास्त्रीबोवा म्हणाल, "दुरुस्ती करावयाला नकोच आहे, पण आपली कर. माझा जोडा जुनाच आहे. त्यांत बदल झाला नाहीं व होणें शक्य नाहीं.

हिंदु कुटुंबसंस्थेची काय व एकंदर हिंदुधर्मशास्त्राची काय, हीच स्थिति आहे. याज्ञवल्क्य अगर ज्ञानेश्वर यांच्या वेळची एकत्र कुटुंबपद्धति व मनूच्या

वेळची एकत्र कुटुंबपद्धति ही तरी कोठें सारखी होती ? ध्रुवाच्या दोन परस्पर-विरुद्ध टोकांइतकी ती भिन्न होती ! " भार्या पुत्रश्च दासश्च त्रयो वै अधनाः स्मृताः " असें मनूनें सांगितलें आहे. याचा अर्थ, कुटुंबसंस्थेत बाप हा मालक व कुलमुखत्यार. भार्या, पुत्र व दास या तिघांना त्याच्या हयातींत मिळकती-संबंधीं कांहींहि हक्क नाहींत. अर्थात् बापाच्या जिवंतपणीं त्यांना त्याचे विरुद्ध वांटणीही हक्कानें मागतां येणार नाहीं. बाप मुखत्यार असल्यानें बायको व औरस मुलें यांनीं नोकराचाकराप्रमाणें अगर परक्या पाहुण्याप्रमाणें त्याचे बरोबर कुटुंबांत फक्त एकत्र ' राहावें ' इतकीच मनूचे वेळीं हिंदु एकत्र कुटुंबसंस्थेची कल्पना होती. पण याज्ञवल्क्यानें हें सर्वच बाजूला ठेवलें ! स्मृतींत बदल केला नाहीं ! ! ' तत्र स्यात् सदृशंस्वाम्य पितुः पुत्रस्य चैव हि ' असें त्यानें लिहिलें. औरस मुलाचें बापाच्या मिळकतींत ' सदृशं स्वाम्यं ' म्हणजे बाबाइतकेच ' समान हक्क ' आहेत. याचा परिणाम असा कीं, बाबाचे हयातींत मुलांना हक्कानें वांटणी मागतां येऊं लागली. म्हणजे मनूचे वेळी मुलांनीं फक्त बापाबरोबर एकत्र रहावें या या हक्काचा विस्तार होऊन मुलांना बापाप्रमाणें समान हक्क संपत्तींत मिळाले. हीं दोन बदल झाल्याचीं ठळक उदाहरणें जर दाखवितां येतात तर, आजच्या एकत्र कुटुंबसंस्थेंत विद्याधनाच्या अगर अशा इतर कायद्यांनीं आणखी थोडा बदल झाला तर काय बुडालें ?

मनूच्या वेळीं औरस मुलांना देखील हक्क नव्हते. याज्ञवल्क्याचे वेळीं ते मिळाले. उद्यांच्या काळीं होणाऱ्या " नव्या स्मृतींत " स्त्रियांनाही असे हक्क क्रमानें कां मिळूं नयेत ? ज्यांत केवळ पुरुषांना फक्त कुलमुखत्यारीचे हक्क आहेत तीच एकत्र कुटुंबपद्धति, हीच व्याख्या सनातन व बरोबर काय म्हणून ? अशी 'हिंदु-एकत्र कुटुंबपद्धति' कां असूं शकणार नाहीं कीं ज्यांत स्त्रियांनाहि हक्क आहेत ? स्त्रिया अशिक्षित व अडाणी असतील तर त्यांना शिक्षण देऊन सज्ञान करा. पण शिक्षण नाहीं म्हणून हक्क नाहींत, हें म्हणणें दुराग्रहाचें व दुहेरी अन्यायाचें आहे ! हिंदुस्तानांतील लोक सुशिक्षित नाहींत म्हणून त्यांना स्वराज्याचे हक्क नकोत असें कोणीं म्हटलें तर आज तें कोणी नुसतें ऐकून तरी घेईल काय ? तीच गोष्ट स्त्रियांची. केवळ कायदेशीर हक्क मिळाले म्हणजे स्त्रियांची सर्वांगीण उन्नति झाली असें होत नाहीं. हें खरें. पण सध्यांच्या हक्कविहीन एकत्र कुटुंब-

संस्थेमुळें खरोखर कित्येक तेजस्वी व कर्तबगार स्त्रियांच्या गुणांची कशी राख-रांगोळी होत असेल त्याची कल्पनाही कोणाला येणें कठीण आहे ! तें जावें वंशा तेव्हां कळे ! !

विशेषतः स्त्रियांची दुर्दशा होते ती थांबावी हाच जयकर यांच्या बिलाचा मुख्य हेतु आहे. हिंदुधर्मशास्त्राची आपल्या हातानें योग्य पाहिजे तशी सुधारणा करावयाची तर, त्यांत वावगें काय तेंच समजत नाहीं. आपला अंगरखा आपणच हवा तसा शिवला पाहिजे. वडिलांचा जोडा व अंगरखा अभिमानानें तसाच घालूं ह्मटलें तर तो अंगाला कसा येणार व पुरा कसा पडणार? जुन्याविषयीं प्रामाण्य खरें, पण त्यावर कधींच कोणाचा निर्वाह चालत नाहीं. मनुष्य नवें करतो. पण जुन्याचें नांव घेऊन करतो. रंग नवा पण ढंग जुना. यांत गैर कांहीं नाहीं. व असेंच बोलत बोलत आपणांस योग्य दिसेल तें करणें यांतच सर्व व्यवहारिक शहाणपण आहे. पण हें न जाणणारे शब्दप्रामाण्यवादी लोक भेटले ह्मणजे त्यांच्याशीं डोकें घासतें इतकेंच.

तात्पर्य, धर्मशास्त्राची सुधारणा हा शब्द उच्चारला कीं, बिचकून जाण्याचें कारण नाहीं. वाचकांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, " हिंदुधर्म हा हिंदु-समाज बनवीत नाहीं. हिंदु समाज हा (वेळोवेळीं आपला) हिंदुधर्म बनवीत असतो. " धर्मशास्त्राच्या सुधारणेच्या वादाचें अगर नव्या स्मृतीबद्दलच्या तंट्याचें हेंच मर्म आहे. व कोणीं यत्किंचितहि संशोधक बुद्धि चालविली तर हेंच म्हणणें खरें आहे असें त्याला आढळून येईल.

समाप्त.

सुबोध

हिंदु-व्यवहारधर्म-शास्त्र

लेखक

काशिनाथ नरसिंह केळकर, अॅडव्होकेट
कुमारी बाळुबाई खरे, बी. ए.

हिंदु-कायद्यावर सर्वांगीण माहिती देणारें मराठींत हें पहिलेंच पुस्तक प्रसिद्ध होत आहे. या ग्रंथाचा विशेष म्हणजे, वेदसूत्रादि ग्रंथांत सांगितलेलें प्राचीन हिंदु व्यवहार-धर्म-शास्त्र काय होतें ? सध्या प्रचलित हिंदुकायदा काय आहे ? व हिंदुकायद्यांत कोणती सुधारणा करावयास पाहिजे ? या सर्वांचें विवेचन या एकाच पुस्तकांत सांपडेल.

प्रिव्ही कौन्सिल व हिंदुस्थानांतील सर्व हायकोर्टांचे निर्णय यांत दिले असून, स्त्रियानांहि समजेल इतक्या सुबोध रीतीनें विषयाची मांडणी केली आहे.

पृष्ठसंख्या डेमी ४००] [किंमत ४ रुपये

[पुस्तक जूनमध्यें प्रसिद्ध होईल.]